


सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह


सोलापूर | रविवार, ११ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १८२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प




१९२५ मध्ये स्थापनेच्या वेळी संघ एक बीज होते. तो आता वट-वृक्ष झाला आहे. देशाचा कोणताही भाग 'शाखा कार्या'पासून सुटलेला नाही. याशिवाय, विद्यार्थी असो वा शिक्षक, शेतकरी असो वा श्रमिक, व्यापारी असो वा कामगार, कर्मचारी असो वा उद्योगपती, बुद्धिजीवी असो वा श्रमजीवी सर्व जण प्रभावित झाले आहेत. राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रांत स्वयंसेवकांची सक्रिय भूमिका महत्त्वाची असते. या बळावर संघाने अनेक सशक्त आंदोलनांद्वारे लाखो-कोट्यवधी देशवासीयांनी मने परिवर्तित, प्रभावित आणि आंदोलित केली आहेत.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# एकीकडे युद्धविराम; दुसरीकडे पाकचे हल्ले?

- दुपारी ३:३५ वाजता भारत-पाकच्या लष्करी अधिकाऱ्यांची चर्चा
- पंतप्रधान नरेंद्र मोदींची चर्चेनंतर मान्यता
- सायं. ५ वाजेपासून दोन्ही बाजूंनी शस्त्रसंधी लागू
- दोन्ही देशांचे डीजीएमओ १२ मे रोजी पुन्हा चर्चा करणार
- भारताच्या कारवाईने पाकिस्तानने टेकले गुडघे
- गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय

## ✔ यापुढे दहशतवादी हल्ला झाल्यास युद्ध मानले जाईल, भारताने ठणकावले



**नवी दिल्ली, १० मे**

काश्मिरातील पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून व्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. त्यानंतर पाकिस्तानने सीमावर्ती भागात कारवाया सुरू केल्या. प्रत्युत्तरात भारताने घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे आधी अणुयुद्धाच्या धमक्या देणारा पाकिस्तान ताळ्यावर आला आणि शनिवारी भारतापुढे शरणांगती पत्करत युध्दविरामाचा प्रस्ताव ठेवला. यापुढे दहशतवादी हल्ला झाल्यास युद्ध मानले जाईल, या अटीवर भारताने युद्धविराम स्वीकारला आणि गेल्या २२ एप्रिलपासून दोन्ही देशातील तणावाची परिस्थिती निवळण्यास सुरवात झाली. शनिवारी सायंकाळी दोन्ही देशात ५ वाजतापासून युद्धविराम लागू करण्यात आल्याची माहिती भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दिली. मात्र, दुसरीकडे युद्धबंदीची घोषणा होऊन जेमेतम चार तासही उलटले नाही तोच पाकिस्तानने पुन्हा गोळीबार करीत आगावूपणा केला. भारतानेही जोरदार प्रत्युत्तर दिले.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

**चर्चेनंतर मोदींनी दाखवला हिरवा झेंडा :** पाकिस्तानने भारताच्या अटी मान्य केल्याचे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांना सांगितले. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेत बैठक पार पडली. यावेळी राजनाथ सिंह, अजित डोवाल, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आणि तिन्ही दलांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. ४५ मिनिटांच्या चर्चेनंतर सर्वानुमते युद्धविरामास मान्यता देण्यात आली.

**दोन्ही देशांनी शांतीचा मार्ग निवडला :** गेल्या ४८ तासांत पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ, लष्करप्रमुख मुनीर, परराष्ट्र मंत्री यांच्याशी युद्धविरामावर बोललो. अटी मान्य असल्याचे त्यांनी सांगितल्यानंतर भारताने युद्धविराम मान्य केला. दोन्ही देशाने शांतीचा मार्ग निवडल्याबद्दल त्यांचे स्वागत करतो, असे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री रुबियो सांगितले.

**कारवाई थांबविण्याला मान्यता :** दोन्ही बाजूंकडील गोळीबार, लष्करी कारवाई तसेच हवाई आणि समुद्री कारवाई संध्याकाळी ५ वाजल्यापासून थांबवण्याबाबत एकवाक्यता झाली. याबाबतच्या सूचना दोन्ही बाजूंना देण्यात आल्या. १२ मे रोजी दुपारी १२ वाजता दोन्ही देशांचे लष्करी अधिकारी चर्चा करणार आहे.

### कंदहार कांडातील दहशतवाद्यासह

# लष्कर, जैशचे टॉप कमांडर ठार

- २५ वर्षांनंतर भारताने घेतला बदला
- ७ मेच्या कारवाईत अबू जुंदाल, जमील, अजहर, नकाशा, मोहम्मद हसन यांचा खात्मा



अबू जुंदाल    मोहम्मद अजहर

**नवी दिल्ली, १० मे**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत ७ मे रोजी भारताने व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात घुसून केलेल्या कारवाईत कंदहार विमान अपरहण कांडातील मुख्य आरोपी मोहम्मद युसूफ अजहरसह जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाचे पाच कुख्यात कमांडर ठार झाल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे २५ वर्षांपूर्वी झालेल्या कंदहार विमान अपहरण कांडाचा बदला अखेर भारताने घेतला आहे.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेताना भारताने ७ मे च्या रात्री ९ दहशतवादी तळांवर अचूक आणि तेवढेच घातक हल्ले करीत शंभरपेक्षा जास्त दहशतवादी ठार मारले तर कित्येक जखमी झाले. भारत एवढी भयंकर कारवाई करेल,याची स्वप्नातही कल्पना पाकिस्तानी लष्कर आणि दहशतवाद्यांनी केली नसावी. ड्रोन्स, राफेल आणि सुखोई विमानातून सुटलेल्या क्षेपणास्त्रांनी बिळात लपलेल्या दहशतवाद्यांना मातीत गाडले. या अचूक हल्ल्यात ठार झालेल्या दहशतवाद्यांची माहिती आता हळूहळू पुढे येत आहे. विशेष म्हणजे ठार झालेल्या काही दहशतवाद्यांच्या अन्त्ययात्रेला पाकिस्तानचे वरिष्ठ लष्करी अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे भारताने मोठे दहशतवादी टिपल्याचे उघड झाले. कारवाईत शंभरपेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले असून त्यात पाच कुख्यात कमांडर्सचा समावेश असल्याची माहिती उघड झाली आहे. भारताला मोठी जखम देणारा मोहम्मद यूसूफ अजहर जैश-ए-मोहम्मद दहशतवादी संघटनेचा प्रमुख मौलाना मसूद अजहरचा भाऊ मोहम्मद युसूफ अजहरने काठमांडू येथून आयसी८१४ या भारतीय विमानाचे ३१ डिसेंबर २०९९ रोजी अपहरण करून ते कंदहारला नेले होते.भारताच्या तुरूंगात बंद असलेला त्याचा भाऊ मसूद अजहरच्या सुटकेसाठी त्याने विमानाचे अपहरण केले होते. मसूदला मुक्त केल्यानंतर कंदहार विमानतळावर उभे असलेले विमान दहशतवाद्यांनी मुक्त केले होते. तेव्हापासून मोहम्मद युसूफ फरारा आरोपी होता. अखेर त्याचा ७ मे रोजी भारतीय हवाई दलाने खात्मा केला. मरकज सुभान अल्लाहचा प्रमुख मसूदचा मेहुणा हाफीज जमील बहावलपूर येथील हल्ल्यानंतर मसूदने अजहरने मी मेलो असतो तर बरे झाले असते, असे वक्तव्य केले.

## रिझर्व्ह बँकेकडून एसबीआयला दंड

**मुंबई :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील सर्वात मोठी बँक स्टेट बँक ऑफ इंडिया आणि जना स्मॉल बँक या दोन्ही संस्थांवर कारवाई केली आहे. आरबीआयने त्यांच्यावर नियमांचे पालन करण्यात किंवा त्याच्या अंमलबजावणीत काही त्रुटी ठेवल्याने ही कारवाई केली आहे. कर्ज, अग्रीम, वैधानिक तसेच इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारामध्ये मर्यादित आणि चालू खाती उघडण्यासंदर्भातील निर्देशांचे पालन न केल्याप्रकरणी एसबीआयला १ कोटी ७२ लाख ८० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.

# वेळेआधीच धडकणार मान्सून!

### ✔ हवामान खात्याने सांगितली तारीख

**नवी दिल्ली, १० मे**

भारतीय हवामानाबाबत एक मोठी अपडेट आली आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार,यावेळी मान्सून केरळच्या किनाऱ्यावर वेळेच्या पाच दिवस आधी धडकू शकतो. यावेळी २७ मे रोजी देशभरात मान्सूनच्या आगमनाची अपेक्षा आहे. साधारणपणे, दरवर्षी १ जून रोजी मान्सून केरळच्या किनाऱ्यावर पोहोचतो.

जर अंदाज व्यक्त केल्याप्रमाणे त्याच वेळेत मान्सून केरळमध्ये दाखल झाला, तर २००९ नंतर भारतीय भूमीवर मान्सूनचे हे सर्वात लवकर झालेले आगमन असणार आहे. या आधी २००९मध्ये मान्सून २३ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला होता. साधारणपणे, नैऋत्य मान्सून १ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होतो आणि ८ जुलैपर्यंत संपूर्ण देशभरात दाखल होतो. १७ सप्टेंबरच्या सुमारास तो वायव्य भारतातून माघार घेण्यास सुरुवात करतो आणि १५ ऑक्टोबरपर्यंत परतून जातो. आयएमडीने एप्रिलमध्ये २०२५च्या मान्सूनसाठी सामान्यपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवला होता आणि भारतीय उपखंडात सामान्यपेक्षा कमी पावसाच्या परिस्थितीची शक्यता नाकारली होती. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन म्हणाले की, जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या मान्सून काळात भारतात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# मराठा समाजाने जुन्या रुढी परंपरा सोडाव्यात : खा. धैर्यशील मोहिते-पाटील

## मराठा सेवा संघाच्या तीन दिवसीय अधिवेशनास अकलूज येथे थाटात प्रारंभ








**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १० मे-**

मराठा समाजाने जुन्या रूढी परंपरा सोडून नवीन तंत्रज्ञानाचाचा वापर करुन प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करावी असे आवाहन माढा लोकसभेचे खा धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

शंकरनगर-अकलूज येथील स्मृती भवन मध्ये राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते मराठा सेवा संघाच्या तीन दिवसीय अधिवेशनाचे उदघाटन करण्यात आले . यावेळी व्यासपीठावर मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड पुरुषोत्तम खेडेकर , प्रदेशाध्याक्ष विजय घोगरे , स्वागताध्यक्ष तथा अकलूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तम जानकर सेवा संघाचे प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते . उद्घाटनपूर्व सत्रात सकाळी ११ वाजता मराठा सेवा संघ व ३३ कक्ष बळकटीकरण व पुर्नबांधणी या विषयावर मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर , कार्यालयीन सचिव सोमनाथ लडके, धनंजय पाटील यांनी मार्गदर्शन केले. स्वागत अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील म्हणाले , मराठा समाजातील अशिक्षितपणा , गरीबी , आर्थिक दुर्बलता लक्षात घेवून पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा सेवा संघाची स्थापना केली . समाजाला प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रशासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग संघटित केला . सोलापूर जिल्ह्यात उत्तमराव माने शेंडगे , स्वर्गीय बाळासाहेब कदम आदी मंडळींनी मेहनत घेतली म्हणूनच हा वटवृक्ष उभा राहिला. खा धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले , अकलूज येथे आयोजित मराठा महासेवा संघाच्या तीन दिवसीय महाअधिवेशनाचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री आदरणीय विजयसिंह मोहिते पाटील साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.कार्यक्रमाला पुरुषोत्तम खेडेकर, डॉ. विजय घोगरे, मा.मदनसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, निर्मलकुमार देशमुख, कामाजी पवार, नेताजी गोरे, मधुकरराव मेहेकरे, अर्जुनराव तनपुरे, मनोज आखरे, राजेंद्रसिंह पाटील व इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थित होती.

याप्रसंगी खासदार मा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले,ते म्हणाले मराठा समाजातील तरूण युवकांनी नोकरीच्या मागे न लागता पारंपरिक शेतीबरोबरच आता उद्योग-व्यवसायाकडेही वळावे. स्टार्टअप्स, तंत्रज्ञान व उद्योजकतेत आपले स्थान निर्माण करावे ही काळाची गरज आहे,स्वयंपूर्णता आणि स्वयंम आर्थिकता हेच आपल्या प्रगतीचे खरे मार्गदर्शक ठरणार आहेत. तरुण पिढीला इतिहासाची माहिती देवुन विचार मंथनातून ज्ञान दिले पाहिजे . जुन्या नव्यांचा मेळ घालून संघटनात्मक बांधणी केली तरच नवी पिढी वैचारिकदृष्ट्या समृद्ध होईल . मोहिते पाटील परीवार नेहमीच विद्वानांची कदर करतो. मराठा समाजाने आधुनिक तंत्रज्ञानांची कास धरावी.

मराठा सेवा संघाच्या या पहिल्या दिवसाच्या अधिवेशनास माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील,प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, निर्मलकुमार देशमुख, कामाजी पवार, नेताजी गोरे, नवनाथ घाडगे, अर्जुन तनपुरे, लक्ष्मण महाडिक, सुरज देशमुख, नितीन जाधव, विजयकुमार ठुबे, विलास पाटील, राजेंद्रसिंह पाटील, प्रभाकर झोड, मनोज आखरे, संभाजी पवार, मधुकर मेहेकरे, सिमाताई बोके, मिनाक्षी जगदाळे, उत्तमराव माने यांच्यासह सोलापूर जिल्हा, पंढरपूर विभाग व माळशिरस तालुका मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. सकाळच्या सत्रात मराठा सेवा संघ व ३३ कक्षाचे बळकटीकरण व पुनर्बांधणी संदर्भात चर्चा झाली,अकलूज इतिहास व विकास हा माहितीपट सादर करण्यात आला,तर शाहिर राजेंद्र कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडयाचा कार्यक्रम सादर केला व महाराणी येसूबाई यांच्या जीवनावर आशा मोरजकर यांनी एकपात्री श्री राज्ञी सखी ज्योतिप्रयोग सादर केला.सांयकाळी माळशिरस तालुका जिजाऊ ब्रिगेड च्यावतीने संस्कृती यात्रा काढण्यात पालखीमध्ये जिजाऊंचा फोटो व संविधानाची प्रत ठेवून महिलांनी ही पालखी सदू भाऊ चौक ते स्मृती भवन अशी यात्रा काढली यामध्ये पुरुषोत्तम खेडेकर बरोबरच खासदार धैर्यशील मोहिते पाटील व मराठा सेवा संघाचे पदाधिकारी महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या येवुन जागर विचारांचा,जागर संस्कृतीचा या सांस्कृतिक कार्यक्रमा चे सादरीकरण झाले.

# हरियाणात सापडले क्षेपणास्राचे अवशेष

## दिल्लीला लक्ष्य करण्याचा होता डाव

**सिरसा, १० मे**

हरयाणातील सिरसा जिल्ह्यात शुक्रवारी रात्री एक पाकिस्तानी क्षेपणास्त्र पाडण्यात आले, त्याचे अवशेष शनिवारी एका शेतात सापडले आहेत. संरक्षण सूत्रांचे म्हणणे आहे की, पाकिस्तानने राजधानी दिल्लीला लक्ष्य करण्यासाठी फतेह-२ क्षेपणास्त्र डागले होते, जे भारतीय सैन्याने सिरसा येथे पाडले. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, सिरसा येथील रानिया गावाजवळ शुक्रवारी रात्री १२.३०च्या सुमारास प्रकाश दिसला आणि नंतर मोठा स्फोट ऐकू आला. स्फोटानंतर, एका घराच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये प्रकाशामुळे रात्र दिवसासारखी दिसत होती. दुसरीकडे, शनिवारी सकाळी रानिया रोडवरील खाजा खेडा गावातील शेतात पाकिस्तानी क्षेपणास्त्राचे अवशेष पडलेले आढळले, जे लष्कराच्या जवानांनी जप्त केले आहेत. शुक्रवारी संध्याकाळपासून, पंचकुला, अंबाला आणि पानिपत या हरयाणातील तीन जिल्ह्यांमध्ये संध्याकाळी ७ वाजल्यापासून पूर्णपणे वीजपुरवठा खंडित झाला. सिरसा जिल्ह्याचाही या यादीत समावेश करण्यात आला आहे आणि पुढील आदेश येईपर्यंत शनिवारी संपूर्ण वीजपुरवठा खंडित राहणार आहे. अंबाला हवाई दलाच्या तळावरही हवाई हल्ल्याचा इशारा देण्यात आला आहे. हरयाणातील सर्व ७,५०० गावांमध्ये हवाई हल्ल्याचा इशारा देणारे सायरन बसवण्याची प्रक्रिया सुरू आहे. (वृत्तसंस्था)

# नुकसान लपवण्यासाठी पाकिस्तानची शक्कल

### समाज माध्यम, वृत्तवाहिन्यांच्या संकेतस्थळावरील व्हिडीओ, छायाचित्र हटविले

**◆ इस्लामाबाद, १० मे**

भारतीय लष्कराने केलेल्या कारवाईत पाकिस्तानची हवाई संरक्षण यंत्रणा उद्ध्वस्त केली, तसेच त्यांचे चार हवाई तळ आणि अनेक लष्करी तळांचे नुकसान केले. यासंदर्भातील छायाचित्र आणि व्हिडीओ प्रसारित झाले होते. नामुष्की टाळण्यासाठी पाकिस्तानने समाज माध्यम आणि वृत्तवाहिन्यांवरील छायाचित्र आणि व्हिडीओ हटविले.

भारताने पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेच्या चिंधड्या उडवत एअरबेस क्षेपणास्त्र हल्ल्यात नष्ट केले. पाकिस्तानी माध्यमे भारताकडून पाकिस्तानच्या झालेल्या नुकसानीचे वृत्त प्रसारित करीत होते. त्यानंतर पाकिस्तानी सैन्याने भारतीय हल्ल्यात झालेल्या नुकसानीची दृष्ये दाखवण्यास पूर्णपणे प्रतिबंध लावला आणि तत्काळ नुकसानीचे छायाचित्र आणि व्हिडीओ हटविण्याचे निर्देश दिले. त्यानंतर काही तासातच त्यांना हटविण्यात आले. भारताकडून नूर खान हवाई तळ आणि पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील चकवाल येथील मुरीद हवाई तळ, शोरकोटमध्ये रफीकी हवाई तळ आणि रहीम खान हवाई तळाला लक्ष्य करून भारतीय लष्कराने यशस्वी कामगिरी केली. भारताच्या या हल्ल्याने चारही हवाई तळाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पाकिस्तानी सैन्याचे प्रवक्ते जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी भारताच्या कारवाईत चारही हवाई तळ उद्ध्वस्त झाल्याची पुष्टी केली. *(वृत्तसंस्था)*

# पाकिस्तानी लष्कराचा प्रवक्ता अहमद दहशतवाद्याचा मुलगा

### लादेनला दिला होता अणुबॉम्बचा फॉर्म्युला...

**◆ नवी दिल्ली, १० मे**

भारताच्या पाकिस्तानविरुद्धच्या दहशतवादविरोधी लढाईला बदनाम करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्कराच्या माहिती युद्धाचे नेतृत्व करणारा माणूस म्हणजे लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी. तो पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स (आयएसपीआर) या लष्करी प्रचार संस्थेचा प्रमुख आहे. पण चौधरी यांच्याबद्दल फार कमी लोकांना हे माहीत आहे की तो ज्याचा पुत्र आहे तो माणूस संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद प्रतिबंधक यादीत 'दहशतवादी' म्हणून नोंदलेला आहे.

सध्या लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी हा आयएसपीआरचा प्रमुख म्हणून आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांसमोर पाकिस्तानला 'दहशतवादाचा बळी' म्हणून सादर करतो. पण त्याचे वडीलही दहशतवादीच होते. त्यांनी अणुशास्त्राचा वापर करून अल-कायदाला मदत करण्याचा प्रयत्न केला होता. अहमद शरीफ यांचा जन्म एका अशा घरात झाला, जिथे अणुविज्ञान आणि इस्लामी कट्टरता यांचे विस्फोटक मिश्रण होते. त्याच्या वडिलांचा इतिहास पाहता चौधरी याच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होऊ शकतात. *(वृत्तसंस्था)*

### डॉ. सुलतान बशीरुद्दीन महमूद अणुशास्त्रज्ञ ते दहशतवादी

अहमद शरीफ चौधरी यांचे वडील डॉ. सुलतान बशीरुद्दीन महमूद हे एके काळचे नामांकित अणुशास्त्रज्ञ होते. त्यांनी पाकिस्तानच्या अणु कार्यक्रमात मोठे योगदान दिले. मात्र, नंतर त्यांनी इस्लामी कट्टरतावादाकडे झुकत जाऊन, अल-कायदा या दहशतवादी संघटनेचा प्रमुख ओसामा बिन लादेनची प्रत्यक्ष भेट घेतली आणि त्याला अण्वस्त्रांची माहिती देण्याचा प्रयत्न केला. याच कारणामुळे २४ डिसेंबर २००१ रोजी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अल-कायदा सॅन्क्शन्स कमिटीने त्यांना दहशतवादी घोषित केले.

# एकीकडे युद्धविराम; दुसरीकडे...

**पान १ वरून...**

यापुढे दहशतवादी हल्ला झाल्यास युद्ध मानले जाईल आणि पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले जाईल, तसेच सिंधू जल कराराची स्थगिती कायम राहील या अटींवर भारताने युद्धविरामाला मान्यता दिली. मागील तीन दिवसांपासून जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरातच्या सीमेवरील पाकिस्तानचे ड्रोन हल्ले आणि क्षेपणास्त्र हल्ले भारताने उधळून लावले. भारताने जल, थल आणि आकाश अशा तिन्ही बाजूने पाकिस्तानचा घेराव करून त्यांना जेरीस आणले. भारतीय लष्कराची ताकद पाहता पाकिस्तानने नमते घेतले आणि अमेरिकेला मध्यस्थी करण्याची गळ घातली. अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो यांनी भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली, तसेच त्यांनी पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक डार यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा केली. भारताच्या अटी मान्य केल्याचे डार यांच्याकडून सांगण्यात आल्यानंतर भारताने युद्धविरामासाठी तयारी दर्शविली. पाकिस्तानला थेट इशारा भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. यापुढे देशात कुठल्याही प्रकारचा अतिरेकी हल्ला झाल्यास युद्ध मानून पूर्ण ताकदीने चोख प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा भारताने युद्धविराम मान्य करताना पाकिस्तानला दिला आहे.

**दहशतवादाविरुद्ध अटल भूमिका कायम**

भारत आणि पाकिस्तानने आज गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्यास सहमती दर्शविली आहे. भारताने सर्व प्रकारच्या आणि प्रकटीकरणातील दहशतवादाविरुद्ध सातत्याने ठाम आणि अटल भूमिका कायम ठेवली आहे. आम्ही कुठल्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेणार नाही, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणाले.

**समंजस भूमिकेचे स्वागत - डोनाल्ड ट्रम्प**

अमेरिकेच्या मध्यस्थीने रात्रभर प्रदीर्घ चर्चेनंतर, मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की भारत आणि पाकिस्तानने पूर्ण आणि तत्काळ युद्धबंदी करण्यावर सहमती दर्शवली. समंजस भूमिका आणि मुत्सद्दीपणा दाखवल्याबद्दल दोन्ही देशांचे मी अभिनंदन करतो.

**जम्मू-काश्मीर, राजस्थानच्या सीमेवर ड्रोन हल्ले, गोळीबार**

भारत आणि पाकिस्तानमधील ८६ तास चाललेले युद्ध शनिवारी संध्याकाळी ५ वाजता संपले. दोन्ही देशांमध्ये युद्धविरामावर सहमती झाली. पण त्यानंतर अवघ्या ४ तासांतच कपटी पाकिस्तान उलटला आणि जम्मू-काश्मीर आणि राजस्थानच्या सीमेवर ड्रोन हल्ले आणि गोळीबार केला. पर्यायाने बहुतांश भागात ब्लॅकआउट करण्यात आले. लष्कराने जोरदार प्रत्युत्तर देत त्यांचे ड्रोन हल्ले उधळले. तर भारतीय सैन्याने सीमेवर जोरदार प्रत्युत्तर दिले. काही वृत्तवाहिन्यांनी पाकिस्तानकडून युद्धविरामाच्या अवघ्या तासाभारातच उल्लंघन करण्यात आल्याचे वृत्त दिले होते. मात्र भारतीय लष्कराकडून याचे खंडन करण्यात आले आणि असा कोणत्याही स्वरुपाचा हल्ला झाला नसल्याचे स्पष्टीकरणही देण्यात आले. सुत्राच्या माहितीनुसार जम्मू आणि काश्मीरची राजधानी श्रीनगर, सांबा, रामगड, पठाणकोट, आरएसपुरा आणि राजस्थानच्या पोखरणमध्ये पाकिस्तानने शनिवारी सायंकाळी ८.३० वाजताच्या सुमारास ड्रोन हल्ले सुरू केले. यानंतर हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय करण्यात आली आणि पाकचे ड्रोन हल्ले हवेतच उधळण्यात आले.

# डीआरडीओचा मानवसदृश रोबोट निर्मितीचा प्रकल्प

### लष्करी मोहिमेत मानवी नुकसान होणार कमी

**◆ पुणे, १० मे**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेचे (डीआरडीओ) शास्त्रज्ञ, आघाडीच्या लष्करी मोहिमेचा भाग असणाऱ्या एका मानवसदृश रोबोटवर काम करत आहेत. त्यामुळे भविष्यात मैदानावर रोबोट सैनिक उतरल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

डीआरडीओ अंतर्गत एक प्रमुख प्रयोगशाळा, रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ॲस्टॅब्लिशमेंट (इंजिनीअर्स) एक यंत्र विकसित करत आहे जे थेट मानवी आदेशाखाली जटिल कामे करू शकते. त्याचा उद्देश उच्च-जोखीम असलेल्या परिस्थितीत सैन्याचा संपर्क कमी करणे आहे. डीआरडीओची एक चमू चार वर्षांपासून या प्रकल्पावर काम करीत असल्याचे सेंटर फॉर सिस्टम्स ॲण्ड टेक्नॉलॉजीज फॉर ॲडव्हान्स्ड रोबोटिक्स इन द आर ॲण्ड डी (इंजिनीअर्स) चे समूह संचालक एस. ई. ताळोले यांनी सांगितले.




आम्ही वरच्या आणि खालच्या शरीरासाठी स्वतंत्र प्रोटोटाईप विकसित केले आहेत आणि अंतर्गत चाचण्यांदरम्यान काही कार्ये यशस्वीरीत्या साध्य केली आहेत. हे मानवसदृश रोबोट जंगलासारख्या कठीण भूप्रदेशांवर काम करण्यास सक्षम असेल, असा विश्वास ताळोले यांनी व्यक्त केला.

पुणे येथे झालेल्या ॲडव्हान्स्ड लेग्ड रोबोटिक्सवरील राष्ट्रीय कार्यशाळेत हा रोबोट अलिकडेच प्रदर्शित करण्यात आला. सध्या त्याच्या प्रगत विकास टप्प्यात डीआरडीओची चमू रोबोटची ऑपरेटर कमांड समजून घेण्याची आणि अंमलात आणण्याची क्षमता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

मानवी स्नायूंसारखी हालचाल निर्माण करणारे ॲक्च्युएटर, सभोवतालच्या वातावरणातून रिअल-टाईम डेटा गोळा करणारे सेन्सर आणि कृतींचे मार्गदर्शन करण्यासाठी या माहितीचा अर्थ लावणारी नियंत्रण प्रणाली, अशा तीन प्रमुख घटकांवर ही प्रणाली अवलंबून आहे.

ताळोले यांनी सांगितले की, रोबोट इच्छित कार्ये सुरळीतपणे पार पाडू शकेल याची खात्री करणे हे सर्वांत मोठे आव्हान आहे. त्यासाठी संतुलनावर प्रभुत्व मिळवणे, जलद डेटा प्रक्रिया करणे आणि जमिनीवर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. *(वृत्तसंस्था)*

### २०२७ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष

डिझाईन चमूचे नेतृत्व करणारे शास्त्रज्ञ किरण अकेला म्हणाले की, २०२७ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना संशोधक या पैलूंवर लक्ष केंद्रित करत आहेत.

द्विपाद आणि चतुष्पाद दोन्ही पायांचे रोबोट संरक्षण आणि सुरक्षा तसेच आरोग्यसेवा, घरगुती मदत, अंतराळ संशोधन आणि उत्पादन यासारख्या क्षेत्रांमध्ये प्रचंड क्षमता देतात. तथापि, स्वायत्त, कार्यक्षम पायांचे रोबोट तयार करताना लक्षणीय तांत्रिक अडथळे येतात, असे डीआरडीओ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# अमरावतीच्या मधुरा धामणगावकरचा सुवर्णभेद

### ● चीनमध्ये आयोजित स्पर्धेत शानदार कामगिरी ● अमेरिकन खेळाडूवर मात

**◆ शांघाय, १० मे**

येथे आयोजित तिरंदाजी विश्वचषक (द्वितीय चरण) स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अमरावतीच्या मधुरा धामणगावकरने अमेरिकेच्या कार्सन क्रेहेवर १३९-१३८ असा शानदार विजय मिळवून सुवर्णपदक पटकावले. गत तीन वर्षांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा न केल्याबद्दल जागतिक तिरंदाजी क्रमवारीत क्रमांकावर नसलेली मधुरा हिने आश्चर्यजनक सुवर्णमय कामगिरी केली. मधुराचे हे पहिलेच वैयक्तिक विश्वचषक विजेतेपद ठरले तसेच हे तिचे या स्पर्धेतील हे तिसरे पदक आहे.




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची विद्यार्थिनी असलेल्या मधुराने विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्याबद्दल अमरावतीकरांना अतिशय आनंद झाला असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र तिरंदाजी संघटनेने विजेत्या मधुरा धामणगावकरचे तसेच अभिमानी पालक आणि प्रशिक्षक प्रवीण सावंत यांचेही अभिनंदन केले. मधुराची जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघात प्रथम क्रमांकाने निवड झाली होती.

मधुराच्या या कौतुकास्पद कामगिरीमुळे संपूर्ण महाराष्ट्रात आनंद व्यक्त केला जात असून आगामी ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक जिंकण्याची आशा पल्लवित झाल्याची प्रतिक्रिया राज्य धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष प्रशांत देशपांडे, सचिव प्रमोद चांदूरकर व मधुराचे प्रशिक्षक प्रवीण सावंत यांनी व्यक्त केली आहे. अमरावतीकरांसाठी हा अतिशय आनंदाचा व अभिमानाचा क्षण असून मधुराचे परिश्रम फळाला आले असल्याची प्रतिक्रिया मधुराचे वडील शैलैश धामणगावकर यांनी व्यक्त केली.

**मधुराची कामगिरी युवकांसाठी प्रेरणादायी**

शांघाय, चीन येथे पार पडलेल्या तिरंदाजी विश्वचषक (द्वितीय चरण) स्पर्धेत भारताचे नाव उज्ज्व करणारी अमरावतीची सुपुत्री, मराठी मुलगी मधुरा धामणगावकर हिने सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक मिळवत अभूतपूर्व यश मिळवले आहे.

संपूर्ण देशासाठी हा एक अभिमानाचा क्षण आहेत! मधुराचं हे यश सहज आलेलं नाही. संघर्ष, परिश्रम, अपार मेहनत आणि न थांबणारी जिद्द याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मधुरा. आपल्या छोट्याशा शहरातून सुरू झालेला प्रवास आज जागतिक व्यासपीठावर पोहोचला आहे. कुटुंबाचा पाठिंबा, स्वतःची मेहनत आणि देशासाठी काहीतरी करून दाखवण्याची तळमळ या सगळ्यांचा मिलाफ म्हणजे तिचे आजचे हे यश आहे. तिने जागतिक स्पर्धेत मिळवलेले हे यश लाखो तरुण-तरुणींना प्रेरणा देणारे आहे. मधुरा, तुझ्या यशाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन! पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा अजून उंच भरारी घे! असे अखिलेश खडेकर यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### अमरावतीसाठी अभिमानाचा क्षण!

इतिहासात पहिल्यांदाच, अमरावती येथील प्रतिभावान कन्या मधुरा धामणगावकरने २०२५ च्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे. मधुराचे अभिनंदन, असे माजी खासदार नवनीत राणा यांनी म्हटले आहे.

# श्रींच्या पालखीचे पंढरपूरकरिता २ जून रोजी प्रस्थान

### पालखीचे ५६ वे वर्ष

**◆ शेगाव, १० मे**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दरवर्षी आषाढी निमित्त मोठी यात्रा भरते. देशभरातून अनेक भाविक तिथे दर्शनाला जातात. त्यात वारकऱ्यांची संख्या सर्वाधिक असते. या आषाढी वारीसाठी येथील श्री संत गजानन महाराजांची पालखी यंदा शेगावहून २ जून रोजी प्रस्थान करणार आहे.

परंपरेनुसार यंदाही श्रीसंत गजानन महाराज संस्थानची श्रींची पालखी ज्येष्ठ शु. ७ म्हणजेच २ जून रोजी सकाळी ७ वाजता पंढरपूरकडे प्रस्थान करेल. पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्याचे संस्थानचे हे ५६ वे वर्ष आहे. श्रींच्या पालखीत जवळपास सातशे वारकऱ्यांसह टाळकरी, वारकरी, पताकाधारी सहभागी होणार आहेत.

पंढरीनाथांच्या भेटीसाठी प्रत्यक्ष शेगावच्या योगी गजाननाने हजारो



वारकऱ्यांसह वारी केल्याचे दाखले मिळतात. त्यामुळे येथील वारीला असलेली परंपरा ही संतांनी दाखविलेल्या मार्गावर गेल्या ५५ वर्षांपासून अव्याहतपणे जपली जात आहे.

या दिंडीमध्ये एक वीणेकरी, टाळकरी व पताकाधारी स्वयंशिस्तीने चालत असतात. मजल-दरमजल करीत ठरलेल्या ठिकाणी मुक्काम, तिथे भजन, कीर्तन, प्रवचन करीत भागवत धर्म वाढवण्याचा प्रयत्न करतात. मार्गावरील अनेक छोट्या-मोठ्या गावांना आनंदात सहभागी होण्याचे भाग्य मिळते.

**श्रींच्या पालखीचा पंढरपूर पायदळ प्रवास**

२ जून रोजी श्रीक्षेत्र नागझरी येथील संत गोमाजी महाराज संस्थानमध्ये महाप्रसादानंतर सायंकाळी अकोला जिल्ह्यातील पारस येथे श्रींच्या पालखीचा रात्रीचा मुक्काम राहील. ३ जून रोजी पारस येथून गायगाव येथे, तर रात्री भौरद येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. त्यानंतर अकोला येथे ४ व ५ जून असे दोन दिवस मुक्काम राहील. ६ जून रोजी सकाळी भरतपूर-वाडेगाव, ७ जून रोजी देऊळगाव (बाभूळगाव) - पातूर, ८ जून मेडशी- श्रीक्षेत्र डव्हा, ९ जून मालेगाव - शिरपूर जैन, १० जून चिंचापा पेन- म्हसला पेन, ११ जून किनखेडा- रिसोड, १२ जून पानकन्हेरगाव- सेनगाव, १३ जून श्रीक्षेत्र नरसी (नामदेव) तेथून पुढे पालखीचा नेहमी प्रमाणे प्रवास राहणार आहे. *(तभा वृत्तसेवा)*



देश एकीकडे युद्ध लढत असताना सरकारच्या पाठीमागे ठाम उभे राहण्याचे सोडून काँग्रेस राजकारण करत आहे. ही राजकीय टीकेची वेळ नाही, एवढे भान काँग्रेस पक्षाला कधी येणार?
**केशव उपाध्ये**, भाजपा प्रवक्ते


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, रविवार दि. ११ मे २०२५ ३




दहशतवाद्यांना पोसण्यापासून ते अंत्यविधीस उपस्थित राहण्यामुळे पाकिस्तानचा खरा चेहरा समोर आलेला आहे. सध्याच्या युद्धजन्य स्थितीला पाकिस्तानच जबाबदार आहे. अशा स्थितीत उपाय गरजेचा आहे आणि त्यासाठी सर्वांनी सरकारच्या पाठिशी राहिले पाहिजे.
**शरद पवार**, राकाँशप नेते

# सीमेवरील अतिरेक्यांचे लाँच पॅड उद्ध्वस्त

## भारतीय लष्कराने जारी केले छायाचित्र

◆ **श्रीनगर, १० मे**

जम्मू-काश्मीर आणि पंजाबमधील अनेक भागांत पाकिस्तानने केलेले ड्रोन हल्ले भारतीय सैन्याने हाणून पाडले. भारतीय सैन्याने शुक्रवारी रात्री नियंत्रण रेषेजवळील दहशतवादी लाँच पॅडवर अचूक गोळीबार करून उद्ध्वस्त केले. भारतीय लष्करी अधिकाऱ्यांनी यासंदर्भातील व्हिडीओ आणि छायाचित्र एक्सवर जारी केले आहे.

अतिरिक्त सार्वजनिक माहिती महासंचालनालयाने एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, जम्मू येथील सीमेवरील कारवाईत दहशतवादी लाँच पॅड यशस्वीरित्या नष्ट करण्यात आले. नियंत्रण रेषेजवळ असलेल्या दहशतवादी लाँच पॅडचा वापर भारतीय नागरिक आणि सुरक्षा दलांविरुद्ध दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन आणि प्रत्यक्ष हल्ला करण्यासाठी केला जात होता. भारतीय लष्कराने त्यावर केलेल्या जलद आणि निर्णायक कारवाईमुळे दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट झाली असून त्यांच्या क्षमतांना मोठा धक्का बसला. दरम्यान, भारतीय लष्कराने शनिवारी पाकिस्तानचे ड्रोन हल्ले यशस्वीरित्या रोखले. पाकिस्तानी सैन्याने आपले सैन्य फॉरवर्ड लोकेशनवर हलवणे सुरूच ठेवले असल्याचे शनिवारी संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे.

पाकिस्तानने श्रीनगर ते छल्लियापर्यंत २६ ठिकाणांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा प्रयत्न उधळून लावण्यात यश आले.

**लढाऊ विमानांची घुसखोरी**

पाकिस्तानने शुक्रवारी रात्री १.४० वाजता २६ हून अधिक ठिकाणी हवाई मार्गाने घुसखोरीचा प्रयत्न केला. उधमपूर, भूज, पठाणकोट, भठिंडा येथील हवाई दलाच्या तळांवरील उपकरणांचे नुकसान आणि जीवितहानी करण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्यांनी हायस्पीड क्षेपणास्त्रांचा वापर केला, मात्र संरक्षण यंत्रणा सज्ज असल्याने त्यांना अपयश आले. (वृत्तसंस्था)




### रहिवाशी भागातील हल्ले हाणून पाडले

शनिवारी पहाटेच्या सुमारास, पाकिस्तानी सैन्याने अमृतसर आणि पठाणकोट येथील दाट लोकवस्ती असलेल्या रहिवाशी भागात हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अमृतसर, पंजाबच्या दिशेने आंतरराष्ट्रीय सीमेवरून अनेक बायकर कामिकाझे ड्रोन सोडले. पण भारतीय लष्कराच्या हवाई संरक्षण यंत्रणेने हवेतच नष्ट केले. त्यांनी भारताच्या लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी ड्रोन, लांब पल्ल्याची शस्त्रे, युद्धसामग्री आणि लढाऊ विमानांचा वापर केला. पण भारताने त्याचे सर्व हल्ले यशस्वीरित्या परतवून लावले.

# आयएमएफचे पाकिस्तानला १ अब्ज डॉलर्सचे कर्ज मंजूर

## भारताचा आरोप, दहशतवादासाठी करणार वापर

◆ **न्यू यॉर्क, १० मे**

अर्थव्यवस्थेच्या चिंधड्या उडालेल्या पाकिस्तानने आंततराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात् आयएमएफकडे कर्जसाठी भीक मागितली होती. शुक्रवारी आयएमएफने पाकिस्तानला १ अब्ज डॉलर्सचे कर्ज मंजूर केले, अशी माहिती पाकिस्तानच्या पंतप्रधान कार्यालयाने निवेदन जारी करून दिली. भारताने यावर आक्षेप घेत म्हटले की, कर्जाचा वापर पाकिस्तान दहशतवादासाठी करणार असून आयएमएफच्या निर्णयाचा आम्ही निषेध करीत आहे.

आयएमएफने दिलेल्या कर्जाची माहिती देताना पाकिस्तान पंतप्रधान कार्यालयाने जारी केलेल्या निवदेनात म्हटले की, पाकिस्तानसाठी १ अब्ज डॉलर्सच्या आयएमएफच्या टप्प्याला मंजुरी देणे हे भारताच्या दबाव निर्माण करण्याच्या धोरणाचे अपयश आहे. पाकिस्तानला प्रस्तावित केलेल्या १.३ अब्ज डॉलर्सच्या बेलआउट पॅकेजवर मतदान करण्यापासून भारत दूर राहिला होता. भारताने यामागील कारण म्हणून आर्थिक मदत वापरण्याच्या एका अत्यंत खराब नोंदणी असा उल्लेख केला होता. आयएमएफने भारताच्या आक्षेपाकडे दुर्लक्ष करीत कर्ज मंजूर केले आहे. (वृत्तसंस्था)

### हल्ले करण्यासाठी वळवणार निधी

वॉशिंग्टन येथे झालेल्या आयएमएफच्या बैठकीत भारताने पाकिस्तानकडून कर्ज अटींची पूर्तता करण्यात वारंवार अपयश आल्याबद्दल चिंता व्यक्त केली. वारंवार मिळणाऱ्या कर्जांमुळे पाकिस्तान आयएमएफसाठी खूप मोठे आणि अयशस्वी कर्जदार बनले आहे. पाकिस्तानला मिळणारी आर्थिक मदत अप्रत्यक्षपणे त्याच्या गुप्तचर संस्थांना आणि लष्कर ए तोयबा आणि जैश ए मोहम्मद सारख्या दहशतवादी संघटनांना मदत करते, जे भारतावर हल्ले करत आहेत, असा पुनरुच्चार भारताने केला आहे.

# पाकिस्तानवर नुकसान लपवण्याची नामुष्की

## चॅनेल, सोशल मीडियावरचे फोटो, व्हिडीओ केले डिलीट

◆ **नवी दिल्ली, १० मे**

भारताने गेल्या दोन दिवसांपासून पाकिस्तानच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यांचे उत्तर जशास तसे दिले आहे. पाकिस्तानी एअरफोर्सच्या लढाऊ विमानांनी श्रीनगर एअरबेसवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ज्याला भारतीय एअर फोर्सने अयशस्वी केले. तसेच उत्तरादाखल केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानच्या दोन फायटर जेटला पाडून नष्ट केले. तर तिकडे भारताने पाकिस्तानच्या एअर डिफेंस सिस्टीमच्या चिंधड्या उडवत एअरबेस क्षेपणास्त्र हल्ल्यात नष्ट केले. मात्र पाकिस्तानी सैन्य भारताने केलेल्या नुकसानीला लपवण्यासाठी रणनिती आखत आहे. पाकिस्तानी माध्यमही भारताकडून पाकिस्तानच्या झालेल्या नुकसानीच्या बातम्या कवर करत नाहीये. भारतीय हल्ल्याची कोणतीही बातमी पाकिस्तानी माध्यमातून ब्रॉडकास्ट करण्यात येत नाही. पाकिस्तानी सैन्याने भारतीय हल्ल्यात झालेल्या नुकसानीची दृष्ये दाखवण्यास पूर्णपणे प्रतिबंध लावला आहे.

भारताने शुक्रवारी सलग दुसऱ्या रात्री प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत पाकिस्तानने जम्मू-काश्मीरपासून ते गुजरातपर्यंत केलेल्या २६ ठिकाणांवरील क्षेपणास्त्र हल्ले परतवून लावले. संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, विमानतळे, वायुसेनेची ठिकाणे तसेच अन्य सैन्य प्रतिष्ठानांना लक्ष्य करण्याच्या पाकिस्तानच्या मनसुबे यशस्वीपणे उधळून लावले आहेत.

समोर येत असलेल्या माहितीनुसार, श्रीनगर आणि त्याच्या जवळपासच्या परिसरात भारत आणि पाकिस्तानी सैन्यात मोठी लढाई सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याने हवाई हल्ल्याच्या संभावित धोक्याशी दोनहात करण्यासाठी जमिनीवरून हवेत मारा करणारी यंत्रणा कार्यान्वित केली आहे. (वृत्तसंस्था)

### लोकांनी भराभर टाकले व्हिडिओ

स्थानिक लोकांनी फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत, त्यामध्ये भारतीय क्षपणास्त्राच्या हल्ल्यात झालेले नुकसान दिसत आहे. पाकिस्तानी सैन्य आता हे व्हिडीओ आणि फोटो डिलिट करत सुटली आहे. पाकिस्तानी लष्कराला बसलेली चपराक लोकांना कळू नये म्हणून पाक सैन्याची धडपड सुरू आहे.

# गोळीबारात अधिकारी ठार, अनेक जखमी

◆ **नवी दिल्ली, १० मे**

शनिवारी सकाळी पाकिस्तानने केलेल्या गोळीबारात एका अधिकाऱ्याचा मृत्यू झाला तर दोन गंभीर जखमी झाले.

शुक्रवारी रात्री पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवर प्रचंड गोळीबार केल्यानंतर शनिवारी सकाळी पुन्हा राजौरी येथे तोफांचा मारा केला. एक गोळा घरावर पडल्याने झालेल्या स्फोटात राजकुमार थापा ठार तर त्यांचे दोन सहकारी गंभीर जखमी झाले. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी बोलावलेल्या ऑनलाईन बैठकीला उपस्थित राहण्यासाठी जाण्याच्या तयारीत असताना त्यांच्या घरावर हल्ला झाला. त्यांच्या दोन साथीदारांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले आहे. शुक्रवारी रात्री पाकिस्तानी लष्कराने श्रीनगरवरही तोफांचा मारा केला. भारतानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. तोफगोळ्यांच्या माऱ्याने अनेक घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भारताने केलेल्या माऱ्यात पाकिस्तानी लष्कराच्या कित्येक ठाण्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. जम्मू,राजौरी आणि पुंछ ही शहरे नियंत्रण रेषेला लागून आहेत. (वृत्तसंस्था)



अमृतसर



सिरसा





बाडमेर

पाकिस्तानने शुक्रवारी रात्री भारताच्या पश्चिम सीमेवरील शहरांना लक्ष्य करीत ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला. लष्करी ठिकाणे आणि नागरी वस्त्यांना लक्ष्य करण्यात आले. मात्र, भारतीय हवाई संरक्षण यंत्रणेने बहुतांश ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केली. त्यामुळे ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांचे तुकडे मोकळी मैदाने, घरे आणि शेताजवळ पडली.



जैसरमेल

## चित्रपट वार्ता

### श्रेया घोषालचा कार्यक्रम पुढे ढकलला



**मुंबई** : प्रसिद्ध गायिका श्रेया घोषालचा मुंबईतील संगीत कार्यक्रम आता वेळापत्रकानुसार होणार नाही. हा शो बीकेसी येथील जिओ वर्ल्ड गार्डन येथे होणार होता पण आता तो पुढे ढकलण्यात आला आहे. श्रेयाने स्वतः ही माहिती दिली आहे. श्रेया घोषालने सांगितले की तिचा शो रद्द झालेला नाही, तो काही काळासाठी पुढे ढकलण्यात आला आहे. तिने लिहिले की, ही मैफल माझ्यासाठी खूप खास आहे आणि तुम्हा सर्वांसोबत एक संस्मरणीय संध्याकाळ घालवण्यासाठी मी खूप उत्सुक होते, पण एक कलाकार आणि नागरिक असल्याने, मला यावेळी देशासोबत उभे राहणे आवश्यक वाटते.

### ‘मंगलाष्टका रिटर्न्स’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच

**मुंबई** : आपल्याकडे थाटामात लग्न करण्याची पद्धत आहे. आजवर अनेक चित्रपटांतून नायक-नायिकेचा लग्न करण्यासाठीचा संघर्ष दाखवण्यात आला आहे. मात्र, थाटामाटात घटस्फोट घेण्याची धमाल मनोरंजक गोष्ट ‘मंगलाष्टका रिटर्न्स’ या चित्रपटात पाहायला मिळणार असून, उत्तम स्टारकास्ट असलेला हा चित्रपट २३ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सुलट प्रेमाची उलट गोष्ट ही अनोखी टॅगलाइन असलेल्या मंगलाष्टका रिटर्न्स या चित्रपटाचा धमाल ट्रेलर लाँच करण्यात आला आहे.त्यासाठी केवळ २३ मे पर्यंतच वाट पहावी लागणार आहे. वीरकुमार शहा यांनी निर्मिती केलेल्या ‘मंगलाष्टक रिटर्न्स’ या चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश पांडुरंग भोसले यांनी केले आहे. चित्रपटात वृषभ शाह, शीतल अहिरराव ही नवी जोडी पाहायला मिळणार आहे. त्यांच्यासह प्रसाद ओक, आनंद इंगळे, सक्षम कुलकर्णी, सोनल पवार, कमलेश सावंत, सुनील गोडबोले, प्रसन्न केतकर, प्राजक्ता नवले, भक्ती चव्हाण, शीतल ओसवाल, श्वेता खरात, समीर पौलस्ते यांच्याही भूमिका आहेत.

### कंगनाचे लवकरच हॉलिवूडमध्ये पदार्पण



**मुंबई** : कंगना राणावत लवकरच हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. ती ‘ब्लेस्ड बी द एव्हिल ’या हॉरर ड्रामा चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात सिल्वेस्टर स्टॅलोनची मुलगी स्कार्लेट रोझ स्टॅलोन आणि टीन वुल्फ फेम टायलर पोसेदेखील दिसणार आहेत. कंगनाने या चित्रपटासाठी लायन्स मुव्हीजशी हातमिळवणी केली आहे. न्यू मी आणि टेलिंग पॉन्ड सारख्या चित्रपटांसाठी ओळखले जाणारे अनुराग रुद्र हे या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. ‘ब्लेस्ड बी द एव्हिल’ या चित्रपटाचे चित्रीकरण या उन्हाळ्यात न्यूयॉर्कमध्ये सुरू होईल आणि ते पूर्णपणे अमेरिकेत चित्रित केले जाईल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी परदेशी चित्रपटांवर १०० टक्के कर लादण्याचा नवीन नियम केल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

# भारताच्या लष्करी कारवाईला वेग येणार

## खाजगी कंपन्यांना शस्त्रास्त्रांचे उत्पादन वाढवण्याचा निर्देश

◆ **नवी दिल्ली, १० मे**

भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांविरोधात मोहीम उघडली आहे. यादरम्यान पाकिस्तानकडून जम्मू-काश्मीर, पंजाब आणि राजस्थानच्या अनेक भागात ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ल्याचे प्रयत्न केले जात आहेत. या पृष्ठभूमीवर भारत सरकारने संरक्षण उपकरणांचे उत्पादन करणाऱ्या भारत फोर्ज आणि महिंद्रा अँड महिंद्रा यांच्या डिफेन्स डिव्हीजनसह अनेक खाजगी कंपन्यांशी संपर्क साधल्याची माहिती समोर आली आहे.

या खाजगी कंपन्याना त्यांच्या ऑर्डनन्स कारखान्यांमध्ये सध्या तयार केल्या जात असलेल्या साहित्यामध्ये वाढ करून ठरवून दिलेल्या दारूगोळ्यासह इतर काही वस्तूंचे उत्पादन वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लवकरच या पुरवठादारांना आढावा बैठकीसाठी बोलवले जाण्याची शक्यता आहे.

**जेजुरीतील भारत फोर्ज कंपनी**

भारत फोर्ज कंपनीची पुण्याच्या जवळ जेजुरी येथे मोठी डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग फॅसिलिटी आहे, जेथे बंदुका, वाहने, लहान आणि मध्यम आकाराची शस्त्रे, आणि प्रणालींची असेंब्ली आणि इंटिग्रेशन केले जाते. या कंपनीने या वर्षी संरक्षण मंत्रालयाबरोबर १८४ स्वदेशी बनावटीच्या अॅडव्हान्स्ड टोव्ड आर्टिलरी गन सिस्टीम्स (एटीएजीएस) पुरवठा करण्याबाबतचा एक अत्यंत महत्त्वाचा करार केला होता. १५५/५२ मिमी कॅलिबर हे डीआरडीओ बरोबर मिळून संयुक्तपणे विकसित करण्यात आले आहे. स्वदेशी बनावटीचे हे ४८ किलोमीटरपर्यंत मारा करू शकते आणि याचे काम ऑल-इलेक्ट्रिक ड्राइव्हजवर चालते यामुळे हायड्रॉलिक ड्राइव्हच्या तुलनेत याच्या कसल्याही देखभालीची गरज पडत नाही. ८ किलोमीटर प्रतितास वेगाने धावणाऱ्या टोव केलेल्या गन्सच्या तुलनेत हे १८ किलोमीटर प्रति तास वेगाने धावू शकते. तसेच याचा फायरिंग रेट टोव केलेल्या गन्सच्या ३ शेल्सच्या तुलनेत सहा शेल्स इतका आहे. सध्या अस्तित्वात असलेले अम्युनिशन देखील कुठल्याही सुधारणेशिवाय मधून यशस्वीरित्या डागले जाऊ शकते.

महिंद्रा कंपनीने देखील सरकारकडून लहान शस्त्रे आणि त्यासाठी लागणारे अम्युनिशन तयार करण्याचा परवाना मिळवला आहे. यासह या कंपनीकडून भारतीय सैन्यासाठी आर्मर्ड कॅरिअर्स आणि नॉन-आर्मर्ड मोबिलिटी सोल्यूशन्स तयार केले जातात. कंपनी शहरी भागातील युद्धासाठी डिझाइन केलेले मार्क्समन हे लष्करी वाहन आणि रक्षक हे आर्मर्ड मिलिट्री युटिलीटी व्हेईकल देखील तयार करते. (वृत्तसंस्था)

### मेक इन इंडिया जोरात

मेक इन इंडिया सुरू झाल्यापासून देशातील डिफेन्स प्रॉडक्शन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. हे उत्पादन आर्थिक वर्ष २४ मध्ये १.२७ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. सध्या सुमारे ६५ टक्के संरक्षण उपकरणे देशातच तयार केली जातात. विशेष म्हणजे एका दशकापूर्वी ६५-७० टक्के संरक्षण उपकरणे ही आयात केली जात होती. भारत फोर्ज, महिंद्रा आणि टाटा ग्रुप या खाजगी क्षेत्रातील कंपन्या भारताच्या संरक्षण उपकरणाच्या बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.



# पाकिस्तानसाठी ‘नागास्त्र’ ठरले कर्दनकाळ

## ● नागपूरनिर्मित शस्त्राची जगभरात चर्चा ● ३० एप्रिलला केली होती पंतप्रधानांनी पाहणी

◆ **नागपूर, १० मे**

भारताने पाकिस्तानविरोधात ऑपरेशन सिंदूर राबवून भारतीय लष्कराच्या भात्यातील ‘नागास्त्र-१’ हे स्वदेशी बनावटीचे आत्मघाती ड्रोन वापरून हल्ले केले. लक्ष्याभोवती घिरट्या घालत त्याचा वेध घेणारी ही ‘नागास्त्र-१’ हवाई शस्त्र प्रणाली लक्ष्यावर धडकून विस्फोट घडवते. लक्ष्य न सापडल्यास नियोजित ह'ा रद्द करून हे शस्त्र आपल्या तळावर परतू शकते. नागपुरात निर्मित झालेल्या ‘नागास्त्र’ ची चर्चा जगभरात सुरू झाली आहे.

**युद्ध पद्धतीत हल्ली ड्रोनचा वापर**

बदलत्या काळानुसार युद्ध पद्धतींमध्येही बदल झाले आहेत. आधुनिक काळातील युद्धे ही नवतंत्रज्ञानाच्या साहाय्याने लढली जात आहेत. यामध्ये ड्रोन अर्थात अनमॅण्ड एरिअल व्हेईकल्सना प्रचंड महत्त्व आले आहे. काही आठवड्यांपूर्वी इराणने इतिहासात प्रथमच इस्रायलवर केलेल्या हल्ल्याची जगभरामध्ये चर्चा झाली. या हल्ल्यामध्ये ड्रोन क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला होता. त्यापूर्वी अझरबैजान आणि आर्मेनिया यांच्यातील युद्धामध्येही ड्रोनचा वापर करण्यात आला होता. भारताचा पारंपरिक शत्रू असणारा पाकिस्तान हा ड्रोनच्या माध्यमातून पंजाब आणि काश्मीर या भागामध्ये शस्त्रास्त्रे, अमली पदार्थ पाठवून दहशतवाद पसरवण्याचे तसेच अंतर्गत सुरक्षेला आव्हान देण्याचे काम करीत आहे. दुसरीकडे ड्रोन या संकल्पनेवर आधारित आधुनिक अस्त्रेही आता विकसित होऊ लागली आहेत. अलीकडेच ‘नागास्त्र-१’ हे स्वदेशी बनावटीचे आत्मघाती ड्रोन भारतीय लष्कराच्या सेवेत दाखल झाले आहे. हे नागपुरातील एका कारखान्यात तयार झाले आहे.

**ड्रोनची स्ट्राईक रेंज ३० कि. मी.**

नागास्त्र ड्रोनची स्ट्राईक रेंज ३० कि. मी. आहे आणि ते दोन किलो दारूगोळा वाहून नेण्यास सक्षम आहे. या नव्या अस्त्रामुळे लष्कराची मारक क्षमता वाढली आहे. लष्कराने ४८० आत्मघाती ड्रोनची ऑर्डर दिली होती. यापैकी १२० ड्रोन लष्कराला देण्यात आले आहेत. या ड्रोनमुळे शत्रूच्या प्रशिक्षण केंद्रांवर ह'ा चढवणे शक्य झाले आहे. त्यामुळे सैनिकांच्या जिवाला असणारा धोका कमी झाला आहे. हे ड्रोन हवेत आपल्या ‘टार्गेट’च्या आजूबाजूला फिरून हल्ला करतात. (वृत्तसंस्था)



### लक्ष्य न मिळाल्यास ड्रोन फिरतात माघारी

सेन्सर बसवलेले हे ड्रोन १२०० मीटर उंचीपर्यंत नेले जाऊ शकते. ‘नागास्त्र’चे वजन १२ किलो असून, २ किलो स्फोटके नेण्याची त्याची क्षमता आहे. हे ड्रोन एक तास हवेत राहू शकतात. तसेच ‘टार्गेट’ न मिळाल्यास ते परत येतात किंवा पॅराशूटच्या साहाय्याने त्यांचे लँडिंग केले जाऊ शकते. विशिष्ट प्रकारच्या स्टँड अथवा हातानेही मार्गक्रमित करता येते. जीपीएसने सज्ज असलेले हे ड्रोन दोन मीटरच्या अचूकतेने लक्ष्यावर ह'ा करण्यास सक्षम आहे.

### नागास्त्रची वैशिष्ट्ये

- ड्रोनमध्ये ७५ टक्क्यांहून अधिक देशी सामग्री
- सीमेपलीकडे शत्रूच्या गुप्त ठिकाणांवर हें करण्याची क्षमता
- हवाई शस्त्र प्रणालीवरील परकीय अवलंबित्व कमी
- ‘नागास्त्र’चे वर्णन सायलेंट किलर
- ४५०० मीटर इतक्या उंचीवर उड्डाण करण्याची क्षमता
- शत्रूच्या रडार यंत्रणांना ते शोधणे कठीण
- ड्रोन शत्रूच्या प्रदेशात जाऊन थांगपत्ताही न लागू देता निर्धारित लक्ष्यपूर्ती

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून इंडस्ट्रीची पाहणी

गेल्या ३० मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरच्या कारखान्यात विविध श्रेणीतील ड्रोनसाठी धावपट्टी सुविधेचे उद्घाटन करून पाहणी केली होती. येथे विकसित केलेल्या ‘नागास्त्र-३’ कामिकेज ड्रोन सिस्टीमची पाहणीही त्यांनी त्यावेळी केली होती. त्यावेळी हे ड्रोन प्रोटोटाईप टप्प्यात होते.

# भारत, पाकिस्तानने संयम बाळगावा

## चीनचे आवाहन

◆ **बीजिंग, १० मे**

भारत आणि पाकिस्तानने शांतता व संयम बाळगावा आणि समस्येवर शांततापूर्ण तोडगा काढावा, असे आवाहन चीनने शनिवारी केले आहे. चीन भारत आणि पाकिस्तानमधील सध्याच्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि वाढत्या तणावाबद्दल आम्हाला तीव्र चिंता आहे, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे.

आम्ही दोन्ही देशांना शांतता व स्थिरतेच्या मोठ्या हितासाठी कार्य करण्याचे, शांतता व संयम बाळगण्याचे, शांततापूर्ण मार्गाने राजकीय तोडग्याच्या मार्गावर परतण्याचे आणि तणाव आणखी वाढू शकेल अशा कोणत्याही कृतीपासून दूर राहण्याचे जोरदार आवाहन करतो, असे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. भारत आणि पाकिस्तान दोघांच्याही मूलभूत हितासाठी आणि स्थिर आणि शांततापूर्ण प्रदेशासाठी हे महत्त्वाचे असेल. आंतरराष्ट्रीय समुदायालाही हेच पाहण्याची अपेक्षा आहे. चीन या उद्देशाने रचनात्मक भूमिका बजावत राहण्यास तयार आहे, असे त्यात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

## रोखठोक

दिनेश गुणे

# वेव्हज : 'गेम चेंजर' देशाची नवी कहाणी!

कोणताही कसोटीचा काळ कठीणच असतो. मग ती युद्धस्थिती असो, वा महामारीसारखे भीषण संकट असो. या काळात समाजमन काहीसे संभ्रमित असते, कानावर आदळणाऱ्या वेगवेगळ्या, कधीकधी अनधिकृतपणे तर कधी जाणीवपूर्वक पसरविल्या जाणाऱ्या बातम्या किंवा माहितीमुळे नेमके खरे काय याची खात्री होत नसल्याने संशयग्रस्तही असते. अशा काळात, समाजाला किंवा प्रत्येक व्यक्तीला आश्वस्तपणे व्यस्त राहण्याची संधी शोधणे हे एक आव्हान असते आणि एखाद्या क्षुल्लक विचारातून त्या आव्हानाची बीजे अंकुरतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एक चिंतनशील व्यक्तिमत्त्व आहे आणि सर्वसामान्य माणसे सहसा ज्या गोष्टींचा गांभीर्याने सखोल विचार करत नाहीत, त्या गोष्टींवर ते सातत्याने चिंतन करत असतात, ही बाब नाकारता येत नाही. गेल्या दहा वर्षांत त्यांनी भारतीय समाजासमोर मांडलेल्या अनेक मुद्द्यांतून त्यांच्या चिंतनशील वृत्तीचे पुरावे स्पष्ट झाले आहेत. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरच्या आपल्या पहिल्याच प्रकट चिंतनात त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणारा संदेश एका महत्त्वाच्या मंचावरून दिला, तेव्हा अनेकांच्या भुवया काहीशा उंचावल्या होत्या. पंतप्रधानपदासारख्या श्रेष्ठ पदावरील व्यक्तीने स्वच्छतेसारख्या बाबीला एवढे राष्ट्रीय महत्त्व द्यावे, याचे अनेकांस आश्चर्य वाटले होते, पण त्यांच्या त्या संदेशातून 'स्वच्छ भारत' नावाची शासकीय स्तरावरील एक मोहीम सुरू झाली आणि बघता बघता देशात त्याचे चळवळीत रूपांतरही झाले. मोदी यांनी पहिल्यांदा स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले तेव्हा कदाचित त्याचे भविष्य फारसे कोणास उमगले नसावे. अशाच चिंतनशील स्वभावातून सुमारे पाच वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेल्या विचाराची बीजे आता देशात रुजली आहेत, एवढेच नव्हे, तर त्याचे वृक्षात रूपांतरही झाले आहे. आज मागे वळून पाहताना, हे अविश्वसनीय वाटेल, पण ते खरे आहे....

भारत हा कहाण्यांचा देश आहे. यातीलच एक असलेल्या या गोष्टीला सुमारे आठ हजार वर्षांचा इतिहास आहे. त्या काळी, म्हणजे सिंधू संस्कृतीच्या काळात भारतात एक नवा शोध लागला होता. पूर्वी कोण्या काळी शोध लागण्याचा वेग अत्यंत मंद होता. कित्येक दशकांच्या अथक संशोधनानंतर, चिंतनातून एखाद्या गरजेचा तोडगा काढण्याची प्रक्रिया सुरू व्हायची आणि जसजशी गरज तीव्र होत जाईल, तसतसा ती भागविण्याचा मार्ग शोधण्यासाठी धडपड सुरू व्हायची. कारण, गरज हीच शोधाची जननी असते, असाच त्या काळी समाजाचा समज होता. त्यामुळे गरजांची तीव्रता वाढण्याचा वेगच मुळात कमी असल्याने त्या भागविण्यासाठी नवनवे शोध लागण्याची गरजही फारशी वेगवान झाली नव्हती. अशा काळाच्याही आधी, आठ हजार वर्षांपूर्वी भारतात खेळणी नावाचा एक प्रकार जन्माला आला. तेव्हाच्या अप्रगत काळात, कदाचित जन्मदात्या मातापित्यांना उदरनिर्वाहासाठी रात्रंदिवस भटकंती करणे भाग पडत असेल, शिकार किंवा रानोमाळ पसरलेल्या निसर्गातून पोषणमूल्ये असलेले अन्न शोधण्यासाठी वणवण करताना, कुटुंबातील लहान मुलांचा सांभाळ करणे सर्वांना शक्य होत नसेल. अशा वेळी, मुलांनी स्वतःच आश्वस्तपणे घरी थांबावे आणि त्या काळात त्यांना एकटेपणा जाणवू नये याकरिता काही चिंतनशील मनांनी खेळण्यांचा शोध लावला असावा. दोरीला धरून सरसर उतरणाऱ्या माकडाची लाकडी प्रतिकृती खेळण्याच्या रूपाने पहिल्यांदा एका मुलाच्या हातात आली, तेव्हा त्याच्या डोळ्यात उमटलेली आनंदाची चमक किती तेजस्वी असेल, याची आज आपण कल्पना करू शकत नाही. खेळणे नावाच्या प्रकाराचा तो पहिला शोध ही मानवी जीवनशैलीतील क्रांतीच्या पर्वाचे पहिले पाऊल ठरले आणि पुढे खेळण्यांच्या विश्वात मुलांना रमविण्यासाठी नवनव्या शोधांची मालिका सुरू झाली. प्राणी, पक्ष्यांच्या आकाराची लाकडी खेळणी, शेती किंवा संसारोपयोगी वस्तूंची ओळख करून देणारी खेळणी, चाकाच्या गाड्या, अशा टप्प्याने खेळण्यांच्या क्षेत्राची घोडदौड सुरू झाली. बांबू, गवत, लाकूड, माती, कापड, अशा साधनांच्या टप्प्याने खेळण्यांचे विश्व विस्तारत गेले आणि आजच्या प्रगत युगात खेळण्यांच्या बाजारपेठेने अब्जावधींच्या उद्योगापर्यंत मजल मारली.

इतिहासाचा मागोवा घेतल्याखेरीज या वाटचालीचे महत्त्व लक्षात येणार नाही, हे खरेच असले, तरी असा मागोवा घेण्याकरितादेखील काहीतरी निमित्त घडावे लागते. पाच वर्षांपूर्वी, जगावर कोविड नावाच्या महामारीचे संकट आले आणि समूहप्रिय माणसास अलगपणे राहणे भाग पडू लागले. घरबसल्या सारे व्यवहार पार पाडण्याची कसोटी सुरू झाली आणि जीवनशैलीचा बाजच बदलून गेल्याने, अशा अस्वस्थ, सुरक्षित काळात काय करावे या विचाराने अनेकजण सैरभैरही झाले. सर्वांत मानसिक हाल मुलांचे होत होते. मैदानावर, घराबाहेर एकत्र जमून खेळण्याबागडण्याच्या दिवसांत घरातच बसून राहावयाची वेळ मुलांवर आली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चिंतनास हा मुद्दा सापडला. 'मन की बात' नावाच्या प्रकट चिंतनातून त्यांनी या मुद्द्याचे महत्त्व समाजात रुजविण्याचा पहिला प्रयत्न केला. ३० ऑगस्ट २०२० या दिवशी पंतप्रधानांची 'मन की बात' घराघरात पोहोचली आणि कठीण काळात मुलांच्या हाती खेळणी मिळाल्यास त्यांना संकटाचा सामना करण्याचे मानसिक बळ लाभेल हा पंतप्रधानांचा विश्वास हजारो मनांना दिलासा देऊन गेला.

महामारीच्या इतक्या दीर्घ काळात घरामध्ये राहून मुले आपला वेळ कसा घालवत असतील, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पंतप्रधानांनी चिंतन सुरू केले आणि गांधीनगरच्या 'चिल्ड्रेन युनिव्हर्सिटी'त मुलांच्या



मनोविकासासाठी सुरू असलेल्या अनेक आगळ्यावेगळ्या प्रयोगांतून काही उत्तर शोधता येईल हे त्यांनी ओळखले. भारत सरकारचे महिला बालविकास मंत्रालय, शिक्षण मंत्रालय, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय यांना एकत्र घेऊन मोदी यांनी मुलांसाठी काही वेगळे करता येईल का यावर विचार सुरू केला आणि उत्तर, उपाय सापडत गेला. मुलांच्या हाती नवनवी खेळणी दिली तर त्यांना हा कठीण काळ घालविणे अवघड राहणार नाही, हा विचार पंतप्रधानांनी मांडला. भारतातल्या मुलांना नवनवीन खेळणी कशी मिळू शकतील, खेळणी उत्पादनाच्या क्षेत्रात भारत हे केंद्र कसे बनू शकेल, यावर विचारमंथन सुरू झाले.

कोणतेही खेळणे हे मुलांची ॲक्टिव्हिटी वाढवणारे असते, तसेच ते आपल्या आकांक्षांना पंख लावणारेही असते. खेळणे हे केवळ मन रमवणारे किरकोळ साधन नाही. एखाद्या खेळण्यामुळे मनाचे पोषण होते. जे खेळणे अपूर्ण आहे, ते सर्वांत चांगले, उत्कृष्ट खेळणे असते. कोणतेही खेळणे खेळत खेळत पूर्ण करण्याने बुद्धीचा विकास होतो, ही बाब मोदी यांच्या मनात घर करून राहिली होती आणि बुद्धीला चालना देणाऱ्या खेळण्यांची निर्मिती देशात करण्याचा आग्रह त्यांनी धरला. मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या, जीवनातील वेगवेगळ्या पैलूंवर प्रभाव टाकणाऱ्या बाबी खेळण्यांच्या माध्यमातून आणता आल्या पाहिजेत, हा विचार पुढे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा भाग झाल्या आणि त्यातूनच, खेळता खेळता शिकणे, खेळणी बनविण्यास शिकणे, ज्या ठिकाणी खेळणी बनवली जातात, त्या स्थानांना भेट देणे, या सर्व गोष्टींचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला. देशातील प्रतिभावंत आणि कुशल कारागिरांना खेळणी बनविण्याच्या उद्योगात सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी टॉय क्लस्टर, म्हणजे खेळणी बनविण्याची केंद्रे म्हणून विकसित करण्याची कल्पना पुढे आली. कर्नाटकच्या रामनगरममध्ये चन्नापटना, आंध्र प्रदेशात कोंडापल्ली, तामिळनाडूतील तंजौर, आसामातील धुबरी, उत्तर प्रदेशात वाराणसी, अशी अनेक ठिकाणे निश्चित करण्यात आली.

जागतिक स्तरावर खेळणी उद्योगाची उलाढाल सात लाख कोटींपेक्षाही जास्त आहे, पण ज्या देशाकडे इतकी समृद्ध परंपरा आहे, विविधता आहे, युवा लोकसंख्या आहे, तरीही खेळण्यांच्या बाजारपेठेत आपली भागीदारी कमी आहे, ही गोष्ट पंतप्रधान मोदी यांनाच खटकत होती... कदाचित यातूनच, खेळण्यांच्या बाजारपेठेतील स्पर्धेत उतरण्याची भारताची महत्त्वाकांक्षा जागी झाली. खेळणी बनविण्याच्या क्षेत्रात उतरून आपण आपला गौरवशाली भूतकाळ पुन्हा एकदा वर्तमानात आणू शकतो आणि त्यातून आपले स्वर्णिम भविष्यही निर्माण करू शकतो, हा विश्वास मोदी यांनी दिला आणि स्टार्ट अप उद्योगक्षेत्राला आवाहन केले... 'टीम अप फॉर टॉईज'- चला, सर्वजण मिळून खेळणी बनवू या! आता 'लोकल' म्हणजे, स्थानिक खेळांसाठी व्होकल होण्याचा हा काळ आहे... मुलांसाठी नवीन प्रकारची, पर्यावरणाला अनुकूल असतील अशी, उत्तम दर्जाची खेळणी आपण बनवू या. यातून मुलांचे बालपण समृद्ध होऊन ते अधिक उमलून येईल...

आता संगणक आणि स्मार्टफोनच्या युगात कॉम्प्युटर गेम्स लोकप्रिय आहेत. हे खेळ मुलांबरोबर प्रौढांनाही आवडतात. या खेळांना देशांतर्गत कल्पना, संकल्पनांचा साज दिला, आपल्या या समृद्ध इतिहासाचे कोंदण चढविले, तर संगणक क्षेत्रांतील या खेळांच्या उद्योगात आपण आघाडी घेऊ शकतो, हे लक्षात घेऊन 'आत्मनिर्भर भारत' अभियानामध्ये आभासी खेळांच्या निर्मिती क्षेत्रातील संधीचा फायदा घेण्यासाठी प्रतिभाशाली युवाशक्तीच्या सर्जनशीलतेला मोदी यांनी साद घातली. आपल्या एकत्रित प्रयत्नांतून अशा उद्योगांत उभे राहणारे आजचे लहानलहान स्टार्ट अप्स उद्या मोठमोठ्या कंपन्यांमध्ये रूपांतरित होतील आणि जगात भारताची नवी ओळख निर्माण होईल, असा नवा आत्मविश्वास दिला.

... आज पाच वर्षांनंतर मागे वळून पाहताना, एका नव्या क्रांतीच्या जन्माची कथाबीजे कशी रुजली त्याचा अनुभव घेता येतो. पाच वर्षांपूर्वी, एका संकटाच्या काळात मुलांची मने रमविण्यासाठी काय करता येईल याच्या चिंतनातून स्वप्नवत वाटणाऱ्या एका प्रवासाची सुरुवात होऊन पुढच्या पाच वर्षांत ते वास्तवातही आले. गेल्याच आठवड्यात मुंबईमध्ये संपन्न झालेल्या 'वेव्हज-२०२५' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील एका परिषदेत भारताच्या या भरारीचे पुरावे उघड झाले आहेत. 'मन की बात'सारख्या कार्यक्रमातून व्यक्त केलेला एक विचार, त्याचा पाठपुरावा करत, पुढच्याच वर्षी, सन २०२१ मध्ये केंद्र सरकारने आयोजित केलेल्या 'द इंडियन टॉय फेअर' उपक्रमातून भारतीय इतिहास, संस्कृती, पौराणिक कथा आणि नीतिमत्तेवर आधारित 'टॉय ॲण्ड गेम्स' ही संकल्पना मांडण्याकरिता सर्जनशील मनांना केलेले आवाहन आणि लगेचच खेळांच्या जगातील या विश्वातील पदार्पणाचे पहिले पाऊल हा टप्पा म्हणजे गेम चेंजर वाटचालीची कहाणीच आहे. या कहाणीनेच चीनमधून होणाऱ्या खेळण्यांच्या आयातीस मागे टाकले आणि भारतातून खेळण्यांची निर्यात होऊ लागली. गेल्या दहा वर्षांत खेळणी निर्यातीत अडीचशे टक्क्यांनी झालेली वाढ हा त्या स्वप्नपूर्तीचा स्पष्ट पुरावा ठरला आहे. जगभरातील मोठ्या खेळणी कंपन्या आज चीनऐवजी भारतात तयार झालेल्या खेळण्यांना पहिली पसंती देऊ लागल्या आहेत. येत्या आठ वर्षांत खेळण्यांच्या बाजारपेठेतील भारतीय उद्योगाची उलाढाल ४.४० अब्ज डॉलर्सचा टप्पा गाठेल असा अंदाज व्यक्त होत आहे. भारत हा या क्षेत्रातील 'गेम चेंजर', 'पॉवर हाऊस' म्हणून पुढे आला असून, जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन (वेव्हज) २०२५ या पहिल्याच जागतिक शिखर परिषदेचे यजमानपद मिळवून या क्रांतिपर्वाचे पुढचे पाऊल पडले आहे. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर, गेल्या १ मे रोजी मुंबईत भरलेल्या वेव्हज परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रांतीच्या नव्या वाटेवरचे पुढचे पाऊल टाकून भविष्याची दिशा निश्चित केली आहे. आजपर्यंत 'मेक इन इंडिया' नावाची मोहीम सरकारने राबविली. आता पुढचा टप्पा म्हणून, 'मेक इन इंडिया फॉर द वर्ल्ड' हा नवा संकल्प त्या परिषदेत सोडला गेला. खेळणी उद्योगाच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकल्यानंतरच्या पुढच्या जेमतेम पाच वर्षांत भारताने या क्षेत्राचे नेतृत्व करण्याची क्षमता सिद्ध केली आहे. देशातील सर्जनशीलता, प्रतिभा आणि कल्पकता यांना प्रोत्साहन देऊन त्यातून नवनिर्मितीच्या संधी उभ्या केल्या की काय होऊ शकते हे यातून स्पष्ट झाले आहे. ही यशाची कहाणी आहे. भारत हा कहाण्यांचा देश आहे, असे वेव्ह परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले होते. इथल्या प्रत्येक गोष्टीला कहाणी आहे. या देशातील नद्यांना कहाण्या आहेत, निसर्गाला कहाण्या आहेत, पर्वतांनाही कहाण्या आहेत आणि त्यामध्ये भारताच्या समृद्ध संस्कृतीची ओळख दडलेली आहे. आता नव्या युगासोबत भारताच्या नव्या वाटचालीच्याही नव्या कहाण्या लिहिल्या जात आहेत. खेळणी उद्योगातील क्रांतीची वाटचाल ही अशाच एका कहाणीची सुरुवात आहे आणि वेव्ह परिषदेतून भारताने सिद्ध केलेली मनोरंजन उद्योगातील नेतृत्वाची क्षमता नावाच्या एका नव्या कहाणीची बीजे वेव्ह परिषदेतून रुजू घातली आहेत. जागतिक मनोरंजन उद्योगातील नव्या संधींची क्षितिजे भारताने जगासमोर खुली केल्याने, पाच वर्षांपूर्वीच्या स्वप्नाची वास्तवापर्यंतची वाटचाल उलगडणारा एक व्यापक पट या कहाणीतून उभा राहिला आहे. ही परिषद म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रतिभा आणि सर्जनशीलतेला सामावून घेण्याच्या जागतिक परिसंस्थेचा पाया ठरेल असा विश्वास मोदी यांनी त्या परिषदेत बोलताना व्यक्त केला होता. नव्या कहाण्यांच्या शोधात असलेल्या जगाला देण्यासाठी भारताकडे भरपूर कहाण्या आहेत. आतापर्यंत भारताने भारतासाठी त्या निर्माण केल्या, आता जगाला देण्यासाठी त्यामध्ये नव्या कहाण्यांची भर घातली जात आहे. ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### युद्ध काळात ज्येष्ठांचे योगदान महत्त्वाचे

पाकिस्तानद्वारे आपल्या देशात दहशतवाद पसरविला व निष्पाप पर्यटकांचा बळी गेला. आम्ही ज्येष्ठ फिरायला जातो व देश-विदेशात भ्रमण करतो, याची झळ आपल्याला केव्हाही पोहोचू शकते व म्हणून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना मदत करणे आमचे कर्तव्य ठरते. आपल्या गावात, शहरात व घरी राहून आम्ही ज्येष्ठ नागरिक देशाच्या संरक्षणात मदत करू शकतो व ती आपण केली पाहिजे. मॉक ड्रील, सिव्हिल डिफेन्समध्ये सहभाग घेऊन व उपस्थित राहून आपण आपले, आपले परिवाराचे, आपले देशाचे रक्षण, स्थानिक प्रशासनाला मदत करून आपल्या देशाचे रक्षण करू शकतो. याला कोठेही जायची व परिश्रम घ्यायची गरज नाही.

जिल्हा प्रशासन व जिल्हाधिकारी यांना वय गट ६० ते ७० व ७० वरील, माजी सैनिक, सेवानिवृत्त पोलिस, होमगार्ड, अग्निशमन अधिकारी व कर्मचारी, सशक्त ज्येष्ठ नागरिक आपली नावे, ज्येष्ठ नागरिक मंडळाद्वारे पाठवा. प्रत्येक मनपा झोनमध्ये दर रविवारी मॉक ड्रील, सिव्हिल डिफेन्सची माहिती करून घ्या. जास्त परिश्रम नसणारी महत्त्वाची भूमिका आपण बजावू शकतात व आपले देशाच्या कठीण काळात सहभाग घेऊ शकतात.

काही सेवानिवृत्त सैन्य अधिकारी व देशभक्तीची आपली सेवा वयाच्या ८० व ९० नंतर देण्याची तयारी दाखविली, आम्ही सिव्हिलियन ज्येष्ठ अशी तयारी ठेवू शकतो व दर रविवारी प्रशिक्षण व माहिती घेणे शक्य आहे व देशाच्या सुरक्षेत सहभाग घेऊन देशप्रेम व्यक्त करावे, असे आवाहन, सीनियर सिटिजन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्टच्या वतीने आम्ही करीत आहे. दिवसभर कोणतेही फोटो मोबाईलवर पाठविणे, खोट्या बातम्या पसरविणे, असामाजिक तत्त्वांना खतपाणी घालणे, गुड मॉर्निंग, गुड नाईट मेसेज पाठविण्यात वेळ घालविण्यापेक्षा देशाकरिता प्रत्येक ज्येष्ठाला, एक रविवार देणे शक्य आहे. आम्ही स्थानिक प्रशासनाला मदत करताना पुढच्या पिढीला, आमचे नातेवाईक, नातू, पणतू यांना स्वरक्षण, सुरक्षा व युद्ध काळात सामान्य नागरिकाचे कर्तव्य व जबाबदारीची जाणीव घरबसल्या करून देणे शक्य आहे. बघ्याची भूमिका घेणे, देशाने, सैन्याने काय करावे, शासनाने काय करावे, असे सल्ले मोबाईलवर न देता, जातीयवाद, धर्माधर्मात तेढ निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन सीनियर सिव्हिल कौन्सिलतर्फे करण्यात येत आहे. आपला भारत देश, विविध भाषा, जाती, धर्म, पंथ व विविध पक्ष, संघटना, संस्कृतीने नटलेला व बहरलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेचे, देशाचे रक्षण करण्याची वेळ आली आहे व त्याचे रक्षण करणे आम्हा ज्येष्ठांचे कर्तव्य आहे.

**सुरेश रेवतकर**/९४२२८३७६५७

### अन्यथा जगाच्या नकाशावरून नष्ट व्हाल

पाकिस्तानची वाटचाल गेल्या अनेक दशकांपासून अराजक, दहशतवाद आणि अस्थिरतेच्या दिशेने चालू आहे. धर्माच्या नावावर स्थापन झालेल्या या देशाने स्वतःच्याच लोकांचा शोषण, अल्पसंख्यकांचा छळ आणि शेजारी देशांविरोधातील घृणायुक्त नीती यावर आपले राजकारण उभं केलं. मात्र आता ही खेळी उलटी ठरत आहे. आजचा पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या कोलमडलेला, राजकीयदृष्ट्या कमजोर आणि सामाजिकदृष्ट्या उद्ध्वस्त झालेला देश आहे.

जगभरातील दहशतवादी संघटनांना पाकिस्तानने दीर्घकाळ आश्रय दिला. पण आता जग बदललं आहे. दहशतवादाविरोधात सर्व देश एकत्र आले आहेत आणि पाकिस्तानच्या भूमीवरून चालणाऱ्या घातक कारवायांकडे आता नजरेआड न करता, सर्जिकल स्ट्राईक आणि आर्थिक प्रहार केले जात आहेत. भारताच्या ऑपरेशन सिंदूर आणि तत्सम कारवायांनी पाकिस्तानच्या असुरक्षिततेचे वस्त्र हरपले आहे. आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, चीन किंवा सौदी अरेबिया यांच्याकडे सतत मदतीसाठी हात पसरणाऱ्या पाकिस्तानची पत जगात संपली आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष करून दहशतवादाला चालना देणाऱ्या या व्यवस्थेचा शेवट जवळ आला आहे.

सिंध, बलुचिस्तान यासारख्या प्रांतांमध्ये स्वातंत्र्याची मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे. हेच चित्र पुढे गेले तर पाकिस्तान आपोआपच तुकडे-तुकडे होण्याच्या दिशेने जाईल. एका देशाचे नकाशावरून पूर्णपणे नष्ट होणे ही कल्पना अतिशयोक्त वाटू शकते, पण पाकिस्तानच्या आंतरिक व बाह्य धोरणांनी ही शक्यता आता प्रत्यक्षात उतरू शकते. पाकिस्तानने जर आता आत्मपरीक्षण केले नाही, दहशतवादाचा मार्ग सोडून विकास आणि शांततेचा मार्ग स्वीकारला नाही, तर भविष्यात जगाच्या नकाशावरून त्याचे अस्तित्वच मिटण्याची शक्यता नाकारता येत नाही. अजून ही वेळ गेलेली नाही...

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

### 'ऑपरेशन सिंदूर' अभिनंदनीय

काळीजविहीन दहशतवाद्यांना साथ म्हणजे आत्मघात. जगभरात शेकडो अशा विघातक विचारांच्या संघटना अस्तित्वात आहेत की त्यांना हवा असलेला उद्देश साध्य करण्यासाठी ते निष्पाप मानवांच्या नृशंसपणे हत्या करीत असतात. असे कृत्य करताना त्यांच्या मनात कुठलीही दयामाया असत नाही. या



संघटना उभारण्यामागे, त्यांना अर्थसाहाय्य, शस्त्रपुरवठा व आश्रय देण्यात काही देशांचे सरकारच जबाबदार असल्याचे आपण पाहत आहोत. संपूर्ण जगात अशांतता निर्माण करणाऱ्या या दहशतवादी संघटना व त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य करणारे सरकार अथवा विशिष्ट विचार जोपासणारे मानवी समुदाय हे पण या दहशतवाद्यांच्या रांगेतच असतात. अशा दहशतवाद्यांच्या विरोधात लढण्यासाठी सर्व सामान्यांकडे कुठलेच सामर्थ्य नसते. काहीही संबंध नसताना सर्वसामान्य जनतेची प्राणहानी, वित्तहानी, त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त करणाऱ्या या दहशतवाद्यांचे निर्दालन झालेच पाहिजे असे सर्व शांतताप्रिय नागरिकांना वाटते.

आजवर अशा प्रकारच्या दहशतवाद्यांच्या संघटनांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या हल्ल्यात लाखो लोकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. हमास या, पॅलेस्टाईन दहशतवादी संघटनेने इस्रायली नागरिकांसोबत जे अव्यवहार्य कुकर्म केले त्याचा परिणाम आज ते दहशतवादी व पॅलेस्टिनी भोगत आहेत. पहलगाम येथे पर्यटकांवरील पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांना त्यांचा धर्म विचारून ठार केले. ठार मारले गेलेले भारतीय नागरिक धर्माने मुस्लिम नव्हते तर ते हिंदू, ख्रिश्चन म्हणजेच गैरमुस्लिम होते. ठार केलेल्या पुरुषांच्या बायका विधवा झाल्या. त्यांच्या लेकरांचे पितृत्व हरवले. वयोवृद्ध माता-पित्यांचे पुत्र त्यांना सोडून गेले. या घटनेची निंदा व निर्भर्त्सना करावी तेवढी कमीच आहे. आपला सुहाग हरवलेल्या स्त्रियांच्या कपाळावरील कुंकू व केसांच्या भांगातील सिंदूर हिरावले गेले. त्याचा बदला भारतीय सैनिकांनी पाकिस्तानच्या हद्दीत घुसुन, 'ऑपरेशन सिंदूर'ने घेतला. दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. शेकडो दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. सरकारच्या या 'मौत का बदला मौत' या कृतीमुळे तमाम भारतीयांना समाधान लाभले आहे. भारत सरकारने आता थांबू नये. आतापर्यंत झालेल्या सर्व हल्ल्यांचा हिशेब अशीच कारवाई सुरू ठेवून पूर्ण करावा ही तमाम भारतीयांची इच्छा आहे.

**प्रा. उदय कानतोडे**/९४२३६६३७०६

### अपयशातून सकारात्मक संदेश

नुकतीच एक बातमी वाचली. नापास झालेल्या मुलाच्या पालकांनी अपयशाचा उत्सव साजरा केला. खरोखरीच जगावेगळी बातमी असली तरी त्यात एक सकारात्मक संदेश दडला आहे.जीवनात यश आणि अपयश हे येणारच. खरं तर अपयश ही यशाची पहिली पायरी आहे असे म्हणतात. अपयश या शब्दातच यश सामावलेले आहे. शालेय शिक्षण सुरू असताना कधी कमी तर कधी अपेक्षेइतके यश मिळते . मनासारखे यश मिळाले तर त्याला सेलिब्रेट केले जाते पण यश मिळाले नाही तर सगळे घरदार सुतकी वातावरणात राहतात. मुलांनी खूप मोठी चूक केली असा भाव दिसतो. खरे तर हीच वेळ असते त्या मुलांना सावरण्याची, सांभाळण्याची आणि जे काही झाले त्यातून बाहेर काढण्याची पण ते लक्षात न घेता त्यावर आरोप-प्रत्यारोप सतत केले जातात आणि मूल घरादारापासून आपल्या लोकांपासून दुरावते. आपले कोणीच नाही ही भावना निर्माण होते. त्यातूनच नको ते पाऊल उचलले जाते. घरात समाजात जेव्हा अव्हेरले जाते तेव्हा काहीही घडू शकते. आपल्या हातून चूक घडली त्यातून पुन्हा दुसरी चूक होते आणि पश्चात्ताप होण्याखेरीज काही हाती राहत नाही. एका परीक्षेत यश मिळाले नाही तर ती चूक इतकी मोठी नाही की जीवनात कधीच यश मिळणार नाही. खरे तर अपयशातून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेणारे आपल्या आजूबाजूला बरेच असतात. ते यशाच्या शिखरावर असताना आपल्या जीवनातील अपयश देखील सांगतात. आपण त्यातून कसे बाहेर पडलो हा त्यांचा प्रवास प्रेरणा देणारा असतो. कर्नाटकमधील एका कुटुंबातील मुलाचे अपयश त्याच्या पालकांनी साजरे केले. पालकांचे मुलावर असलेले नितांत प्रेम यासाठी कारणीभूत ठरले हे निश्चित. परिश्रम करून देखील अपयश आले त्याची मेहनत खरी होती आणि म्हणून केक आणि मिठाई वाटून हा उत्सव साजरा केला गेला. मुलांचा आत्मविश्वास परत आणण्यासाठी हा एक मनापासून केलेला प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. मुले चुकतात हे खरे आहे पण पालकांनी सुद्धा चूक करू नये. विचार करावा आणि मुलांना समजून घ्यावे. ही मुले भविष्यात उंच भरारी घेतील. आयुष्यात चढ-उतार येणारच हे निश्चित. पुन्हा पुन्हा प्रयत्न करून पुढे वाटचाल केली पाहिजे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### सुखी जीवनाचे पाच सकारात्मक विचार

आयुष्यात माणसाची सर्व धडपड सुख प्राप्त करण्यासाठी आहे. सुखप्राप्तीचा मार्ग कोणता असेल हे सांगू शकत नाही, तो नैतिकच असेल ही शाश्वती नाही. आज माणूस, मिळेल त्या मार्गाने, मिळेल त्या पद्धतीने सुख ओरबाडून घेत असल्याचे अनुभवायला येते आहे. या स्पर्धेत कोण किती यशस्वी होत आहे, हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.आज काही जण सुख शोधण्यात मग्न आहेत. काहीजण सुखी आहोत हे दर्शवत आहे, तर काही जण सुखी असल्याचा नुसताच अभिनय करत आहे. पण सुखी असल्याचे समाधान कुणाच्या चेहऱ्यावर ठळकपणे दिसून येत नाही. समर्थ रामदास स्वामींना या गोष्टीचे ज्ञान ४१६ वर्षांपूर्वीच झाले असावे, म्हणून समर्थ आपल्या श्लोकातून बोध करताना सांगतात,

जगी सर्व सुखी असा कोण आहे।
विचारी मना तुच शोधूनी पाहे ।

समर्थांनी लिहिलेला हा श्लोक मानवी मनाला सांत्वना देतो की या विश्वात सर्वार्थाने कुणीच सुखी नाही. या जगात मी एकटाच दुःखी नाही हा विचार माणसाला काहीकाळ सुखी करून जातो याचाच अर्थ सुख माणसाच्या विचारात आहे. अनेक जण ज्या परिस्थितीत आहे त्याच परिस्थितीत मी सुद्धा आहे. हा एक मनाला सुखावणारा विचार आहे. याचाच अर्थ असा की सुख हे विचारांवर अवलंबून आहे.

मानवाच्या सुखी जीवनाचे मूलमंत्र ठरू शकतात असे पाच विचार -

१) ही पृथ्वी केवळ माझ्यासाठी परमेश्वराने निर्माण केली नसून, ती इतरांसाठी सुद्धा निर्माण केली आहे. म्हणून सर्वजन ज्या परिस्थितीत या पृथ्वीवर जीवन जगत आहेत, तसेच मला जगायचे आहे. त्यामुळे तक्रार करणे निरर्थक आहे. जर असा विचार केला तर तो सुखदायी ठरू शकतो.

२) या भूतलावर जीवनात ज्या घडामोडी इतरांसोबत घडत आहेत, त्याच माझ्यासोबत घडत आहेत आणि यापेक्षा खूप काही वेगळं घडणार नाही. त्यामुळे दुःखी होण्याचे काही कारण नाही. हा विचार सुद्धा माणसाला सुख देणारा ठरू शकतो.

३) आयुष्यात चुकूनही कधी दुसऱ्या व्यक्तीचे अनुकरण करू नये. कारण परमेश्वराने प्रत्येक व्यक्तीला विशेष गुण, रंग, रूप व स्वभाव प्रदान करून पृथ्वीवर पाठवले आहे. त्यामुळे दुसऱ्याचे अनुकरण करू नये. हा विचार सुद्धा मनाला सुख देणारा ठरू शकतो.

४) या जगात ८० टक्के समस्या केवळ आणि केवळ चुकीच्या बोलण्यामुळे आहे. त्यामुळे आपले बोलणे, वागणे हे सकारात्मक व रचनात्मक असायला हवे.

५) या पृथ्वीवर परमेश्वराने मानवाला शंभर वर्षांकरिता, पर्यटक म्हणून पाठवले आहे तेव्हा पर्यटनाचा पूर्ण आनंद घेतल्यानंतर सर्व पर्यटकांना येथून निघून जायचे आहे. कारण नवीन पर्यटकांसाठी जागा उपलब्ध करून द्यायची आहे हा निसर्गाचा न टाळता येणारा नियम आहे. म्हणून मरणाची भीती मुळीच नको. असा विचार केला तर मनाला सुख प्राप्त होऊ शकते.

असे विचार करून जर आपण आयुष्याला सामोरे जात असेल तर जीवनात दुःखाला मोठे स्थान उरणार नाही व मानवी जीवन उत्तम विचाराने सुखी होईल.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती, बडनेरा

### भगवान नृसिंह अवतार म्हणजे धर्माचा अधर्मावर विजय!

भगवान विष्णूचा प्रत्येक अवतार हा दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठीच असतो. ११ मे रोजी भगवान विष्णूच्या चौथ्या



अवताराची नृसिंह जयंती आहे. हिरण्यकश्यपूला वाटायचं, मीच ईश्वर आहे, सर्वांनी माझंच नाव घ्यावं. पण त्याचाच मुलगा भक्त प्रल्हाद हा विष्णुभक्त होता. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी ईश्वर आहे, अशी त्याची श्रद्धा होती. पण हिरण्यकश्यपूला ते मान्य नव्हते. त्याच्यातला अहंकार, राक्षसी प्रवृत्ती इतकी वाढली होती की, त्याने स्वतःच्याच मुलाचा छळ केला. त्यासाठी भगवंताला नृसिंह अवतार घेऊन त्याचा नाश करावा लागला. जेव्हा जेव्हा अधर्म वाढतो, तेव्हा तेव्हा धर्माच्या स्थापनेसाठी आणि सज्जनांच्या रक्षणासाठी प्रत्येक युगात ईश्वर अवतार घेतो असे श्रीकृष्ण वचन आहे. आज सर्वत्र अनाचार, अत्याचार, अधर्म वाढलेला दिसतो आहे, दुष्ट प्रवृत्तींची आक्रमणे वाढलेली आहेत. पहलगाम हे त्याचे उदाहरण आहे. यासाठी, हे ईश्वरा खरंच अवतार घे ! आणि तुझ्या वचनाप्रमाणे धर्माची संस्थापना आणि सज्जनांचे रक्षण कर आणि या भारतात शांती नांदू दे!

**रमा देशमुख**/नागपूर

### सहकार क्षेत्राचे सक्षमीकरण होणे आवश्यक

अलिकडेच केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय निर्माण केले आहे. परंतु नुसते सहकार मंत्रालय निर्माण करून आणि परिषदा, परिसंवाद आयोजित करून सहकार क्षेत्राचे प्रश्न सुटणार नाहीत. देशातील प्रत्येक गावामध्ये सहकारी संस्थांच्या वाढीसाठी अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. पण आज परिस्थिती उलट असलेली पाहायला मिळते. सहकारी बँका बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. पतपेढ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण राहिलेले नाही. अगदी छोट्या कारागिराला किंवा शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध करून देण्याची अत्यंत गरज आहे. राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा अधिक लवचीकपणे काम करणाऱ्या सहकारी संस्था या निश्चितच मदतीचा हात देत असतात. अगदी गरीब गरजू छोट्यात छोटा व्यवसाय करणाऱ्याला तातडीने अर्थसाहाय्य मिळवून देण्याचे काम सहकारी संस्था करीत असतात. परंतु जे सहकारी संस्थांना रिझर्व्ह बँकेच्या मदतीने अधिक आर्थिक साहाय्य उपलब्ध झाले तर कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देता येऊ शकते. मागील पाच वर्षांत केंद्र सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांसाठी जवळपास पाच लाख कोटींची आर्थिक मदत केली. तोट्यात चाललेल्या राष्ट्रीयीकृत बँकांना फायद्यात आणण्याचा प्रयत्न केला गेला आणि त्यातूनच राष्ट्रीयीकृत बँका हळूहळू नफ्यात येऊ लागल्या आहेत. त्यांच्या बुडीत कर्जाचे प्रमाण हळूहळू कमी होत चालले आहे. तर दुसरीकडे सरकारने मुद्रा लोनसारखा प्रकार सुरु केला गेला. परंतु तो प्रामुख्याने व्यापाऱ्यांसाठी उपयोगात आणला जातो. खरेतर सहकारी बँकांसाठी किंवा एकूणच सहकार विश्वासाठी मोठ्या आर्थिक साहाय्याची आवश्यकता आहे. सबका साथ सबका विकास म्हणत असताना जर सहकार विश्वामध्ये विश्वास निर्माण करणे तितकेच गरजेचे आहे. आज दहा ते पंधरा लाख कोटी जर मुद्रा लोनमधून उपलब्ध करून दिले जात असतील तर सहकारी बँकांना जर काही योजनांची चौकट घालून दिली आणि आर्थिक साहाय्य देण्याची जबाबदारी केंद्र सरकारने पार पडली, तर त्याचा गावपातळीतील प्रत्येकाला त्याचा उपयोग होऊ शकतो.

भविष्यात येणारे कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग लक्षात घेता आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि कृत्रिम बुद्धिमत्ता याचा योग्य मेळ घालता येऊ शकतो. किंबहुना या तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक वेगाने सहकाराचे जाळे विस्तारता आले पाहिजे. आज जणूकाही हे आधुनिक तंत्रज्ञान आणि सहकार क्षेत्राचा फारसा संबंध नसल्याचे चित्र निर्माण केले जाते. ते अत्यंत चुकीचे ठरते. भारताची एकूण समाजव्यवस्था लक्षात घेतली आणि ग्रामीण भागाच्या सामान्य माणसाच्या गरजा नीट लक्षात घेतल्या तर आंतरराष्ट्रीय वर्षाप्रमाणे भारतातही राष्ट्रीय सहकार प्रसार वर्ष राबवले गेले पाहिजे. तरच केंद्रात निर्माण केलेल्या स्वतंत्र सहकार खात्याचा योग्य तो उपयोग झाला असे म्हणता येऊ शकेल.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### पाकिस्तानला कायमची अद्दल घडवल्याशिवाय पर्याय नाही

युद्ध कोणतेही असो, धर्मयुद्ध, सामाजिक युद्ध, राजनीतिक युद्ध, राष्ट्रीय युद्ध, आंतरराष्ट्रीय युद्ध, आंतरिक युद्ध, कौटुंबिक युद्ध, मानसिक युद्ध इत्यादी. कलह व असंतोष अधोगतीकडे नेणाऱ्या आणि अस्तित्व नष्ट करणाऱ्या बाबी असतात आणि आहे. भारतीय संस्कृतीमध्ये मानवतावाद, राजनीती व युद्धनीती यावर रामायण व महाभारत ही दोन महाकाव्ये लिहिली गेली आहेत. ही दोन्ही महाकाव्ये आजही सर्वच बाबतीत तंतोतंत लागू पडतात. फक्त वाचायला वेळ मिळायला हवा. महाभारत या ग्रंथात युद्धकांडातील 'श्रीमद्भगवद्गीता' महर्षी व्यास रचित श्रीकृष्णाने पोरखेळ म्हणून अर्जुनाला उपदेश केलेला नाही. यामध्ये एकूणच मानवी जीवनशैली व प्रकांड तत्त्वज्ञान आहे. सर्व भारतीयांनी सर्व धर्मांची ग्रंथसंपदा व इतिहास वाचलाच पाहिजे. अहंकाराने काही माणसे अशी म्हणतात की, मी अमुक अमुक धर्माचा, मी कशाला इतर धर्मीयांचे ग्रंथ वाचू? मला एक म्हणायचे आहे की, बाबा, तू स्वतःच्या धर्माची एवढी दर्पोक्ती मिरवतोस तर, तू ज्या धर्माबद्दल बोलतोस त्याचा तरी इतिहास तुला माहीत आहे काय? मित्रांनो, जेव्हा आपले वाचन नसते तेव्हा इतरांपेक्षा आपण स्वतः फार मोठे आहोत आणि इतर तुच्छ आहेत असा समज करून घेतो. परंतु हा गैरसमज आहे. हे निर्माण करणारे प्रथमतः कुटुंब असते, मित्र, समाज, राजकारणी आणि धर्माचे ठेकेदार इत्यादी असतात. रामायण, महाभारतामध्ये अनुक्रमे प्रभू रामचंद्र व भगवान श्रीकृष्ण यांनी कुठे धर्माच्या (तुम्ही जो समजता तो) नावाचा उल्लेख केला आहे? धर्म म्हणजे काय, तर मानवी जीवन जगण्याची जीवनशैली होय. या जीवनशैलीत दोन भाग येतात. एक चांगला आणि दुसरा वाईट.

काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि तो राहणार. यामध्ये कोणत्याच भारतीयाचे दुमत नाही. आम्ही आमच्या देशाच्या लोकशाहीला, देशाच्या विकासात्मक अस्तित्वाकरिता आणि रक्षणासाठी कटिबद्ध आहोत. 'जिंकू किंवा मरू, माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू'. आम्ही आमच्या मातृभूमीला स्वतःची समिधा अर्पण करण्यास मागेपुढे पाहात नाही. पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ ला निरापराध हिंदू पर्यटकांवर धर्म व मुस्लिम कलमा विचारून गोळीबार केला तो अतिशय निंदनीय आहे. भारत सरकारने यावर जी पावले उचलली आहेत ती टिकून राहणारी असावी आणि ज्या स्तरातून पाकिस्तानची कोंडी करता येत असेल तशी करावी. आर्थिक नाकेबंदी, अंतर्गत कलह, भूकमरी, पाणी बंदी, इतर देशांनी कोणतीच मदत करू नये, याकरिता विदेश कूटनीती आणि वेळ पडल्यास जल, थल व वायुमार्गाचा अवलंब करून लष्करी कारवाई करावी. ▮

**डॉ. अनंतकुमार सूर्यकार**/९४२१७४६८२२

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

### 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या समृद्धीकडे पाऊल

**मुंबई, दि. १० मे-**

राज्यातील जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि शेतीला पोषण देणारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतला 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विकासाचे नवे पर्व घडवते आहे. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे धरणांत साचलेल्या गाळाचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करून त्याचा पुनर्वापर शिवारांमध्ये करणे. परिणामी, जलसाठ्याची क्षमता वाढवली जाते आणि गाळातील पोषणमूल्ययुक्त माती शेतजमिनीत वापरून जमिनीची सुपीकता सुधारली जाते. ही योजना विशेषतः अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे.गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून धरणे, बंधारे आणि तलावांमधील गाळ काढून त्या परिसरातील जमिनीवर टाकला जातो. शासन त्यासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे शेतजमिनीची सुपीकता वाढते आणि पाणी साठवण क्षमता देखील सुधारते. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे मर्यादित संसाधने असतात, त्यामुळे त्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापरामुळे थेट फायदा होतो. शासनाचा उद्देशही शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करणे व नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे हाच आहे. त्यामुळे ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी फारच उपयुक्त ठरत आहे.१ एप्रिल २०२४ ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १२७४ एकूण ६६.९१ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते, त्यापैकी ४२.२९ कोटी घनमीटर गाळाचे उत्खनन पूर्ण झाले असून, हे लक्ष्याच्या ६३ टक्के इतके आहे. ही भरघोस कामगिरी प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणीबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शक्य झाली आहे. योजनेसाठी राज्य शासनाकडून २७८१.८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून, आतापर्यंत १५४९.९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. यामध्ये ३५,२०५ शेतकऱ्यांपैकी ३१,७१९ शेतकरी अनुदानासाठी पात्र ठरले असून, त्यांनी ३४.१७ कोटी घनमीटर गाळ काढला आहे. यासाठी १२२१.६ कोटी रुपयांचे अनुदान अपेक्षित असून, आतापर्यंत ५१२.४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

### १८ मे रोजी होणाऱ्या महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षासाठी प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध

**तभा वृत्त सेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई १० मे:**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक १८ मे २०२५ रोजी घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२४ साठी पात्र उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या हीींिं://ीिलेपश्रळपश. सेीं.ळप या संकेतस्थळावर उमेदवारांच्या खात्यात उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. निर्धारित वेळेनंतर कोणत्याही उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही. आयोगाने संकेतस्थळावर दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे आवश्यक असून त्यांचे उल्लंघन केल्यास उमेदवारावर कारवाई होऊ शकते. प्रवेश प्रमाणपत्र मिळविताना अडचण आल्यास उमेदवारांनी आयोगाच्या अधिकृत ईमेल किंवा दूरध्वनीवर: contact-secretarympsc.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-६९१२३९१४ / ७३०३८२१८२२ असे आवाहन करण्यात आले आहे

### रेल्वे स्थानकावर वाढवली सुरक्षा यंत्रणा; संशयित वस्तू आणि प्रवाशांवर पोलिसांची करडी नजर

**सोलापूर, दि. १० मे-**

भारत-पाकिस्तान यांच्यात सुरू असलेल्या युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर रेल्वे स्थानकावर सुरक्षा यंत्रणा वाढवण्यात आली असून संशयित वस्तू आणि प्रवाशांवर रेल्वे सुरक्षा बल, लोहमार्ग पोलिसांची करडी नजर असल्याचे पोलीस निरीक्षक संतोष गायकवाड यांनी सांगितले. देशातील प्रमुख रेल्वे स्थानकांपैकी एक असलेल्या सोलापूर रेल्वे स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. दक्षिणेला जोडणारा महत्त्वाचा दुवा असलेल्या सोलापूर रेल्वे स्थानकावर सुरक्षा यंत्रणा वाढवण्यात आली आहे. पाकिस्तानकडून गुरुवारी ड्रोनद्वारे भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. परंतु भारतीय वायुदलाने हवेतच त्यांचे ड्रोन नष्ट करून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे. सीमेपलीकडून भारतात अतिरेकी घुसविण्याचा नापाक प्रयत्नही पाकिस्तानाकडून होत आहे. त्यामुळे देशभरातील महत्त्वाचे रेल्वे स्थानक, विमानतळ, प्रमुख शैक्षणिक संस्था आणि सैन्य दलाचे केंद्र आदी परिसरात अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था प्रदान करण्यात आली आहे.

# सिव्हिलमधील गैरसोयींवर खा. प्रणिती शिंदे संतापल्या

### रुग्णसेवा सुधारण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मे-**

खासदार प्रणिती शिंदे यांनी शनिवारी अचानक सिव्हिल रुग्णालयाला भेट देऊन रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले. रुग्णालयातील अनागोंदी कारभार, रुग्णसेवेतील कमतरता आणि प्रशासकीय ढिसाळपणा पाहून खासदार शिंदे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यांनी रुग्णालय प्रशासनाला तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले असून, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी पत्रव्यवहार करून रुग्णांची हेळसांड थांबवण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.



प्रणिती शिंदे यांच्या भेटीदरम्यान रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयातील अनेक गैरसोयींचा पाढा वाचला. रुग्णांना तपासणीसाठी स्वतःच्या नातेवाईकांना स्ट्रेचरवर घेऊन जावे लागते, कारण वॉर्ड बॉय उपलब्ध नसतात. केस पेपर काढण्यासाठी दोन-तीन तास रांगेत उभे राहावे लागते, तर बाहेरगावाहून येणाऱ्या रुग्णांना उपचार न मिळता दोन-तीन दिवसांनी परत येण्यास सांगितले जाते. यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे खासदार शिंदे यांच्या निदर्शनास आले.

सिव्हिल रुग्णालयाच्या आवारातील ए-ब्लॉकसमोरील बगीच्याच्या मोकळ्या जागेवर प्रशासनाने इमारत बांधण्याचे नियोजन केले आहे. या बगीच्याचा उपयोग रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक विश्रांतीसाठी करतात. या प्रस्तावित बांधकामाला रुग्ण, नातेवाईक आणि सामाजिक संघटनांनी तीव्र विरोध केला आहे. खासदार शिंदे यांनी या मुद्द्याची गंभीर दखल घेत बांधकामाला तात्पुरती स्थगिती देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांनी रुग्ण आणि नातेवाईकांसाठी मोकळी जागा उपलब्ध राहावी, यासाठी प्रशासनाशी चर्चा करणार असल्याचे स्पष्ट केले.

खासदार प्रणिती शिंदे यांनी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे. रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत, औषधांचा पुरवठा नियमित व्हावा, आणि प्रशासकीय सुधारणा व्हाव्यात, यासाठी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना यामध्ये लक्ष घालण्या बाबतच्या सूचना करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. तसेच, रुग्णालयातील कर्मचारीवर्ग वाढवणे, सिटीस्कॅन आणि इतर सुविधांसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करणे, आणि रोख शुल्क आकारणीवर नियंत्रण आणण्यासाठी जिल्हाधिकारी आणि राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार करणारा असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

#### सिटीस्कॅन सुविधेतील त्रुटी

खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नातून सिविल रुग्णालयाला ८ मार्च रोजी कोट्यवधी रुपयांची अत्याधुनिक सिटीस्कॅन मशीन उपलब्ध झाली. मात्र, या सुविधेचा पूर्ण क्षमतेने उपयोग होत नसल्याचे त्यांनी शनिवारी रुग्णालयातील सिटीस्कॅन विभागाला भेट दिल्यावर लक्षात आले. यावेळी रुग्णांनी सांगितले की, सिटीस्कॅनसाठी शुल्क आकारले जाते, परंतु त्याची फिल्म दिली जात नाही; केवळ मोबाइलवर फोटो स्वरूपात पाठवली जाते. तसेच, सिटीस्कॅन युनिटमध्ये केवळ एकाच कर्मचाऱ्याची नियुक्ती आहे, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना स्वतः रुग्णांना सिटीस्कॅन रूमपर्यंत न्यावे लागते. एमआरआय, सिटीस्कॅन आणि एक्स-रे यांचे रिपोर्ट वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी समोर आल्या.

#### रुग्णांनी मांडल्या खा. शिंदेसमोर तक्रारी

रुग्णांनी खासदार शिंदे यांच्याकडे केलेल्या तक्रारींनुसार, येथील रुग्णांना महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेतून औषधे दिली जात नाहीत. त्याऐवजी रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगितले जाते. एक्स-रे आणि सोनोग्राफी यांसारख्या सुविधांसाठी रोख रक्कम आकारली जाते, जी ऑनलाइन स्वीकारली जात नाही. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांची वरिष्ठ डॉक्टरांकडून तपासणी केली जात नसल्याचा गंभीर आरोप रुग्णांनी केला.



## सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जय हिंद यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

भारतीय सैन्य आणि सशस्त्र दलासोबत काँग्रेस पक्ष आणि देशवासीय ठामपणे उभे आहेत. भारतीय सैन्यदलाचे मनोबल वाढविण्यासाठी, ज्या भारतीय सैन्यामुळे देश आणि आपण सगळे सुरक्षित आहोत त्यांच्या समर्थनार्थ खासदार प्रणिती शिंदे आणि काँग्रेसच्या नेतेमंडळींच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सोलापुरात जय हिंद यात्रा काढण्यात आली. शनिवार सायंकाळी ठिक ७:३० वाजता चार हुतात्मा पुतळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा या मार्गावर जय हिंद यात्रा काढण्यात आली. या जय हिंद यात्रेत सोलापूर शहरातील काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी, माजी नगरसेवक, नगरसेविका, ब्लॉक फ्रंटल सेल अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभागी घेतला होता.

## तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात ऐतिहासिक करार

### विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला ५.७८ लाख एकर सिंचन लाभ होणार : देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० मे-**

तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत आज महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये एका ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सुमारे १९,२४४ कोटींच्या या करारामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला मोठा लाभ मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भोपाळ येथे दिली. सिंचन आणि जलविद्युत प्रकल्पांबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची बैठक आज भोपाळ येथे झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, कुंवर विजय शाह आणि दोन्ही राज्यांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना याबाबत माहिती दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशसाठी ऐतिहासिक आहे. ताप्ती मेगा रिचार्ज प्रकल्पाचा आम्ही पूर्वीच संकल्प केला होता. आज त्यावर दोन्ही राज्यांनी सहमती केली आणि त्यासाठी सामंजस्य करार झाला. यापूर्वी ही बैठक २००० मध्ये बैठक झाली होती, त्यानंतर २०२५ मध्ये ही बैठक झाली. परंतू या प्रकल्पाबाबत दोन्ही राज्य परस्परांच्या संपर्कात होते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी आंतरराज्य जलकरारांना गती देण्यास सांगितले आणि २०१६ पासून आम्ही याला गती दिली. तापी मेगा रिचार्ज हे जगातील एक आश्चर्य आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला २,३४,७०६ हेक्टरला सिंचनलाभ होईल, तर मध्यप्रदेशला १,२३,०८२ हेक्टर सिंचनलाभ मिळेल. महाराष्ट्रात जिथे खारपाणपट्टा आहे आणि त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या आणि सिंचनाच्या समस्या आहेत, तेथे मोठा लाभ या प्रकल्पामुळे होणार आहे. यात जळगाव, अकोला, अमरावती, बुलढाणा या पट्ट्यात मोठा दिलासा मिळेल. शेतकर्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल. केंद्रीय योजना म्हणून याचा स्वीकार व्हावा, अशी विनंती आता आम्ही दोन्ही मुख्यमंत्री मिळून केंद्र सरकारकडे पुन्हा करणार आहोत.

#### असा आहे तापी मेगा रिचार्ज प्रकल्प

● तापी नदीवर मध्यप्रदेशातील खरिया गुटी घाट येथे धरण ● एकूण सिंचनाला लाभ : ३,५७,७८८ हेक्टर ● महाराष्ट्राला लाभ : २,३४,७०६ हेक्टर (जळगाव, अकोला, बुलढाणा, अमरावती) (म्हणजेच सुमारे ५.७८ लाख एकर) ● मध्यप्रदेशला लाभ : १,२३,०८२ हेक्टर (बुर्हाणपूर, खंडवा) ● एकूण पाणीवापर : ३१.१३ टीएमसी ● महाराष्ट्र : १९.३७ टीएमसी/मध्यप्रदेश : ११.७६ टीएमसी ● योजनेची किंमत : १९,२४४ कोटी (२०२२-२३ ची किंमत)

## मनपा उर्दू शाळांचे आंतरशालेय क्विझ कॉम्पिटिशन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

येथील उर्दू घरात मनपा उर्दू शाळांचे अंतरशालेय क्विझ कॉम्पिटिशन मोठ्या उत्साहात पार पडले. मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी गिरीश पंडित यांच्या प्रेरणेने आणि निलोफर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उर्दू घराचे सदस्य मेहमूद नवाज व सरफराज बलूलखान उपस्थित होते. फेडरेशनचे अध्यक्ष फजल शेख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्व उर्दू शाळांतील शिक्षकांनी परिश्रमपूर्वक योगदान दिले. या स्पर्धेसोबतच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या १५ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये विशेष गुण मिळवणाऱ्या अनजलना समीर अहमद दामटे (२१८ गुण) व आयेशा अजीम शेख (२१६ गुण) यांचा गौरव करण्यात आला. ओलंपियाड परीक्षेत राज्यस्तरावर यश मिळवणाऱ्या मनपा उर्दू मुले तीनच्या दोन विद्यार्थ्यांचा - सायन माजिद चांदा (५१ रँक ) व खानसा इस्माईल बागवान (१०२ रँक) यांचा सत्कार करण्यात आला. सर्व विजेत्यांना ट्रॉफी व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

#### क्विझ कॉम्पिटिशनचे निकाल असा

मोठा गट (इयत्ता ६ वी-७ वी)
प्रथम - मनपा उर्दू मुले ३,
द्वितीय - मनपा उर्दू मुले ५,
तृतीय - मनपा उर्दू मुले ह नं २
उत्तेजनार्थ-मनपा उर्दू मुली कॅम्प.

**लहान गट (इयत्ता ४ थी -५ वी)**
प्रथम - मनपा उर्दू मुले हेडक्वार्टर,
द्वितीय - मनपा उर्दू मुले ह नं २,
तृतीय - मनपा उर्दू मुली कॅम्प
उत्तेजनार्थ-मनपा उर्दू मुले १ आदी.

## जिल्हा परिषदेतील १२९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

### ७० विनंती, ५४ प्रशासकीय, ५ आपसी बदल्यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

जिल्हा परिषदेकडून अनुकंपा भरती प्रक्रिया सुरू आहे. अनुकंपा धारकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार पद उपलब्ध व्हावे, यासाठी त्यापूर्वी बदली प्रक्रियेला सुरवात करण्यात आली आहे. बुधवारी ७ मे आणि शुक्रवारी ९ मे रोजी एकूण १२९ अधिकारी, कर्मचार्यांच्या बदल्या करण्यात आले आहेत. यामध्ये ७० विनंती, ५४ प्रशासकीय आणि पाच आपसी बदल्यांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या उपस्थितीत समुपदेशनाने ही प्रक्रिया राबविण्यात आली आहे. यामध्ये सामान्य प्रशासन, ग्राम पंचायत, आरोग्य विभाग, प्राथमिक शिक्षण, ग्रामपंचायत, महिला व बालकल्याण, कृषी, बांधकाम एक, ग्रामीण पाणीपुरवठा, पशुसंवर्धन विभागाचा समावेश आहे.

#### विभागनिहाय कर्मचारी

प्रशासन - ५०, आरोग्य - २०, ग्रामपंचायत - २५, महिला व बालकल्याण - ५, प्राथमिक शिक्षण - १, वित्त विभाग - ४, कृषी विभाग - २, बांधकाम एक - ९, ग्रामीण पाणी पुरवठा - २, पशुसंवर्धन ११ असे १२९ अधिकारी व कर्मचार्यांच्या बदल्या झाले आहेत.

अनुकंपा भरतीसाठी मोठ्या प्रमाणात जागा रिक्त व्हावे, यासाठी सर्व विभागातील कर्मचार्यांच्या रिक्त ठिकाणी बदल्या करण्यात आल्या आहेत. कर्मचार्यांना बदलीच्या ठिकाणी लगेच रुजू व्हावे, यासाठी त्यांना तत्काळ नियुक्ती आदेश दिले आहे.

**-कुलदीप जंगम,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर**

## एमपीएससीच्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेत परिस गायकवाड राज्यात दुसरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या MPSC अभियांत्रिकी स्थापत्य विभाग- २०२३ चा अंतिम निकाल शुक्रवारी लागला. यामध्ये परिस सुरेश गायकवाड यांनी राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे .तो आता उप कार्यकारी अभियंता पदावर रुजू होईल. राज्यातील पाणीपुरवठा अगर जलसंपदा विभागात संधी मिळू शकते.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या तथा मनोरमा बँकेच्या कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड व सोलापूर बार असोसिएशनसचे माजी अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड यांचे ते ज्येष्ठ सुपुत्र आहेत परिस गायकवाड हे ऑगस्ट २०१९ पासून महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागात शाखा अभियंता म्हणून कार्यरत होते. ते वर्षभरापासून राष्ट्रीय महामार्ग नॅशनल हायवे विभागात शाखा अभियंता या पदावर सेवा बजावत आहेत. आपली नोकरी सांभाळत त्यांनी हे घवघवीत यश संपादन केले आहे.त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. परिस गायकवाड यांचे शालेय शिक्षण सोलापूर येथील सेंट जोसेफ इंग्लिश स्कूलमध्ये झाले, पुढे त्यांनी सिव्हिल इंजिनिअरीग चा डिप्लोमा शासकीय तंत्रनिकेतून सोलापूर येथे पूर्ण केला. तर उच्च शिक्षण मुंबई येथील सरदार वल्लभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय येथे बी टेकची पदवी मिळवली. त्यानंतर पुढे महाराष्ट्र राज्याच्या सरळ सेवा भरती प्रक्रिया परीक्षेत राज्यात दहावी रँक पटकावून त्यांनी शासकीय सेवेत प्रारंभ केला होता. विशेष म्हणजे त्यांनी मार्गदर्शन केलेले सुमारे दोन डझन विद्यार्थी शासकीय सेवेत रूजू झाले आहेत.ते उत्तम मार्गदर्शक म्हणून देखील परिचीत आहेत.त्याचे मूळचे गाव बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) हे आहे . त्याचे आजोबा भालचंद्र तुकाराम गायकवाड हे सेवानिवृत्त नायब तहसीलदार आहेत.

## ऋतिक व राकेश रोशन पहिल्यांदा पडद्यावर एकत्र

**सोलापूर :** एक्सॉनमोबिल ल्युब्रिकण्ट्स प्रा. लि. या भारतातील मोबिल ब्रॅण्डेड ल्युब्रिकण्ट्सची विक्री करणाऱ्या एक्सॉनमोबिल सहयोगी कंपनीने आज त्यांच्या सुरू असलेल्या 'अनफर्गेटेबल जर्नी' मोहिमेचा भाग म्हणून नवीन जाहिरातीच्या लाँचची घोषणा केली. या जाहिरातीमध्ये जगातील आघाडीचा सिन्थेटिक इंजिन ऑईल ब्रँड मोबिल १ वर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे.नवीन जाहिरातीमध्ये बॉलिवुड आयकॉन ऋतिक रोशन आणि त्याचे वडिल भारतीय चित्रपट निर्माते व दिग्दर्शक राकेश रोशन पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र आले आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender call Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000036316 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 01/2025-2026, Particulars :-** Annual contract for transportation, loading, unloading, winching, turning & clearing, dismantling & erection of power transformers / ICTs / reactors, weights ranging from 20 MT to 180 MT by standard / Hydraulic trailors for various EHV substations under EHV O&M Circle, Solapur **Estimated cost:** Rs. 50,00,000/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 50,000/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 09.05.2025 to 25.05.2025 **Last Date of Submission:** 25.05.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 26.05.2025 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details please visit to https://srmetender.mahatransco.in.
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भारताने जिंकली २ सुवर्णांसह पाच पदके

◆ **शांघाय, १० मे**

येथे आयोजित तिरंदाजी विश्वचषक द्वितीय चरणाच्या स्पर्धेत भारतीय संघाने पाच पदके जिंकलीत, यात दोन सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्यपदकांचा समावेश आहे. भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अमरावतीच्या मधुरा धामणगावकरने अप्रतिम कामगिरी करत पहिले वैयक्तिक विश्वचषक सुवर्णपदक पटकावले. भारतीय पुरुषांच्या कम्पाऊंड संघाने सुवर्णपदक जिंकले.

गत ३ वर्षांपासून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अनुपस्थित राहिल्यानंतर २४ वर्षीय मधुराने जोरदार पुनरागमन केले. तिने अखेर दोन परिपूर्ण १० अचूक लक्ष्यासह सुवर्णपदक जिंकले. मधुरा तिसऱ्या फेरीत ८१-८५ ने पिछाडीवर होती, पण तिने दबावाखाली उल्लेखनीय संयम दाखवला. तिने चौथ्या चरणात अचूक लक्ष्य साधत एकूण ११० गुणांची बरोबरी केली. निर्णायक फेरीत तिने दोन परिपूर्ण १०-एस मध्यभागी लक्ष्य साधले व ९ गुणांसह पिछाडी भरून काढत क्रेहेवर एक गुणाने मात केली.

मधुराचे या स्पर्धेतील हे तिसरे पदक होते. यापूर्वी तिने अभिषेक वर्मासोबत महिला सांघिक स्पर्धेत रौप्य आणि कम्पाऊंड मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.



सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघातील तिरंदाज

**पुरुष संघानेही सुवर्णपदक जिंकले**

भारतीय पुरुषांच्या कम्पाऊंड संघात अभिषेक शर्मा, ओजस देवतळे आणि तरुण ऋषभ यादवचा समावेश आहे. भारताने एका रोमांचक सामन्यात मेक्सिकोचा २३२-२२८ असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. भारताने पहिल्या फेरीत जवळजवळ निर्दोष ५९ गुणांसह २ गुणांची आघाडी घेतली, तर मेक्सिकोचा ५७ गुण होता. दुसऱ्या फेरीत मेक्सिकोने ५८ गुणांसह मुसंडी मारली, तर मध्यंतरापर्यंत भारताने ५६ गुणांसह सामना ११५-११५ अशी बरोबरीत साधली. तिसऱ्या फेरीत भारताने पुन्हा ५८ गुणांसह आघाडी घेतली, कारण मेक्सिकोने ५७ गुण नोंदवले व भारतीयांना १७३-१७२ अशी थोडीशी आघाडी मिळवून दिली.

भारतीय त्रिकुटाने अंतिम फेरीत आपली ताकद कायम ठेवली आणि उत्कृष्ट ५९ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर मेक्सिकोला केवळ ५६ गुण मिळू शकले.

**लॉस एंजेलिस ऑलिम्पिक भारताला पदकाची आशा**

लॉस एंजेलिस ऑलिम्पिक-२०२८ च्या आधी भारताला आशादायक चिन्हे दिसत आहे. ऑलिम्पिकच्या तयारीच्या बाबतीत हे निकाल भारतासाठी आशादायक आहेत. कम्पाऊंड तिरंदाजी ऑलिम्पिकमध्ये पदार्पण करण्यासाठी सज्ज आहे. मिश्र संघ श्रेणी असेल जिथे भारत खेळांमध्ये ऐतिहासिक पदक मिळवू शकेल.

**ऋषभ यादवला कांस्य**

नंतर २२ वर्षीय ऋषभने वैयक्तिक स्पर्धेतही पदक जिंकले. त्याने शूट-ऑफमध्ये दक्षिण कोरियाच्या किम जोंगोचा पराभव करून कांस्यपदक जिंकले.

**महिला संघाला रौप्यपदक**

भारतीय महिलांच्या संघाला मेक्सिकन संघाविरुद्ध पराभव पत्करावा लागला. ज्योती सुरेखा वेन्नम, मधुरा धामणगावकर आणि चिकिथा तनिपार्थी यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाचा २२१-२३४ असा पराभव झाला, परिणामी त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

**मिश्र संघाला कांस्यपदक**

कम्पाऊंड मिश्र सांघिक स्पर्धेत अभिषेक वर्मा व मधुरा धामणगावकर अंतिम फेरीत पोहोचू शकले नाहीत, परंतु कमी गुणसंख्येच्या सामन्यात भारतीय जोडीने मलेशियावर विजय मिळवून कांस्यपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

# आयपीएलमधील परदेशी खेळाडू मायदेशी रवाना

◆ **नवी दिल्ली, १० मे**

भारत-पाकिस्तान सीमा तणावामुळे इंडियन प्रीमियर लीग आठवडाभर थांबल्यामुळे आयपीएल फ्रॅन्चायझींमधील बहुतेक परदेशी खेळाडू शनिवारी आपापल्या देशात रवाना झाले.

जम्मू आणि पठाणकोट या शेजारच्या शहरांमध्ये हवाई हल्ल्याच्या सूचनांमुळे धर्मशाळेतील पंजाब किंग्ज विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स सामना अर्ध्यावरच रद्द झाल्यानंतर शुक्रवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली. स्पर्धा स्थगित झाल्यानंतर, विविध फ्रॅन्चायझींमधील खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ आपापल्या गावी परतण्यास सुरुवात केली आहे, तर अनेक परदेशी खेळाडू घरी परतण्यास तयार आहेत.

आमचे खेळाडू आणि विस्तारित कर्मचारी सुरक्षितपणे बंगळुरूला परतले आहेत आणि आता त्यांच्या संबंधित देशांत व शहरात घरी परतले आहेत, असे आरसीबीने एका निवेदनात म्हटले आहे. आरसीबीच्या परदेशी पथकात टिम डेव्हिड, लियाम लिव्हिंगस्टोन, जेकब बेथेल, रोमारियो शेफर्ड, फिलिप साल्ट, जोश हेझलवुड, लुंगी नगिदी आणि नुवान तुषारा यांचा समावेश आहे.

परदेशी सपोर्ट स्टाफमध्ये मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर, गोलंदाजी प्रशिक्षक अ‍ॅडम ग्रिफिथ, क्रिकेट ऑपरेशन्सचे संचालक मो बोबॅट, संघाचे फिजिओ इव्हान स्पीचली आणि विश्लेषक फ्रेडी वाइल्ड यांचा समावेश आहे. बीसीसीआय, स्थानिक अधिकारी आणि पोलिसांच्या जलद समन्वय आणि पाठिंब्याबद्दल आम्ही त्यांचे मनापासून आभारी आहोत, ज्यामुळे हे शक्य झाले, असे आरसीबीच्या निवेदनात म्हटले आहे.

लखनौ सुपर जायण्ट्सच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला पुष्टी दिली की, त्यांचे काही परदेशी खेळाडू शनिवारी विमानाने मायदेशी रवाना झाले, तर काहींनी सध्या तरी तिथेच राहण्याचा पर्याय निवडला. मुंबई इंडियन्स (एमआय) आणि कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) सारख्या इतर फ्रँचायझींसाठी, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही खेळाडू देखील आपापल्या ठिकाणी रवाना झाले आहेत. एका सूत्रानुसार, केकेआरचे खेळाडू हैदराबादहून रवाना झाले, जिथे त्यांचा शनिवारी सनरायझर्स हैदराबादशी सामना होणार होता.

दरम्यान, संबंधित अधिकारी आणि भागधारकांशी सल्लामसलत करून उर्वरित सामन्यांसाठी सुधारित वेळापत्रक जाहीर केली जातील, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया म्हणाले. (वृत्तसंस्था)




## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - १२

## रनिंगसाठी श्वास घेण्याचे तंत्र

### Breathing Techniques

रनिंग करताना योग्य Breathing Techniques वापरणं अत्यंत महत्त्वाचं आहे. यामुळे शरीराला अधिक ऑक्सिजन मिळतो, थकवा उशिरा येतो, गती टिकते आणि धावण्याचा फॉर्म सुधारतो.

नाक आणि तोंडाने श्वास घेणं: फक्त नाकाने श्वास घेतल्यास मर्यादित ऑक्सिजन मिळतो. धावताना नाक आणि तोंड दोन्ही वापरून खोल श्वास घेणे जास्त फायदेशीर ठरते. यामुळे अधिक ऑक्सिजन शरीरात प्रवेश करतो आणि तुम्ही जास्त काळ गती टिकवू शकता

### Breathing Techniques

१. Diaphragmatic Breathing (पोटातून श्वास घेण्याचा सराव):

शांत बसून किंवा झोपून पोटावर एक हात ठेवा.

श्वास घेताना पोट बाहेर फुगवायचं, छाती कमी हलावी.

श्वास सोडताना पोट आत खेचायचं.

दररोज ५-१० मिनिटं सराव करा.

फायदा: रनिंग दरम्यान खोल आणि स्थिर श्वास घेता येतो.

२. Box Breathing:

४ सेकंद श्वास घ्या ४ सेकंद श्वास रोखा ४ सेकंद श्वास सोडा ४ सेकंद श्वास थांबवा.

५-१० फेऱ्या करा.

फायदा: श्वासोच्छ्वासावर नियंत्रण वाढतो आणि मन शांत राहतं.

३. Rhythmic Breathing Drill :

चालताना किंवा हळूहळू धावताना ३:२ किंवा २:२ पॅटर्न सराव करा.

उदा. ३ पावलांवर श्वास घ्या, २ पावलांवर श्वास सोडा. (३:२) किंवा २ पावलांवर घ्या, २ पावलांवर सोडा. (२:२)

फायदा: धावण्याचा रिदम सुधारतो आणि थकवा कमी होतो.

४. Breath-Hold Running: (थोडं अ‍ॅडव्हान्स्ड आहे, सावधगिरीने करा.)

काही सेकंदांसाठी श्वास रोखून, नंतर सामान्य धावणं करा.

उदाहरणार्थ, २० सेकंद श्वास रोखा, मग मोकळं श्वास घेत धावणं सुरू ठेवा.

फायदा: ऑक्सिजनची कार्यक्षमता वाढवतो आणि मानसिक ताकदही मजबूत होते.

### Breathing सुधारण्याचे फायदे

▶ रनिंग करताना थकवा कमी होतो. ▶ गती आणि सहनशक्ती सुधारते. ▶ मन शांत राहतं आणि लक्ष केंद्रित राहतं. ▶ शरीराला अधिक ऊर्जा मिळते. ▶ सराव कसा करावा ▶ धावताना पोटाकडे लक्ष देत खोल श्वास घ्या. ▶ रनिंग दरम्यान श्वासाचा ठराविक रिदम राखण्याचा प्रयत्न करा. ▶ नियमित प्राणायाम किंवा Breathing drills (जसे Box Breathing ) केल्यासही फायदा होतो. ▶ योग्य Breathing Techniques वापरल्यास धावणं अधिक सहज आणि प्रभावी होतं!

**-अतिश शहा**

फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

# जीएच रायसोनी मेमोरियल चषक जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा उद्या सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

जीएच रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन, कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशन व सोलापुर चेस अर्कॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने सोमवार १२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता टाकळीकर मंगल कार्यालय, जुळे सोलापूर येथे खुल्या तसेच ११ वर्षाखालील मुले व मुलींच्या जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ८ फेऱ्यात संपन्न होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी १० मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. खुल्या गटातील प्रथम क्रमांकासाठी रु. ७००० पासून रु. ४०० अशी पंधरा तसेच सर्वोत्तम मुली, १५, ११, ८ या विविध गटात प्रत्येकी दहा आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आलेले असून एकूण रोख पारितोषिकांसह ७५ बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत.

११ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील प्रथम येणाऱ्या दोन खेळाडूंची निवड राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना प्रत्येकी रु. १००० राज्य स्पर्धा खेळून आल्यानंतर देण्यात येणार असून स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना एकूण रु. ४१००० पर्यंतची रोख बक्षिसे, आकर्षक 'जीएच रायसोनी चषक' व मेडल्स देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशनचे सचिव भूषण श्रीवास यांनी दिली. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ अथवा प्रशांत पिसे मो.क्र. ९१५६८१५९६३ यांच्याकडे संपर्क साधावा, असे सोलापुर चेस अर्कॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर व सचिव आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी कळविले आहे.

या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.

# मॉडेल क्रिकेट अकादमीस विजेतेपद

## उदगीरी चषक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा : झैद शेख सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१० मे-**

मॉडेल क्रिकेट अकादमीने उदगीरी करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

मास्टर्स अकादमीने आयोजित केलेली ही स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडली. शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात मॉडेल क्रिकेट अकादमीने सोलापूर स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटचा ४९ धावांनी पराभव केला. मॉडेल अकादमीने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ४० षटकात ९ बाद २०२ धावा केल्या. यात कार्तिक पाटोळे व गौरव गाडेकर यांनी ३३ तर झैद शेख याने ३१ धावा केल्या. सोलापूर स्पोर्ट्सकडून नीतिकेश महांकाळ याने ३७ धावात दोन बळी टिपले.



**गोविंदराज पुंजालची चार पारितोषिके**


वैयक्तिक पारितोषिके याप्रमाणे : मालिकावीर, फलंदाज, गोलंदाज व सर्वाधिक षटकार मारणारा : गोविंदराज पुंजाल. सर्वाधिक चौकार मारणारा खेळाडू, यष्टिरक्षक व क्षेत्ररक्षक : अप्पू स्वामी.

विजयी २०३ धावाचे लक्ष्य गाठणाऱ्या सोलापूर स्पोर्ट्सचा डाव २९.१ षटकात १५३ धावात संपुष्टात आला. सोलापूर स्पोर्ट्सकडून गोविंदराज पुंजाल ४८ व अप्पू स्वामीने ३५ धावा केल्या. मॉडेलकडून झैद शेख याने २३ धावा ४ गडी बाद केले. झैद सामन्याचा मानकरी ठरला.

**सर्वाधिक अर्धशतक करणारा खेळाडू :** अभिषेक देशमुख. **सर्वाधिक मेडनवर टाकणारा खेळाडू :** झैद शेख. **जास्त स्टंपिंग केलेला खेळाडू :** कार्तिक पाटोळे.

पारितोषिके सुनील जाधव, चंद्रशेखर उदगिरी, राकेश उदगिरी, अमित अंकाराम, मल्लिनाथ कटाप, सिद्धेश्वर स्वामी यांच्या उपस्थितीत देण्यात आली. पंच म्हणून अशोक डोंबाले व नबीलाल पटेल व गुणलेखक म्हणून राजवर्धन जिल्ला व वर्धन दळवी म्हणून काम पाहिले.

# बॉक्सिंग स्पर्धेत सोलापूरच्या खेळाडूंचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या मान्यतेने मुंबई शहर बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने स्मर्ट सिटी सोलापूर बॉक्सिंग अकॅडमी व क्लबच्या खेळाडूचा मुंबई महाराष्ट्र बीए बॉक्सिंग शताब्दी महोत्सव वर्ष स्पर्धेमध्ये जय कवली व हरीश पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूरच्या खेळाडूंनी सहभाग घेतला.

त्यांचे शहर तांत्रिक अधिकारी आप्पासाहेब महादेव चिंचकर, संपदा जोशी, राजीव देशपांडे, उद्योगपती निशिराज कोटा यांनी अभिनंदन केले.

**सहभागी खेळाडू :** सब ज्युनिअर : अथर्व बिद्री. ज्युनियर : विघ्नेश बुरा, तेजस देशमुख व सुरज कामूर्ती. महिला : अश्विनी देवकर. पुरुष : मनीष लिंबोळे




# एसएस क्रिकेट अकॅडमीस आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

येथील एस.एस. क्रिकेट अकॅडमीच्या १७ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत उपविजेतेपद संपादिले. नेपाळ येथे झालेल्या इंडो-नेपाळ टी-२० मालिकेत आकाश मिस्कीन यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी केली. यशस्वी संघाचे अध्यक्ष संतोष कांबळे, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत बत्तूल, सचिव वैशाली बिराजदार यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेला संघ :** प्रतिक मुशन (कर्णधार), आर्यन याटकर, सोमेश चनमल, संतोष संगणगारी, भावेश अन्नम, विश्वराज डक्का, विघ्नेश बंदगी, श्रेयस सोलंकर, विश्वास पल्ली, श्रियस गालपेल्ली, श्रीनाथ अन्नम, अथर्व देशमुख, महेंद्र मादास, तन्मय गुर्रम, सार्थक हुकिरे (यष्टीरक्षक), भावेश इटलप.

# मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयूटची हॅटट्रिक

## रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसीजन क्रिकेट स्पर्धा : यश बोरामणी सामनावीर, प्रवीण देशेट्टी मालिकावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे -**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयूटने सलग तिसऱ्यांदा रेल्वेच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसीजन क्रिकेट स्पर्धेतील अ गटाचे विजेतेपद पटकावले.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या अंतिम सामन्यात यश बोरामणीच्या अष्टपैलू खेळामुळे मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूटने मॉडेल क्रिकेट अकादमीवर ६४ धावांनी मात केली. यशने तडफदार अर्धशतक व तीन बळी टिपले. तो सामन्याचा मानकरी ठरला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात आले. अंतिम सामन्यासाठी दयानंद नवले व नितीन गायकवाड यांनी पंच तर सचिन गायकवाड यानी गुणलेखकाचे काम पाहिले.

अंतिम सामन्यानंतर अ गट व ब गटातील विजेत्या व उपविजेत्या संघांना रेल्वेचे क्रीडाधिकारी आदित्य त्रिपाठी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी रेल्वेचे अधिकारी सचिन गणेर, अभिषेक चौधरी, परिजनचे विनायक दूधगी, रणजीपटू नितीन देशमुख, रोहित जाधव, मध्य रेल्वे इन्स्टिटयूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले, खजिनदार विक्रांत पवार, कमिटी मेंबर मनोज वाल्मिकी, विक्रम माने उपस्थित होते. या स्पर्धेला वैयक्तिक पारितोषिक देऊन सहकार्य केल्याबद्दल सुदेश मालप, राजा पटेल, वासुदेव दोरनाल, वैभव इराबत्ती, प्रवीण देशेट्टी व अतुल बांडीवाडीकर तसेच सर्व खेळाडूंना ग्लुकॉन डी दिल्याबद्दल रोहित भैय्या यांचा तसेच स्पर्धा व्यवस्थित पार पाडण्यासाठी रेल्वे मैदानावर काम करणारे पंडित गायकवाड, सुमित भेंडे, कोळी, सुनील गादे, बिराप्पा बंडगर व सचिन गायकवाड यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजा पटेल यांनी केले.

तत्पूर्वी सकाळी या स्पर्धेतील अंतिम सामन्याचे उद्घाटन उद्योजक मनोज भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वरिष्ठ क्रिकेट खेळाडू के. टी. पवार, अ‍ॅड. गोविंद दाडे, रेल्वेचे वरिष्ठ खेळाडू लियाकत शेख, वासुदेव दोरनाल, मारुती जानगवळी, वैभव इराबत्ती, प्रवीण देशेट्टी, मुकुंद श्रेष्ठ उपस्थित होते.



**स्पर्धेतील पारितोषिक विजेते व उपविजेते**

**ब गट** (२१ व ११ हजार रुपये व करंडक) : परेल वर्कशॉप, ख्वाजा बंदे नवाज क्रिकेट अकादमी.

**अ गट** ( २५ व १५ हजार रुपये व करंडक ) : मध्य रेल्वे इन्स्टिटयूट सोलापूर. मॉडेल क्रिकेट अकादमी.

**वैयक्तिक पारितोषिक विजेते (एक हजार रुपये व करंडक)**

**ब गट :** मालिकावीर : रोशन पत्रे (परेल वर्कशॉप), फलंदाज: मिर्झा वासिम बेग (ख्वाजा बंदे नवाज क्रिकेट अकादमी). गोलंदाज: रोशन पत्रे (परेल वर्कशॉप).

**अ गट :** मालिकावीर व फलंदाज : प्रवीण देशेट्टी (मध्य रेल्वे). गोलंदाज : मयूर राठोड (पुष्प जिमखाना)

**संक्षिप्त धावफलक**

सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्युट सोलापूर : ४० षटकात ८ बाद २६६( प्रवीण देशेट्टी ६७, यश बोरामणी ५६, पृथ्वीराज मिसाळ ३५, मोहनिष येमूल २८, संकेत काखंडकी व जय पांढरे प्रत्येकी २ बळी, यश खळदकर व अक्षय हावळे प्रत्येकी १ बळी) विजयी विरुद्ध मॉडेल क्रिकेट अर्कॅडमी : ३६.५ षटकात सर्व बाद २०२ ( आदर्श नागोजी नाबाद ५५, सुधन्व मनुर ३७,संदीप राठोड २६, यश बोरामणी ३ बळी, अमन सय्यद २ बळी, आदित्य दडे, अझहर अलगुर, आशिष अवळे व वेदांत काळे प्रत्येकी १ बळी).

# अक्षय भाटिया चौथ्या स्थानावर

**फिलाडेल्फिया :** येथे सुरु असलेल्या ट्रूइस्ट गोल्फ स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी भारतीय गोल्फर अक्षय भाटियाने बरोबरीत पारचा एक राउंड खेळला आणि ६३-७० च्या कार्डसह अव्वल पाच मध्ये स्थान मिळविले. तो सध्या संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे. दिवस अखेर भाटियाने स्टिन थॉ स (६६-६७), रोरी मॅकइलरॉय (६६- ६७), कॉलिन मोरिकावा (६३-८०), सी वू किम (६५-६९) आणि पॅट्रिक कॅन्टले (६५-६८) यांच्यासोबत संयुक्तपणे चौथे स्थानावर मिळविले. हे सर्वजण सात-अंडरवर होते. ब्रिटनचा भारतीय वंशाचा अ‍ॅरोन राय (६५-७२) हा ३३ व्या स्थानावर आहे. आणखी एका भारतीय-अमेरिकन सहित थेगालाने दिवस अखेर ६१ वे स्थान मिळविले. त्याने एक ईगल, दोन बर्डी, दोन बोगी आणि एक डबल बोगीसह एक ओव्हर खेळला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

# झाडी येथे आज पाण्यासाठी होणार 'शोले स्टाईल' आंदोलन




**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि १० मे-**

शासकीय स्तरावर एकीकडे महाराष्ट्र जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला जातो मात्र झाडी (ता. बार्शी) येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत वारंवार तक्रारी व आंदोलन करूनही शासन योग्य ती कार्यवाही करत नसल्याने रविवारी ११ मे रोजी ग्रामस्थांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला आहे

झाडी (ता. बार्शी ) येथील प्रेमचंद सांगुळे यांनी पाण्याच्या टाकीच्या निकृष्ट बांधकामाबाबत २३ सप्टेंबर २०२४ रोजी एक दिवसीय आंदोलन केले होते. याची दखल न घेतल्याने ७ आक्टोंबर २०२४ रोजी दुसरे आंदोलन करण्याचे ठरले मात्र विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे शासकीय अडचणीमुळे त्यावेळी ते तात्पुरते स्थगित केले होते. आमदार दिलीप सोपल यांनी घेतलेल्या आम सभेमध्ये झाडी येथील पाणीपुरवठा टाकीच्या प्रश्नाबाबत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले होते . मात्र वारंवार निवेदने व आंदोलने करूनही संबंधित ठेकेदार योग्य त्या दर्जाचे काम करत नसून निकृष्ट दर्जाचे काम करत असल्याचा आरोप करीत ग्रामस्थ ११ मे रोजी रविवारी सकाळी दहा वाजता आंदोलन करणार आहेत.

## महत्वाचे...

### अकोले येथील प्रतिभा पाटीलची सहा.गटविकास अधिकारी पदास गवसणी

**टेंभुर्णी , दि.१० मे-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेतून अकोले-खुर्द (ता.माढा) येथील प्रतिभा रामभाऊ पाटील हिने सहा. गटविकास अधिकारी पदास गवसणी घातली आहे. प्रतिभा पाटील हिने यापूर्वी एमपीएससी मधून विक्रीकर निरीक्षक हे पद मिळविले आहे.तिचे शिक्षण अकोले-खुर्द येथील बबनरावजी शिंदे विद्यालयात झाले असून तिने पुणे येथील फ्रर्ग्युसन कॉलेजमधून बीएस्सी पदवी मिळविली आहे.ती लहानपणापासूनच हुशार विद्यार्थिनी म्हणून परिचित होती.तिची मोठी बहीण ही यापूर्वीच एमपीएससी मधून



पोलीस उपनिरीक्षक झालेली आहे. तिच्या या यशाबद्दल माजी आ.बबनराव शिंदे,माजी आ.संजयमामा शिंदे,जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे,एपीआय अंकुश चिंतामण,प्राचार्य राजेंद्र ठोंबरे, अकोले-खुर्द ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

### वैष्णवी गायकवाडवर कौतुकाचा वर्षाव

**बार्शी, दि.१० मे-**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या अभियांत्रिकी सेवा परीक्षा २०२३ चा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेत सोलापूरची वैष्णवी राम गायकवाडने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. सोलापुरातील वैष्णवीने ऑर्चिड महाविद्यालयातून इंजिनिअरिंगची पदवी घेतली आहे. शिवाय दि बाटू विद्यापीठातूनही प्रथम क्रमांकाने पास झाली होती. तिला लहानपणापासूनच शिक्षणात गोडी होती. घरातील वातावरणही शिक्षणाला पूरक असेच आहे. तिचे वडील



आशा मराठी विद्यालय सोलापूर येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत तर आईही शिक्षिका आहे. तर तिचा लहान भाऊ हा मेडिकल अभ्यासक्रमाचा विद्यार्थी आहे. वैष्णवीने नूमविमध्ये आपले प्राथमिक शिक्षण घेतले आहे. दमाणी विद्यामंदिरात तिने हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर तिने आर्चिड महाविद्यालयातून इंजिनिअरिंगची परीक्षा पास केली आहे. २०२३ मध्ये राज्या लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत आता तिने राज्यात प्रथम क्रमांक घेत सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अभ्यासाप्रति अतिशय शिस्तबध्द असलेल्या वैष्णवीने अभ्यासाची ठरवलेली वेळ कधीही चुकवली नाही. ती आपल्या यशाचे श्रेय आपल्या शिक्षकांसह आई व वडिलांनाही देते. त्यांच्यामुळेच मला हे यश मिळाल्याचे ती अभिमानाने सांगते. तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## निधन वृत्त...

### भास्करराव कुलकर्णी-पटवारी



**सोलापूर, दि. १० मे-**

बऱ्हाणपूर (ता. औसा) येथील रहिवासी भास्करराव वामनराव कुलकर्णी- पटवारी यांचे शनिवार, दि. १० मे रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात चार मुले, चार सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. दैनिक पुण्य नगरी सोलापूर आवृत्तीचे विभागीय व्यवस्थापक व्यंकटेश पटवारी यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. ११ मे रोजी सकाळी १० वाजता बऱ्हाणपूर (ता. औसा, जि. लातूर) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### शिवाजीराव पवार



**माळशिरस, दि. १० मे-**

शिंदेवाडी (ता. माळशिरस) येथील. शिवाजीराव पांडूरंग पवार,(तात्या) वय ७२ यांचे नूकतेच अल्पशा आजाराने निधन त्यांचे मागे एक मूलगा,एक मूलगी, पत्नी, सूना, नातवंडे असा परीवार आहे.

### हुसेन शेख



**माळशिरस, दि. १० मे-**

येथील सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक हुसेन महिबूब शेख (वय ८३ वर्षे) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते विधिज्ञ साजिद शेख यांचे वडील होते.

# बाजार समिती सभापतीचा फैसला आज

● सभापतीपदी सुरेश हसापूरे कि दिलीप माने उत्सुकता; आमदार कल्याणशेट्टी यांना अंतिम अधिकार






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १०-**

सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीचा फैसला आज होणार असून निवडीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहीले आहे. बाजार समितीच्या सभापतीपदी माजी आमदार दिलीप माने कि सुरेश हसापूरे हे निश्चित होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आलेले नाव आमदार सचिन कल्याणशेट्टी सभापती जाहीर करणार आहेत.

बाजार समितीच्या निवडणूकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार दिलीप माने व दक्षिणचे नेते सुरेश हसापूरे यांच्या पॅनेलने विजय मिळविल्यावर सभापती पदाविषयी चुरस निर्माण झाली आहे. आमदार कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीवर वर्चस्व मिळविल्याने सभापती पदाचे दावेदार असणारे माने , हसापूरे व शिवदारे यांनी शुक्रवारी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली. इच्छुकांनी सभापती निवडीचे अधिकार मुख्यमंत्री फडणवीस यांना दिली आहेत. मुख्यमंत्र्यांनी नाव जाहीर करण्यापूर्वी सर्व नेत्यांनी एकत्र राहून यापुढील निवडणूका लढविण्याविषयी सूचना केली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री आमदार कल्याणशेट्टी यांच्याशी चर्चा करून सर्वसमावेशक नाव जाहीर करणार असल्याचे सांगण्यात येते.

आमदार कल्याणशेट्टी यांनी माने, हसापूरे व शिवदारे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घडवून सविस्तर चर्चा केली असली तरी सभापती पदाचे नाव मात्र आज सकाळी नऊ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री आमदार कल्याणशेट्टी यांना नाव सूचविल्यावर सभापतीचे नाव जाहीर करणार आहेत. मात्र सभापती पदाचे दावेदार असणार्या नेत्यांनी मुंबई दौरा केल्यामुळे शनिवारी दिवसभर विविध चर्चांना उधाण आले होते. प्रत्येकांचे कार्यकर्ते आपलाच नेता सभापटी होणार असे सांगत निवडीविषयी चुरस निर्माण करताना दिसत होते.

बाजार समिती निवडणुकीपूर्वी आमदार कल्याणशेट्टी यांच्यासह सुरेश हसापूरे व पॅनलमधील सर्व नेते यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची दोन वेळा भेट घेऊनच निवडणूकीची रणनीती आखल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे निवडणूकीत विजय मिळविल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सत्कार केला. तसेच सभापती निवडीचे सर्वाधिकार देण्यात आले.

### सकाळी नऊ वाजता होणार नाव जाहीर

माने, हसापूरे व शिवदारे यांनी मुंबई दौरा करून मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्री रविवारी सकाळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना सभापती पदाचे नाव सांगितल्यानंतर सकाळी नऊ वाजता अर्ज भरण्यापूर्वी नाव जाहीर करणार आहेत.

### मुख्यमंत्री फडणवीस यांना सर्वाधिकार

बाजार समितीच्या सभापती पदासाठी दिलीप माने व मी इच्छुक आहे. आमच्यात सभापती पदावरून मतभेद नाहीत. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन सभापती निवडीचे सर्व अधिकार त्यांच्याकडे सोपविले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमदार कल्याणशेट्टी यांच्याकडे नाव पाठवावे, असे सर्वानुमते ठरले आहे.

**- सुरेश हसापूरे, संचालक, बाजार समिती सोलापूर**

# शिक्षणासाठी आपले घरच पहिले शिक्षण केंद्र : सुनेत्रा पवार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० मे -**



शिक्षणासाठी आपले घर हे पहिले शिक्षणकेंद्र असून व्यावहारिक जीवनात आपण यशस्वी होण्यासाठी दर्जेदार शालेय शिक्षण घेणे खूप आवश्यक असल्याचे तसेच प्रत्येकाकडील एक चांगला गुण आपण अवगत करण्याचे आवाहन संस्था सचिवा सुनेत्राताई पवार यांनी केले.

भगवान श्री सत्यसाई यांचे मातोश्री ईश्वराममा व छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून रुक्मिणी विद्यापीठाच्या संस्थापक सचिवा सुनेत्रा पवार यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रुक्मिणी विद्यापीठाने ६ मे हा दिवस कर्मचारी दिवस म्हणून साजरा करणार असल्याचेही यावेळी त्यांनी जाहीर करून रुक्मिणी विद्यापीठाच्या कर्मचारी वर्गासाठी उत्कृष्ट कर्मचारी म्हणून पुरस्कार देणार असल्याचेही सांगितले. यावर्षीचे उत्कृष्ट कामगार म्हणून प्रमोद हुंगे. लिपिक, माताजी निर्मलादेवी प्राथमिक विद्यामंदिर व आशाताई अवघडे. सेविका, अक्षरनंदन प्राथमिक विद्यामंदिर यांना रोख रक्कम, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्हे देऊन त्यांना सन्मानित केले व हा पुरस्कार प्रत्येक वर्षी देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

कार्यक्रमात मातोश्री ईश्वरामा जुनियर कॉलेजच्या एच. एस. सी. मार्च २०२५ विशेष उत्तीर्ण झालेल्या विज्ञान शाखा चि. रेहान अतीक मुल्ला, चि. आदित्य घाडगे वाणिज्य शाखा शिंदे प्रसाद शंकरराव, ढोकळे प्रफुल्ल गौतम. कलाशाखा राजपाल नारायण रवी, कृष्णा तुकाराम सुडके यांचाही मान्यवरांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी वसुधा कुंभार, मीनाक्षी भोसले, सुभद्रा पांढरे, सविता लोखंडे, जयश्री खडतरे, फरहाणा कादरी यांचाही सन्मानचिन्ह शाल व साडीचोळी देऊन यथोचित सत्कार केला.

यावेळी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुनंजय पवार. प्राचार्य नंदिनी गायकवाड, मुख्याध्यापक संतोष कवडे, काशिनाथ गोगाव यांच्यासह रुक्मिणी परिवार व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन विभावरी डुबल यांनी केले तर आभार सविता लोखंडे यांनी मानले. महेश भोसले, काशिनाथ गोगाव, कुमुदिनी सरदार यांनी परिश्रम घेतले.

# आचेगावच्या विश्रांती शावरसिध्द पाटील यांचे सरपंचपद अपात्र

▸ जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या आदेशान्वये कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १० मे -**

सोलापुरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ग्रामपंचायत आचेगाव, ता. दक्षिण सोलापुर येथील विश्रांती शावरसिध्द पाटील यांचे सरपंच पद अपात्र केले आहे.

मौजे आचेगाव, ता. दक्षिण सोलापुर ग्रामपंचायतीचे सार्वत्रिक पंचवार्षिक ग्राम पंचायत निवडणुक सन २०२२-२०२७ या कालावधिकरिता श्रीमती विश्रांती पाटील यांनी ग्रामपंचायत निवडणुकी करीता प्रभाग क्र. ९९९ मधुन ओबीसी या राखीव असलेल्या जागेवर दि. ०२/१२/२०२२ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करुन निवडणुक लढवून ग्रामपंचायत सरपंच म्हणून निवडुन आले होते. सदर निवडणुकी करीता उमेदवारी अर्ज भरताना श्रीमती विश्रांती पाटील यांनी त्यांचे नावे कोणतेही शासकिय जागेवर अतिक्रमण नसल्याबाबत हमीपत्र / शपथम पत्र जोडले होते. वास्तविक पहाता, आचेगाव ग्रामपंचायत येथे गावठाण जागा हे विश्रांती पाटील यांच्या नावावर होते. तद्नंतर सरपंच पदाचा गैरवापर करुन श्रीमती विश्रांती पाटील यांनी बेकायदेशीरपणे त्यांच्या नावाची नोंद ग्रामपंचायत दप्तरी कमी



करुन घेतले. तसेच श्रीमती विश्रांती पाटील यांनी विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र देखील सदर केले नाही. सदर प्रकाराबाबत मौजे आचेगाव येथील श्री. संजयकुमार अमृतराव पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (ज-३) व ३० (१-अ) अन्वये सरपंच अपात्र ठरवुन मिळणेकरिता अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगे मा. जिल्हाधिकारी कुमार आर्शीवाद



यांनी केलेल्या चौकशी व अर्जदार यांचे विधिज्ञ यांनी केलेला युक्तीवाद वरुन विश्रांती पाटील यांनी सरकारी जागेवर अतिक्रमण केल्याचे कागदोपत्री निष्पन्न झाले असल्याने श्रीमती विश्रांती पाटील हे आदेशाच्या दिनांकापासुन मौजे आचेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य म्हणून चालु राहण्यास अपात्र ठरविण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीवाद यांनी दि. ०७/०५/२०२५ रोजी आदेश पारित केले आहे.

सदर कामी अर्जदार संजयकुमार अमृतराव पाटील यांचेकडुन ब्रम्हांडनायक लॉ असोसिट्स, ॲड. मनोज नागनाथ गुंडे, ॲड. एस. एस. रायचूरकर, ॲड. स्वाती राजकुमार बताले यांनी काम पाहिले.

# नरसिंह अवताराची रंजक कथा

**परित्राणाय साधूनां विनाशायच**
**दूष्कृसाम । धर्म संस्थापनयार्थ**
**संमवानि युगे युगे ।।**
**हा भगवतगीतेमधील जेव्हा**

आपण श्लोक वाचतो तेव्हा खरोखरच आपणास अनुभव येतो. जेव्हा-जेव्हा धर्मावर घाला घातला जातो, सर्वत्र अर्धमाचा धोका उत्पन्न होतो, भक्तगण जेव्हा ह्या संकटाने होरपळून जातात, तेव्हा परमेश्वर पुन्हा-पुन्हा पृथ्वीवर जन्म घेतो. आत्तापर्यंत गणेश, भगवान शंकर, महिषासुर मर्दिनी इत्यादी रुपे उन्मत्त राक्षसांना ठार मारण्यासाठी आलेली आहेत. खुद्द भगवान विष्णुनी ह्या पृथ्वीतलावर आपली दहा रुपे घेऊन मानवात जन्म घेतला आहे. भगवान विष्णुने मत्स्य, कर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, प्रभु रामचंद्र, भगवान कृष्ण, बौध्द व कल्की असे अवतार धारण केले आहेत. यापैकी रामाने रावणासाठी, श्री कृष्णाने कंसासाठी, वामनाने बलीसाठी, परशुरामाने आपल्या वडिलांवर अन्याय करणाऱ्या सहस्त्रार्जुनाला वठणीवर आणण्यासाठी म्हणून जन्म घेतला.

हिंदू धर्मातील मराठी महिन्याप्रमाणे चैत्रातील गुढीपाडवा झाला की ह्या सर्व पूर्णावतरांच्या जयंत्या एकामागून एक सुरु राहतात. त्यात प्रामुख्याने रामनवमी, हनुमान जयंती, महावीर जयंती, परशुराम जयंती, नरसिंह जयंती, श्री शनि जयंती, गोकुळ अष्टमी इत्यादी दुर्जनांचा नाश करुन सज्ञनांचे व धर्माचे रक्षण करण्यासाठी भगवंताला अशाप्रकारे वारंवार अवतार येऊन वसुंधरा दिन साजरा करावा लागतो.

भगवान नरसिंह हा विष्णुचा दहा अवतारापैकी चौथा अवतार मानला जातो. वैशाख शुध्द चर्तुदर्शीला हिरण्याकश्यपू या राक्षसाच्या नाशासाठी सर्व देवदेवतांच्या विनंती वरुन हा अवतार घेतला आहे. प्रत्यक्ष श्री विष्णुचाच अवतार असणारे श्री नरसिंह हे जागृत व ज्वाज्वल्य दैवत आहे. फार प्राचीन काळापासून त्यांची पूजा ह्या देशात केली जाते. सज्ञनांचा त्राता व दुष्टांचा कर्दनकाळ म्हणजे नरसिंह होय. कारण ते सात्विक, पवित्र यांचेच प्रतिक आहे.

कश्यप ऋर्षीना दोन मुले होती. त्यापैकी एकाचे नाव हिरण्याक्ष होते, तर दुसऱ्या मुलाचे नाव कश्यपू होते. त्या दोघांच्या क्रूरतेमुळे सर्व देवता व पृथ्वीवरील ऋषी-मुनी व भक्तगण त्रासून गेले होते. सर्वजण त्यांच्या अत्याचारांच्या जाचाखाली पिचत होते. पृथ्वीच्या उध्दारासाठी भगवान विष्णुंनी वराह अवतार धारण करुन हिरण्याक्षचा वध केला. आपल्या प्रिय धाकट्या भावाचा वध केला म्हणून चिडून जाऊन विष्णुला धडा शिकविण्याचा हिरण्यकश्यपू याने पण केला. अशाप्रकारे हे सर्व करण्यासाठी आपल्याजवळ सामर्थ्य पाहिजे, हे ओळखून हिरण्यकश्यपूने पर्वताच्या एक निर्जन दरीमध्ये एका पायाच्या अंगठ्यावर उभे राहून हात व दृष्टी आकाशाकडे लावून ब्रह्मदेवाची खडतर तपश्चर्येस प्रारंभ केला. तपश्चर्येचा प्रभाव एवढा होता की त्याच्या मस्तकातून धूर व अग्नी बाहेर पडून सर्वत्र ब्रह्मांडात पसररला. समुद्र आटू लागला, भूमिला भूकंपासारखा थरकाप होऊ लागला, नक्षत्रे आपोआपच गळून पडू लागली. थोडक्यात सर्वत्र हाहाःकार माजला. या सर्व संकटामुळे सर्व देवदेवता त्राही माम-त्राही माम असे ओरडत ब्रह्मदेवाकडे गेले. सर्व देव स्वः संरक्षणासाठी ब्रह्मदेवाकडे याचना करण्यासाठी आल्यामुळे अखेर ब्रह्मदेव हिरण्यकश्यपूकडे



तत्परतेने गेले. त्यावेळी हिरण्यकश्यपूच्या सभोवताली वारुळ तयार झालेले होते, त्याचप्रमाणे गवत, वेळू यामुळे त्याचे शरीर आच्छादून गेले होते. त्याची त्वचा व शरीर किड्यामुंग्यांनी पोखरले होते. हे सर्व पाहून ब्रह्मदेव विस्मयचकीत झाले आणि म्हणालो, हे कश्यप पुत्रा हिरण्यकश्यपू तुझे कलगण असो. तपाच्या योगाने तू कृतार्थ झाला आहेस. पूर्वी कोणी असे तप केलेले नाही व पुढे कोणीही करु शकेल असे वाटत नाही. मोठा मनोनिग्रह करुन तू माझ्यावर विजय मिळवला आहे, मी आता तुझे सर्व मनोरथ पूर्ण करतो. असे म्हणून ब्रह्मदेवाने आपल्या कमंडलूतील अत्यंत पवित्र असे जल हिरण्यकश्यपूच्या देहावर टाकले. ते पवित्र जल त्याच्या देहावर पडताच त्याच्या देहात एक प्रकारचे चैतन्य प्राप्त झाले. त्याची काया सुवर्णासारखी तेजस्वी झाली. हिरण्यकश्यपूला खूप आनंद झाला आणि त्याने ब्रह्मदेवाला साष्टांग नमस्कार घातला. ब्रह्मदेवाची अनेक शब्दात स्तुती करुन तो ब्रह्मदेवाला म्हणाला, हे वरदोत्तमा, जर मला पाहिजे असलेले वर देत असशील तर तू उत्पन्न केलेल्या भुतांपासून मला मृत्यु प्राप्त होऊ नये. त्याचप्रमाणे घरात-घराबाहेर, दिवसा-रात्री, भूमीवर आकाशात तसेच मनुष्य, देव, असुर, हिंस्त्रप्राणि, सत्तेजन-अचेतन वस्तू यापासून मला मृत्यु येऊ नये. कोणताही योध्दा माझ्यापेक्षा वरचढ होऊ नये. जे ऐश्वर्य कधीच नाश पावणार नाही ते मला प्राप्त व्हावे. हे सर्व ऐकून ब्रह्मदेवानेसुध्दा मागचा पुढचा विचार न करता तथास्तु म्हणून दुर्लभ असा वर दिला. अशाप्रकारचा वर प्राप्त करुन हिरण्यकश्यपू आपल्या भावाच्या मृत्युचा बदला घेण्यासाठी तत्पर झाला.

हिरण्यकश्यपूने दाही दिशा, तिन्ही लोक, देव, दानव, मानव, राजे, गंधर्व, किन्नर, गरुड, नाग, ऋषि-मुनी, भूते-प्रेते याचे अधिपत्यांना जिंकून घेतले. इंद्राच्या निवासस्थानी जाऊनही तेथे धुमाकूळ घातला. ह्या सर्व त्रासाला कंटाळून अप्सरा, देव, मानव, ऋषि हे सर्वजण भगवान विष्णुला शरण गेले. अनेक प्रकारांनी त्यांनी श्री विष्णुचे स्तवन केले. तेव्हा विष्णुंनी सर्वांची प्रार्थना ऐकून सर्वांना धीर दिला. काही काळ सहन करण्याचा सल्ला दिला.

हिरण्यकश्यपू ब्रह्मदेवाच्या वराने इतका उन्मत्त झाला होता की तो आपल्या पुत्राशी देखील व्देष करु लागला. वास्तविक पाहता हिरण्यकश्यपूचा सर्वात लहान असणारा मुलगा सद्गुणांनी श्रेष्ठ, सत्पुरुषांचा उपासक, शील संपन्न, सत्यवादी आणि जितोंद्रियही होता. त्याला अडाणी समजून हिरण्यकश्यपूने त्याला गुरु शुक्राचार्याकडे अध्ययनासाठी पाठवले. तेथेही त्यांचे शिक्षण न पटलयाने गुरु गृहाचा त्याग केला. श्री हरिचे नामस्मरण करावे, विष्णुचे किर्तन, श्रवण, भजन, वंदन, सख्य, आत्मसमर्पण अशा नऊ लक्षणांनी युक्त अशी विष्णुची भक्ती केली. हिरण्यकश्यपुने विष्णुची आराधना सोडून देऊन स्वतःचे श्रेष्ठत्व मान्य करावे यासाठी खूप प्रयत्न केले. त्याला हत्तीच्या पायाखाली चिरडून ठार मारणे, सर्पदंश करणे, पर्वताच्या शिखरावरुन ढकलून देणे, अन्नातून विषप्रयोग करणे, उकळत्या तेलात टाकणे इत्यादी मार्गाने विष्णुभक्त प्रल्हादाला ठार मारण्याचा प्रयत्न केला, पण ह्या सर्व प्रयत्नात तो अपयशी ठरला म्हणून चिडून जाऊन प्रल्हादाला म्हणाला, तु ज्याची भक्ती करतोय तो विष्णु आहे तरी कोठे ? ते सांग. त्यालाच यमसदनाला पाठवतो. शेवटी रागाने हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला विचारले की, तुझा विष्णु ह्या खांबात आहे का ? असे विचारताच प्रल्हादाने होकारार्थी मान हालवली. लगेचच हिरण्यकश्यपू खड्ग घेऊन सिंहासनावरुन उतरला आणि आपल्या मुष्टीने खांबावर प्रहार केला तोच खांबामध्ये अति भयंकर आवाज उत्पन्न झाला. खांबाचा एवढा प्रचंड आवाज झाला की संपूर्ण ब्रह्मांडात तो आवाज निनादला. नेमका आवाज कोठून आला हे हिरण्यकश्यपूला देखील समतोल नाही. प्रल्हाचे शब्द खरे करुन दाखविण्यासाठी मनुष्य व सिंहाचे असे मिश्र रुप धारण करुन अद्भुत असे नरीसिंहाचे दर्शन सर्वांनाच घडेल. त्यांचे रुप एवढे प्रचंड होते की डोळे तापलेल्या सोन्याप्रमाणे लाल होते तर मानेवरील केस विजेप्रमाणे तळपत होते. त्याचे मुख फारच आक्राळ विक्राळ व विशाल होते. दाढा भयंकर असून जिव्हा तलाप्रमाणे तळपत होत्या. तोंड व नाकपुड्या पर्वताच्या गुहेप्रमाणे विस्तृत होऊन जबडा पसरला होता. त्यांचे मस्तक तर स्वर्गाला स्पर्श करत आहे असे जाणवत होते. त्यांची नखे ही आयुधे वाटत होती. असे विश्वरुप धारण केलेल्या नरसिंह रुपाला न घाबरता हिरण्यकश्यपूने उलटपक्षी धाव घेतली, पण अग्नीमध्ये पडलेला पतंग जसा दिसेनासा होतो, त्याप्रमाणे नरसिंहाच्या तेजापुढे तो दैत्य निस्तेज झाला होता. आपल्या वरच गदेचा प्रहार करणाऱ्या हिरण्यकश्यपूलाच नरसिंहाने गदेसह वर उचलले व सुर्यास्ताच्या वेळी दाराच्या मध्ये असणाऱ्या उंबऱ्यावरच आपल्या मांडीवर उताणा पाडून आपल्या नखांनी त्याचे हृद्य विदारण केले. नंतर नेत्र क्रोधाने लाल झाल्यामुळे त्यांच्याकडे पाहणे देखील कठीण झाले होते. त्याचे मानेवरील केस रक्ताने माखून निघाले होते. हिरण्यकश्यपूला ठार मारल्यावर त्याचा देह मांडीवरुन खाली फेकून दिला व आयुधे उचलणाऱ्या राक्षसांना देखील ठार केले व स्वतः श्री नरसिंह सिंहासनावर जाऊन बसले.

देवांनी मात्र त्यांच्यावर चहुबाजूंनी पुष्पवृष्टी केली, नगोर वाजवले, अप्सरा नृत्य करु लागल्या, गंधर्व गायन करु लागले. प्रल्हादाने भगवान नरसिंहापुढे साष्टांग दंडवत घातला. प्रभुने देखील त्याच्या मस्तकावर हात फिरवून प्रल्हादाने शांत व्हा ही केलेली विनवणी ऐकून शांत झाले. भक्त प्रल्हादाच्या प्रेमरुपी भक्तीने भगवान प्रसन्न झाले व प्रल्हादास अनेक आशीर्वाद देऊन परत आल्या स्थानी निघून गेले.

**- रामकृष्ण भगवंत अघोर**
४३०, दक्षिण कसबा, सद्गुरु अपार्टमेंट,
जुने विठ्ठल मंदिराजवळ, सोलापूर - ४१३००७

## महत्वाचे...



### प्रभाग २६ मध्ये उखडलेल्या रस्त्यांची दुरुस्ती

**सोलापूर, दि. १० मे-**

प्रभाग २६ मधील हेरिटेज प्लाम, सुभाष शहा नगर, शिक्षक सोसायटी, रत्नमंजिरीनगर, येथे ड्रेनेज लाईन झाल्यामुळे रस्ते उखडले गेले होते. व जाण्या येण्यासाठी कसरत करावी लागत होती. त्याबाबत या नगरातील नागरिकांनी माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांना सदर समस्याबाबत कळविले होते. त्या समस्या बाबतीत सोलापूर महानगरपालिका आयुक्त ओंबासे यांना समस्या सांगितल्याबरोबर तातडीने संबंधित झोन अधिकारी व कर्मचारी यांनी सदर नगरातील उखडलेले रस्ते जेसीबीच्या सहाय्याने ब्रशिंग करून घेऊन नंतर मुरूम टाकून रस्ता जाण्या-येण्यायोग्य तात्काळ करून दिले. त्यामुळे तेथील नागरिकांनी जलद गतीने काम करून दिल्याबद्दल नगरसेविका राजश्री चव्हाण यांचे आभार मानले व केले कामाबद्दल कृतज्ञ व्यक्त केली. व आपले मनोगत व्यक्त केले.


आयेशा शेख


आशफिया शेख


सुरय्या शेख

### मनपा उर्दू शाळेमधील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १० मे-**

महानगरपालिका मुलांची शाळा गरिबी हटाव क्र. २, विजापूर नाका, सोलापूर येथील सहा विद्यार्थ्यांनी ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांमध्ये आयेशा अजीम शेख हिने २१६ गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या परीक्षेत सुरय्या सनाउल्लाह शेख १८६ गुण, अब्दुल्ला अबूताहेर जमादार १३६ गुण, मोहम्मद याहीया इमरान जमादार १३० गुण, आशफिया एजाज शेख १२८ गुण, मोहम्मद गौस तौफिक शेख १२४ गुण मिळाले. या यशाम ागे प्रशासन अधिकारी, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी गिरीश पंडित मार्गदर्शन लाभले. तसेच पर्यवेक्षिका रजनी राऊळ व निलोफर सय्यद आणि मुख्याध्यापिका सालेहा शेख, अजीम शेख, रजिया हुंडेकरी, अलीना मदत, तरन्नूम बडेपीर आणि आरती गायकवाड या शिक्षकांचे सहकार्य लाभले. शिष्यवृत्ती परीक्षेसोबतच शाळेतील विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा, गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा, आयडियल मोमेंट स्कॉलरशिप परीक्षा तसेच मायनॉरिटी टॅलेंट सर्च परीक्षांमध्येही सहभाग घेऊन यश मिळवले आहे. या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन शिक्षक इम्रान जमादार यांनी केले.

### प्राणघातक हल्ला केल्या प्रकरणी सावकाराची निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि. १० मे-**

व्याज न दिल्याच्या कारणावरून प्राणघातक हल्ला केल्या प्रकरणी सावकाराची न्यायदंडाधिकारी ए एस बिराजदार यांनी निर्दोष मुक्तता केली. फिर्यादी ऋषिकेश जाधव याने व्याजाने घेतलेल्या पैशाचे व्याज वेळेवर न दिल्याने चिडून प्राणघातक हल्ला केले प्रकरणी भीमा



गायकवाड बजरंग गायकवाड रेवन फकीरप्पा गायकवाड यल्लूबाई रेवन गायकवाड, प्रकाश विठ्ठल जाधव, पुष्पा रेवन गायकवाड़, शोभा विठ्ठल जाधव, श्वेता भीमा गायकवाड (रा. सेटलमेंट फ्री. कॉलनी. न ३ सोलापूर) यांची प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ए.एस. बिराजदार सो यांनी निर्दोष मुक्तता केली. ६ ऑक्टोबर २०१८ रोजी दू ३:३० वा ऋषिकेश जाधव यांनी दिड वर्ष पूर्वी घेतलेले खासगी सावकाराचे रक्कमेचे व्याज दिले नाही म्हणून भीमा गायकवाडने ऋषिकेश जाधव यांना उलट्या तलवारी ने वार केली तेथे प्रकाश विठ्ठल जाधव याने लोखंडी रॉड ने मारहाण केली व ईतर आरोपानी शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारून दमदाटी केली. असा फिर्याद ऋषिकेश जाधव सलगरवस्ती पोलिस स्टेशन येथे दिले होते, पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून दोषारोप पत्र दाखल केले होते या गुन्हाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक वी. डी. भुसनुर यांनी केला. खटल्याच्या सुनावणीवेळी आरोपींच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून न्यालयाने सर्वांची मुक्तता केली. यात फिर्यादीतर्फे ॲड. चैतन्य नल्ला तर आरोपीतर्फे ॲड. विद्यावत पांढरे, ॲड. जयराज दिपक नंदुरकर यांनी काम पहिले.

### मदरशाची देणगी स्वखात्यावर जमा करून केली फसवणूक

**सोलापूर, दि. १० मे-**

विडी घरकुल परिसरातील तक्या अरबी मदरसाच्या नावाने देणगी गोळा करून ती स्वतःच्या नावावर बँक खात्यात वळवून फसवणूक केल्याने एकाच्या विरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हा प्रकार ३१ मार्चपासून सुरू होता. विशेष म्हणजे हा अपहाराचा प्रकार एटीएसने उघडकीस आणला. एटीएसचे अधिकारी नितीन दत्तात्रय जावळे (वय ३८) यांनी फिर्याद दिली. रियाज अहमद जमीर कुमठे (रा. जी ग्रुप विडी घरकुल, हैदराबाद रोड) असे त्याचे नाव आहे. पोलिसांनी चौकशी सुरू केली असून, अद्याप अटक नाही. रियाज हा तक्या अरब मदरसा नावाने विडी घरकुल परिसरात देणगी गोळा करत होता. तो उपाध्यक्ष आहे. देणगीदारांकडून घेत असलेली देणगी मदरशाच्या खात्यावर जमा न करता, स्वतःच्या बँक खात्यात जमा करून घेत होता, असे फिर्यादमध्ये म्हटले आहे. सहायक पोलिस निरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

# उद्यापासून पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती

## मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांची माहीत

### जिल्ह्यात मोहीम राबविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची रासायनिक व जैविक पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी येत्या १२ मे ते ७ जून या कालावधीत जिल्ह्यात क्षेत्रीय तपासणी संचद्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

जिल्हापरिषदेत पत्रकारांशी सीईओ कुलदीप जंगम बोलत होते. मोहिमेतंतर्गत गावात पाणी तपासणी करण्यासाठी निवड केलेल्या संकेतस्थळावर नोंदविलेल्या पाच महिलांची पडताळणी करणे, महिलांच्या हस्ते पाणी गुणवता विषयक एफ.टी. के. प्रशिक्षणाच्या नोंदी घेणे, गावात आठवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांना एफ.टी.के. किटव्दारे पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक देणे, ८ ते १० मधील विद्यार्थ्यांमार्फत शाळा, अंगणवाड्या, घरगुती नळ जोडण्यामधील पाणी नमुने तपासणी करणे, डब्यूक्यूएमआयएस पोर्टलवर नोंदी घेणे, नळ पाणी पुरवठा योजना स्रोत, घरगुती नळ जोडण्या, शाळा, अंगणवाड्यांची पाणी गुणवता तपासणी करण्यासाठी रासायनिक व जैविक एफ.टी.के. संचाचे वाटप करणे, स्थानिकांना पाणी गुणवत्ता तपासणी व त्यापासून होणारे फायदे सांगितले जाणार आहे.

मोहिमेत ग्रामपंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभागाचा सहभाग राहिल. सर्वांच्या मदतीने व्यापक जनजागृती मोहीम यशस्वी केली जाणार आहे.

#### क्षेत्रीय तपासणी संच काय आहे ?

एफ.टी. के. म्हणजे क्षेत्रीय तपासणी संच हे एक पोर्टेबल उपकरण आहे. जे प्राथमिक स्वरूपात पिण्याच्या पाण्यातील रासायनिक आणि जैविक घटकांची तपासणी करण्यासाठी वापरले जाते. यामुळे पाण्याची गुणवत्ता त्वरित ठरवणे, गावपातळीवर नागरिकांना पाण्यातील अशुद्धता ओळखण्यास मदत होईल. या संचाद्वारे पाणी पुरवठा स्रोत, शाळा, अंगणवाडी व घरगुती नळ जोडण्याची पाणी गुणवत्ता तपासली जाणार आहे.

पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीमेतंर्गत रासायनिक व जैविक क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे गावांमध्ये जनजागृती अभियान राबविण्याबाबत केंद्र शासनाने सुचना दिल्या आहेत. या मोहिमेचा जिल्हास्तरावर सीईओ कुलदीप जंगम यांचे व दि.१९ ते २३ मे २०२५ या कालावधीत जनजागृती मोहिमेचा तालुकास्तरीय शुभारंभ गटविकास अधिकारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दि.२ ते ७ जून या कालावधीत मोहिमेची ग्रामपंचायत स्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल. या मोहिमेमध्ये सर्व शासकीय यंत्रणांनी सहभाग घेऊन पाणी गुणवत्ता तपासणी आणि व्यापक जनजागृती करावे.

**- अमोल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग**



**शून्य सावली दिवस**

**सोलापूर : शहरात शनिवारी दुपारी शून्य सावली दिवसाचा अनुभव घेताना सोलापूरकर. लष्कर परिसरात टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)**

## पिशवीत लपवून ठेवलेला आठ किलो गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मे -**

विक्री करण्याच्या उद्देशाने घरात बेकायदा ठेवलेला आठ किलो गांजा बझार पोलिसांनी जप्त केला आहे. कुमठा नाका परिसरातील भारत नगरात पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलिसांनी दोघांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची कोठडी ठोठावली आहे.

८ मे रोजी रात्री सव्वाआठच्या सुम ारास मुजमिल शेख याने त्याच्या घरात दोन पिशव्यांमध्ये आठ किलो १८२ ग्रॅम गांजा ठेवला होता. पोलिसांना खबर मिळताच पोलिस उपनिरीक्षक नितीन शिंदे यांच्या नेतृत्वातील पथकाने त्याठिकाणी छापा टाकला. त्यावेळी एका प्लास्टिकच्या पिशवीत हिरवट-पिवळा काळसर रंगाचा दोन किलो गांजा ठेवलेला होता. तर एका गोणीत सहा किलो १८२ ग्रॅम गांजा ठेवलेला आढळला. दोन लाख रुपयांचा गांजा दोन वेगवेगळ्या ठिकाणी ठेवून तो कोणालातरी विक्री करण्याच्या हेतूने मुजमिल याने ठेवला होता. त्याने हा गांजा कृष्णा शंकर खरात याच्याकडून घेतल्याचे सांगितले. गांजा एकमेकांना देणारे दोघेही मूळचे वडजी येथील आहेत.

#### दोघेही १९ वर्षांखालील, मुख्य आरोपीचा शोध सुरु

सोलापुरात यापूर्वी गांजा बाळगणे, वाहतूक करणे असे गुन्हे दाखल आहेत. मात्र दोन्ही संशयित आरोपी १९ वर्षांखालील असून, ते पहिल्यांदाच पोलिसांच्या रेकॉर्डवर आले आहेत. या तरुणांना अशा अवैध धंद्यात उतरविणारा मुख्य आरोपी कोण, याचा शोध पोलिस घेत आहेत. पोलिस उपनिरीक्षक नितीन शिंदे तपास करत आहेत.

## दस्तामध्ये बदल करून दोघा भावांची फसवणूक

### पुण्याच्या समर्थ डेव्हलपर्सच्या भागीदारांचा जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

नेहरू नगर व सलगर वस्ती येथील शेतजमीनीचे दस्तामध्ये परस्पर फेरबदल करून मोबदल्याची रक्कम न देता शेतजमीन स्वतः चे नावे लिहून घेऊन दोघां भावांची फसवणूक केल्याप्रकरणी पुणे येथील समर्थ डेव्हलपर्सचे भागीदार राहुल विष्णु लाड (रा. सर्व्हे नं. ११६, रिलायन्स टॉवरजवळ, वाल्हेरवाडी, चिंचवड, पुणे) आणि राजेंद्र तुकाराम थोरवे (रा. सर्व्हे नं. १८/९, गणेश नगर, दुर्गा कॉलनी, डांगे चौक, थेरगाव, पुणे) यांचा जामीन अर्ज अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांनी फेटाळून लावला.

रघुनाथ आनंदा रोकडे यांच्या मालकीची नेहरु नगर येथील शेतजमीन गट नं १५/८ व संदीप गोविंद रोकडे यांच्या मालकीची सलगर वस्ती येथील शेतजमीन गट नं.१९/२/अ व १९/२/ब हि शेतजमीन दोघा भावांनी आरोपींना दि.१६/३/२५ रोजी रजिस्टर खरेदी दस्तान्वये लिहून दिली व सदर दस्त रजिस्टर कार्यालयात नोंद केल्याची झेरॉक्स प्रत त्याचदिवशी आरोपींनी फिर्यादीस दिली व फिर्यादीस मोबदल्यापोटी दिलेला धनादेश मुद्दाम पणे व जाणूनबुजून न वटविण्याकराता पेमेंट थांबविले. तद्नंतर फिर्यादीने आरोपींना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्या सोबत संपर्क झाला नाही. त्यावेळी आपली फसवणूक झाली हे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने कायदेशीर कारवाई करण्याकरिता रजिस्ट्रार कार्यालयातून दस्तांची नक्कल काढली असता त्यामध्ये आरोपींनी खरेदीखताची रक्कम देणे टाळण्यासाठी परस्पर वर नमूद मिळकतीबाबत दिवाणी दावा प्रलंबित असल्यास तो निकाली निघेपर्यंत रक्कम देणार नाही असा मजकूर फसवून समाविष्ट केल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादीची आर्थिक फसवणूक करून जमीन बळकविल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध रघुनाथ आनंदा रोकडे व संदिप गोविंद रोकडे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल झालेले आहेत. दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली होती व पोलिस कोठडीत राहिल्यानंतर आरोपींनी जामीन मिळण्यासाठी प्रथम न्यायदंडाधिकारी येथे अर्ज दाखल केला होता सदर जामीन अर्ज देखील न्यायालयाने फेटाळला होता. तद्नंतर आरोपींनी सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. यात मुळफिर्यादीच्या वकिलांनी जामिनास विरोध करून या पुष्ठर्थ सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे न्याय निर्णय दाखल केले. सदरचा युक्तिवाद व सरकारी वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य मानून कोर्टाने दोन्ही आरोपींचा जामीन अर्ज फेटाळून लावला. यात सरकार पक्षातर्फे ॲड. गुजर, मुळ फिर्यादीतर्फे ॲड. संतोष न्हावकर, ॲड. राहुल रुपनर,ॲड. शैलेश पोटफोडे यांनी तर आरोपीतर्फे ॲड.शशी कुलकर्णी, ॲड. पी बी लोंढेपाटील यांनी काम पाहिले.

### घरगुती कारणातून वृध्द महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. १० मे-**

घरगुती कारणातून वृध्द महिलेला कुकरने मारून जखमी केले. हा प्रकार शुक्रवारी सायंकाळी ६.२० वाजता भारतीय चौक येथील घरात घडला. विजयालक्ष्मी रामकृष्ण चिंचणसुरे (वय ६३, रा. भारत नगर कुमठा नाका, सध्या भारतीय चौक, सोलापूर) असे मारहाण झालेल्या वृध्द महिलेचे नाव आहे. विजयालक्ष्मी यांना घरगुती कारणतून झालेल्या वादात धीरज चिंचुरे याने कुकर तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात डोक्याला आणि उजव्या पायाला मार लागल्याने मुलगा हर्षद याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. जखमी विजयालक्ष्मी यांची शुध्द हरपली असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### वडार गल्लीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. १० मे-**

बुधवार पेठ येथील वडार गल्लीत तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार शनिवारी सकाळी ६ वाजता उघडकीस आला. अमन राजू भांडेकर (वय ३२, रा. वडार गल्ली, बुधवार पेठ) असे तरुणाचे नाव आहे. अमन हा घरातील स्लॅबच्या हुकाला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यास नातेवाईकांनी गळफासातून सोडवनूक केली, त्यानंतर हवालदार रुपनर यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले होते, परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## ग्रामसेवकाला मारहाण करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

### वसंत विहारमधील संकेत थोबडे नगरातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० मे -**

कुत्र्याच्या अंगावर हात फिरविल्याने केस उडत असल्याच्या कारणावरून ग्रामसेवकाला व तिच्या मुलीला दगडाने व कमरेच्या बेल्टने मारहाण करणाऱ्या दोघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संदीप संभाजी दराडे (वय ४०, रा. घर नं. ४०, संकेत थोबडे नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रविराज मोरे व त्याच्या घरात राहणारी महिला (रा. संकेत थोबडे नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



९ मे रोजी रात्री संदीप दराडे व त्यांचा मेव्हुणा प्रशांत घुगे हे घरी असताना घराबाहेर दराडे यांची मुलगी श्रावणी हिच्या रडण्याचा आवाज ऐकून बाहेर आले. त्यावेळी घराबाहेर रविराज मोरे याच्या घरातील एक महिला ही मुलगी श्रावणीचा हात पकडून तिला रागवत होती. श्रावणीने स्वतःच्या कुत्र्याच्या अंगावरून हात का फिरविला व त्याचे केस उडत नाही का असे म्हणून ती महिला श्रावणीला शिवीगाळ करून मारहाण करीत असल्याचे दिसून आले. त्यावेळी ती महिला आरडाओरड करीत असताना दराडे यांनी मुलीला शिवीगाळ करू नका असे सांगितले. त्यावेळी रविराज मोरे याने दराडे यांना पकडून खाली पाडून दगडाने कपाळावर मारहाण केली. दराडेंचा मेव्हुणा घुगे सोडविण्यासाठी गेल्यानंतर म ोरे यानो दोघांनाही कमरेचा बेल्ट व दगडाने मारहाण करून जखमी केले. तसेच सर्वांना गोळ्या घालून मारून टाकण्याची धमकी दिली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कसबे पुढील तपास करीत आहेत.

### कर्जबाजारी झाल्याने एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १० मे-**

सोलापूर मंगळवेढा रस्त्यावरील देगावजवळील कोयनानगरात कर्जबाजारी झाल्याने एकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार शनिवारी सकाळी ९.२० वाजता उघडकीस आला. भास्कर दाजी गायकवाड (वय ४३, रा. कोयना नगर देगाव, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या व्यकतीचे नाव आहे. भास्कर हा कर्जबाजारी झाला होता. यातूनच तो मानसिक तणाखाली असल्याने त्याने शनिवारी सकाळी ९.२० वाजता राहत्या घराच्या वाशाला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्याची फासातून सोडवनूक केली. त्यानंतर भाऊ सागर गायकवाड याने सकाळी ११ वाजता शासकीय रुणालयात उपचारास दाखल केले, परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## बौद्ध साहित्य मंडळातर्फे उद्या बुद्ध वंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

बौद्ध साहित्य मंडळाच्या वतीने विश्वशांती अन् कल्याणासाठी तथागत बुद्ध जयंती दिनी सोम वार दि.१२ मे रोजी सकाळी ९ वाजता घराघरात आणि प्रत्येक बुद्ध विहारात, चला बुद्ध वंदना म्हणूया हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

तथागत बुद्ध जयंती किंवा बुद्ध पौर्णिमा हा सर्वात महत्त्वाचा सण व उत्सव आहे. हा सण जगभरात विशेषतः भारतात वैशाख पोर्णिम ेच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी तथागत गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण



या तीनही घटना झाल्या आहेत.बौद्ध धम्म अनुयायांची मोठ्या प्रमाणावर संख्या असणाऱ्या सुमारे १८० देशांतील बौद्ध अनुयायी हा सण उत्साहात साजरा करतात. आजही बुद्ध विचारांची नितांत गरज आहे.

त्यामुळे विश्वशांती अन् कल्याणासाठी तथागत बुद्ध जयंती दिनी सोमवारी सकाळी ९ वाजता घराघरात आणि प्रत्येक बुद्ध विहारात, चला बुद्ध वंदना म्हणूया ! हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सर्वांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन अनोख्या पद्धतीने सामूहिकपणे एकाच वेळी बुद्ध जयंती साजरी करावी. यावेळी तथागत गौतम बुद्ध मूर्ती आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण पंचशील बुद्ध वंदना घ्यावी. शक्य झाल्यास या प्रसंगाचे सकारात्मक फोटो, व्हिडिओ व्हाट्सअप अन् फेसबुकवर अपलोड करत धम्म संदेश द्यावा. एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात. बुद्धम् शरणम् गच्छामि... धम्मम शरणं गच्छामि... संघम शरणम् गच्छामि.! हा मंगल स्वर सर्वत्र घुमू द्या, असे आवाहन सोलापुरात नुकतेच बौद्ध साहित्य संमेलन यशस्वी केलेल्या बौद्ध साहित्य मंडळाचे अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर (७७२२०३५०३६), सरचिटणीस किरण बनसोडे (९८२२६१६१४१), समन्वयक डॉ. सुरेश कोरे यांनी केले आहे.

## पाखर संकुलच्या ३५० मुलांचे दत्तक विधान करून पुनर्वसन

### संस्थेच्या वर्धापन दिन कार्यक्रमात बुवा यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

पाखर संकुलच्या माध्यमातून ३५० पेक्षा अधिक मुलांचे दत्तक विधान करून पुनर्वसन झाल्याची माहिती संस्थापिक शुभांगी बुवा यांनी दिली. संस्थेच्या २२ व्या वर्धापन दिनी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जिल्हा बालकल्याण समितीचे अध्यक्ष समीर सय्यद कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. बालगृहाच्या अधीक्षक निकिता एकबोटे पत्रकार अविनाश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. बालगृहातील मुलांकडून केक कापून वर्धापनदिन साजरा झाला.

दत्तक विधान प्रक्रियेबद्दल पाखर संकुलचे समन्वयक ध्रुव कांबळे यांनी माहिती दिली. ८ मे २००३ रोजी सोलापुरातील दत्त चौकात शुभराय महाराज म ठात संस्था सुरू झाली. २०२२ मध्ये बालगृह जुळे सोलापूर येथे स्थलांतर करण्यात आले, असे ते म्हणाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सिद्धाराम बगले, डॉ. सोनाली बगले, खजिनदार राजु खिलारे, सदस्य नरेंद्र भावे, नयन जोशी आदी उपस्थित होते.


**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## बदली, रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

महापालिकेतील २४९ बदली, रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा सकारात्मक प्रस्ताव नगर विकास खात्याचे प्रधान सचिव (मंत्रालय) यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

याबद्दल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे आणि अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांचा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने सत्कार करण्यात आला. ट्रेड युनियनचे अध्यक्ष कामगार नेते बापूसाहेब सदाफुले यांनी आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांचे आभार मानले. बदली, रोजंदारीं कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री,नगर विकास खाते यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी राम चंदनशिवे, सुनील शिंदे, बिभीषण गायकवाड, ज्ञानदेव वाघमारे, मेघराज कांबळे आणि युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते.



## ▶▶ महत्वाचे...

### पतीबरोबरच्या भांडणानंतर पत्नीने प्राशन केले फिनेल

**सोलापूर, दि. १० मे-**

पतीबरोबर झालेल्या घरगुती वादातून पत्नीने फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केले. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुकयातील उळे गावात शनिवारी मध्यरात्री एकच्या सुमारास घडली. पूजा सचिन रणसुरे (वय ३०) असे तरुणीचे नाव आहे. पूजा आणि त्यांचे पती सचिन यांच्यात शनिवारी मध्यरात्री घरगुती कारणातून वाद झाला. यातून संतापलेल्या पूजा यांनी घरात ठेवलेले फरशी पुसण्यसाचे फिनेल प्राशन केले. यानंतर त्यांना त्रास होऊ लागल्याने शनिवारी सकाळी ६.३० वाजता सचिन याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### टायर फुटून टेम्पो पलटी होऊन एकजण जखमी

**सोलापूर, दि. १० मे-**

मंद्रुप ते नागणसून जाताना संजवाड गावाजवळ टेम्पो टायर फुटून पलटी झाला. यात एकजण जखमी झाले असून हा अपघात शनिवारी सकाळी ७.३० वाजता घडला. मनोज सूर्यकांत हेळवी (वय २५, रा. मंद्रुप ता द सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शनिवारी सकाळी ७.३० च्या सुमारास मनोज हा मंद्रुप येथून नागणसूनकडे टेम्पोतून जात होता. यादरम्यान असलेल्या संजवाड गावाजवळ अचानक चालत्या टेम्पोचे टायर फुटले. यामुळे टेम्पो पलटी झाल्याने मनोजच्या सर्वांगास मुकामार लागला. सकाळी ८.५० वाजता सतीश हेळवी याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कोरवलीत पूर्ववैमनस्यातून एकास बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १० मे-**

पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून तरुणाला लाकूड तसेच कु-हाडीने मारहाण करण्यात आली. ही मारहाण शनिवारी सकाळी



११ वाजता मोहोळ तालुक्यातील कोरवली येथील समाजमंदिराजवळ घडली. गणेश मच्छिंद्र कांबळे (वय ३०, रा. कोरवली ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. गणेश सचिन बाबासाहेब कांबळे व इतरांबरोबर गणेश याचे यापूर्वी भांडण झाले होते. तेव्हापासून सचिन व इतर लोक त्य्याच्यावर चिडून होते. शनिवारी सकाळी ११ च्या सुमारास गणेश हा गावातील सम ाजमंदिराजवळ थांबला होता. त्यावेळी सचिन कांबळे व त्याच्या साथीदारासह तिथे आला. त्याने लाकूड आणि कु-हाडीने गणेशला बेदम मारहाण केली. यात मारहाणीत उजव्या हाताला जख्म झाली असून सर्वांगास मुकामार लागल्याने कामती येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून दुपारी १.५५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चूल पेटवताना कपडे पेटून महिला जखमी

**सोलापूर, दि. १० मे-**

नई जिंदगी परिसरातील शिवगंगा नगरात चूल पेटवताना अंगावरील कपडे पेटल्याने भाजून महिला जखमी झाली. हा प्रकार शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला. रबियाबसरी कमरोद्दीन शेख (वय २५) असे महिलेचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी घराच्या परिसरात रबियाबसरी या चुल पेटवत होता. त्यावेळी अचानक अंगावरील कपड्याने पेट घेतला. यात चेहरा आणि छातीला भाजल्याने दुपारी ३.३० वाजता पती कमरोद्दीन याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चक्कर येऊन पडल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १० मे-**

विजापूर रोडवरील दोन नंबर झोपडपट्टी येथील चार नंबर शाळेच्या कट्टयावर बसला असता अचानक चक्कर येऊन पडून बेशुध्द पडलेल्या एकाचा मृत्यू झाला. हा प्रकार शुक्रवारी दुपारी १.३५ वाजता घडला. सूर्यकांत प्रकाश शिंदे (वय ४६, रा. दोन नंबर झोपडपट्टी विजापूर रोड) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सूर्यकांत हा शुक्रवारी दुपारी १.३५ च्या सुमारास दोन नंबर झोपडपट्टी येथील चार नंबर शाळेच्या कट्टयावर बसला होता. त्यावेळी अचानक चक्कर येऊन तो पडल्याने बेशुध्द झाला. त्यास विजापूर पोलीस ठाण्यातील हवालदार गायकवाड यांनी बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# जिल्ह्यात भाजपाच्या ‘नव’नेतृत्वास वरिष्ठांकडून ‘बुस्ट’

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीही मुख्यमंत्र्यांकडून नवनेतृत्वाचेच संकेत

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. १० मे-**

भारतीय जनता पार्टीकडून सोलापूर जिल्ह्याचे नेतृत्व युवांकडे देण्याचे स्पष्ट संकेत असून नुकत्याच पार पडलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मुख्यमंत्र्यांकडून नवनेतृत्वास बुस्ट दिले जात असल्याचे चित्र आहे. तर चार महिन्यांनी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठीही सूचना देत मुख्यमंत्र्यांनी या निवडणुकांची कमान देखील नवनेतृत्वाकडे असणार असल्याचे सूचित केल्याने सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात भाजपाने जिल्ह्याचे नेतृत्व बदलल्याच्या राजकीय चर्चेला उधाण आले आहे. बाजार समिती निवडणुकीत भाजपाच्या नवनेतृत्वाने काँग्रेसला सोबत घेत विजय मिळवताच आता मुख्यमंत्र्यांच्या कानमंत्रानुसार जिल्ह्यात नवीन राजकीय समीकरणे जुळण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. सोलापूर जिल्ह्यात नवी राजकीय समीकरणे काय असतील हे आगामी निवडणुकांमध्ये दिसून येणार आहे.



काँग्रेस-राष्ट्रवादीचा बालेकिल्ला अशी ओळख असलेल्या सोलापूर शहर-जिल्ह्यात सन २०१४ नंतर भाजपाने मोठी राजकीय मुसंडी मारली आहे. भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेसला जिल्ह्यात मोठे खिंडार पाडले. राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांनी भाजपात प्रवेश केल्याने सोलापूर शहर-जिल्ह्यात भाजपाची राजकीय ताकत प्रचंड वाढली. महापालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषदा, पंचायत समित्या, ग्राम पंचायतींसह सहकार क्षेत्रावर देखील भाजपाने कब्जा मिळवल्याचे दिसून आले. २०१४ ते २०१९ या पाच वर्षाच्या कालावधीत केंद्र आणि राज्यात भाजपाची सत्ता होती. राज्याचे सहकार मंत्री म्हणून आ. सुभाष देशमुख आणि सोलापूरचे पालकमंत्री तथा राज्यमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या रुपाने राज्याच्या मंत्रिमंडळात सोलापूरच्या दोन अनुभवी आमदारांना मंत्रीपदाची संधी देखील मिळाली होती. सोलापूर लोकसभेचा खासदार भाजपाचा होता तर त्यानंतरच्या निवडणुकीत सोलपर लोकसभेसह माढा लोकसभेची खासदारकी देखील भाजपाने खेचून घेतली. शहर व जिल्ह्यात भाजपाच्या आमदारकीची संख्याही लक्षणीय होती. २०१४ ते २०१९ या पाच वर्षाच्या कालावधीत भाजपाचे सोलापूरचे नेतृत्व संपूर्ण सत्ता हातात असताना व पालकमंत्रीपद असून जिल्ह्याचे नेतृत्व करण्यात नेत्यांना यश आले नसल्याचे दिसून आले.

महापालिकेत तर एकहाती सत्ता असतानाही सततच्या पक्षांतर्गत वादामुळे सातत्याने भाजपाची बदनामी झाल्याचे दिसून आले. वास्तविक पाहता आपसातील वाद मि टवून सोलापूर शहराचे एका आणि जिल्ह्याचे नेतृत्व दुसऱ्या मंत्र्याने केले असते तर पक्षाची ताकत वाढण्यास मोठी मदत झाली असती आणि भाजपाला जिल्ह्याचे नेतृत्व करणारा नेता मिळाला असता. सोलापूर भाजपातील दोन आमदारांचा पक्षांतर्गत वाद इतका विकोपास होता की, तत्कालीन मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांनी सोलापूरच्या आमदारांसह सर्व पदाधिकाऱ्यांना थेट मुंबईत पाचारण करून रात्री उशीरा बैठक घेवून वाद मिटविण्याची तंबी दिलेली होती. भाजपाच्या राज्यातील श्रेष्ठ नेतृत्वांनी तंबी देवून देखील सोलापुरातील नेत्यांचा आपासातील वाद न मिटल्याने वरिष्ठ देखील नाराज झाल्याची चर्चा त्यावेळी पक्षात रंगली होती. याचाच परिपाक म्हणून सन २०१९ नंतर भाजपाची सत्ता असताना देखील सोलापूरला मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. इतकेच काय तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने दैदिप्यमान राजकीय यश मिळवून देखील सोलापूरला मंत्रिमंडळात स्थान दिले गेले नाही. २०१९ नंतर सोलापूरला कायम उपरा पालकमंत्री मिळाल्याने सोलापूरचा विकास म्हणाव्या त्या गतीने होवू शकला नाही. पंतप्रधान मोदींनी २०१८ साली सोलापुरात भूमिपूजन केलेली उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी अद्याप पूर्णत्वास नाही. मुबलक पाणीसाठा असतानाही सोलापूरकरांना आजही आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होतो आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत सोलापुरात घोषित झालेले शहरातील दोन्ही उड्डाणपूल आजही कागदावरच आहेत. होटगी रोडवरील विमानतळावरील विमानसेवा सुरु होण्याची तर अक्षरश: चेष्टाच झाल्याचे सोलापूरकरांनी पाहिले. विमानतळाला अडथळा ठरणारी एक अनधिकृत चिमणी सत्ताधारी भाजपाला दहा वर्षे पाडता आली नाही. सोलापुरात एकही नवीन उद्योग तर आलाच नाही पण सोलापुरात आय.टी. पार्क नसल्याने येथील उच्चशिक्षित युवावर्ग रोजगारासाठी सोलापूर सोडत आहे. सलग दोन जनगणनेत सोलापूर शहराची लोकसंख्या कमी झाल्याचे दिसून आले. हजारो कोटींचा खर्च होवूनही स्मार्टसिटी अंतर्गत झालेली कामे दर्जाहिन असल्याची ओरड आजही आहे. याव्यतिरिक्त सोलापूरच्या विकासाची अनेक कामे प्रलंबित आहेत.

मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नसल्याने सर्वत्र प्रशासक राज आहे. नागरिकांचा थेट संबंध प्रशासकांपर्यंत येत नसल्याने शहर व जिल्ह्यातील नागरी सम स्या जैसे थे तर पायाभूत सुविधांचा बोजवारा उडल्याचे चित्र आहे. स्थानिक प्रशासन आणि नागरिकांमध्ये दुआ म्हणून काम करणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही निवडणुका नसल्याने शांत बसण्याशिवाय पर्याय नव्हता.

मागील काही वर्षांच्या कालावधीत सोलापूरच्या विकासाची झालेली दुर्दशा अन् त्यामुळे सोलापूरकरांची नाराजी तसेच लोकसभा निवडणुकीत दोन खासदारांचा पराभव आणि भाजपातील पक्षांतर्गत वाद लक्षात घेवून कदाचित भाजपाच्या शिर्ष नेतृत्वांनी सोलापूरच्या नेतृत्वाची भाकरी फिरविण्याचा निर्णय तर घेतला नसावा, अशी चर्चा सुरु आहे. अक्कलकोटचे युवा आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहर मध्यचे युवा आमदार देवेंद्र कोठे यांना मुख्यमंत्र्यांनी बाजार समिती निवडणुकीत राजकीय ताकत दिल्याने भाजपा कार्यकर्त्यांसह जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात भाजपाने सोलापूरचे नेतृत्व युवा आमदारांच्या हातात दिल्याची चर्चा रंगली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे अधिकार जर या नवनेतृत्वाकडेच दिसून आल्यास मात्र मुख्यमंत्र्यांनी सोलापूरच्या नेतृत्वाची भाकरी फिरविल्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब होणार असून देवेंद्र फडणवीसांनी ‘**करेक्ट कार्यक्रम**’ केल्याचे स्पष्ट होणार आहे.

### भाजपाने नेतृत्वाची भाकरी फिरवल्यास राजकीय पडसाद उमटणार का?

सोलापुरात दोन वरिष्ठ आमदार जे की मंत्री देखील राहिलेले असताना भाजपाच्या शिर्ष नेतृत्वाने सोलापूर भाजपा नवनेतृत्वास बुस्ट दिल्याचे याचे राजकीय पदसाद उमटणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. कारण नुकत्याच पार पडलेल्या बाजार समिती निवडणुकीत भाजपाच्या दोन्ही देशमुख आमदारांनी आपसातील मतभेट मिटवून एकत्र येत कार्यकर्त्यांच्या हितासाठी बाजार समिती निवडणुकीच्या रिंगणात स्वतंत्र पॅनल उतरवले. तसेच त्यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या काही नेत्यांना देखील सोबत घेतले होते. परंतु भाजपाच्या दोन युवा आमदारांनी बाजार समिती निवडणुकीत विजय मिळवून देतील अशा काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नेत्यांना सोबत घेवून पॅनल तयार केले आणि देशमुखांच्या पॅनलवर विजय मिळवला. एकूणच राजकीय घडामोडी पाहता आगामी काळात याचे काय राजकीय पडसाद उमटतील याची उत्सुकता भाजपासह सर्वांना लागली आहे.

## मनीषा माने न्यायालयीन कोठडीतच; पोलिस कोठडीचा निर्णय लांबणीवर

### डॉ. वळसंगकर आत्महत्याप्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

डॉ. शिरीष वळसंगकर आत्म हत्याप्रकरणातील आरोपी मनिषा माने हिचा न्यायालयीन कोठडीतील मुक्काम वाढला असून तिच्या जामीन अर्जावर १४ मे रोजी सुनावणी होणार आहे. तर सदर बझार पोलिसांनी न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर सादर केलेल्या प्रोडक्शन वॉरंटचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे माने हिस पुन्हा पोलिस कोठडी घेण्यासाठी सदर बझार पोलिस कधी न्यायालयात हजर करतील हे पहावे लागेल.

डॉ. शिरीष वळसंगकर वांच्या आत्म हत्येप्रकरणात संशवित आरोपी मनीषा माने हिची तपास अधिकाऱ्यांना तिच्याकडील माहितीच्या अनुषंगाने चौकशीसाठी पुन्हा तीन दिवसांची पोलीस कोठडी घ्यायची आहे. त्या अनुषंगाने सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तथा तपास अधिकारी अजित लकडे यांनी रिमांड रिपोर्ट येथील मुख्य न्यायदंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांच्यापुढे शुक्रवारी दुपारी सादर केला होता. मात्र मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी कायद्यावर बोट ठेवले.

संशयित आरोपीला कोर्टात हजर करा, तिच्या उपस्थिती शिवाय सुनावणी घेता येणार नाही. संशयित आरोपीस जेलमधून बाहेर काढण्यासाठी कोर्टाची ऑर्डर घ्यावी लागेल. आरोपी हजर झाल्यावर रिमांड रिपोर्ट बघून पुढचा निर्णय घेता येईल, असे न्यायदंडाधिकारी यांनी सांगितल्यानंतर पोलिसांकडून न्यायालयात प्रोडक्शन वॉरंटचा अर्ज देण्याता आला. तो न्यायालयाने मंजूर केला आहे. मात्र दुसऱ्या बाजूला डॉ. वळसंगकर आत्महत्येप्रकरणी संशयित आरोपी मनीषा माने हिला जामीन मिळावा, यासाठी सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांच्या न्यायालयात अर्ज केला आहे. या अर्जावर सरकारी वकिलाने म्हणणे मांडण्यासाठी ५ दिवसांची मुदत मागितली आहे. त्यामुळे पुढच्या सुनावणीची तारीख १४ मे ठेवण्यात आली आहे.

## रेल्वे स्टेशन येथून दुचाकीची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे -**

शहरातील रेल्वे स्टेशन येथून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत मनोहर मलप्पा धर्मसाने (वय ४१,



रा. मथुराकृष्ण हौसींग सोसायटी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोहर धर्मसाने यांनी त्यांची १३ डीबी ३२८० क्रमांकाची दुचाकी ही ६ मे रोजी रात्री सोलापूर रेल्वे स्टेशन येथे पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार लिंबोळे पुढील तपास करीत आहेत.

## अचानक चक्कर येऊन पडल्याने डोक्याला जखम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

येथील सिटी हॉस्पीटल जवळ अचानक चक्कर येऊन पडल्याने एकाच्या डोक्याला जखम झाली. हा प्रकार शुक्रवारी सायंकाळी ५.४० वाजता घडला. आकाश मोहन पलसे (वय ४०, रा. रामवाडी ) असे चक्कर येऊन पडलेल्याचे नाव आहे. आकाश हा शुक्रवारी सायंकाळी ५.४० च्या सुमारास सिटी हॉस्पीटलजवळ असताना, त्यास अचानक चक्कर आली. त्यात तो खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाल्याने किरण खांडेकर याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### तडीपारीचा डबल धमाका

## शहरातील दोघे सराईत गुन्हेगार दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

शहरातील दोघां सराईत गुन्हेगारांना पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.

महेश हनुमान मौलावाले (वय २८, रा. सिध्दार्थ चौक, सोलापूर) आणि सैफ इरफान यादगिरी (वय २५, रा. क विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. महेश मौलावाले याच्या विरुध्द सन २०२३ व २०२४ या कालावधीत गैरकायद्याची मंडळी जमा करून दंगा करणे, जबरी चोरी यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तर सैफ यादगिरी याचविरुध्द सन २०२४ मध्ये मोटारसायकल बनावट चावीने उघडून तसेच हॅन्डल लॉक तोडून चोरी करण्यासारखे



**महेश मौलावाले   सैफ यादगिरी**

गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्यांच्या गुन्हेगारी कारवायांना रोख लावण्यासाठी मौलावाले विरुध्द सदर बझार पोलिसांना तर यादगिरी याच्याविरुध्द जेलरोड पोलिसांनी तडीपारीचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास मान्यता देत सैफ यादगिरी यास सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश उपायुक्त कबाडे यांनी दिले. तडीपारीच्या आदेशानंतर मौलावाले यास कर्नाटकातील विजापूर येथे तर यादगिरी यास पुणे येथे सोडण्यात आले आहे.

## पालखी मार्ग व तळांवर शौचालय, हिरकणी कक्ष, चेंजिंग रुमची संख्या वाढवावी

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; यात्रा कालावधीत वारकऱ्यांच्या सोयी-सुविधेला प्राधान्य द्यावे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० मे-**

आषाढी सोहळा ६ जुलै रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ३० जून तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे १ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. या पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या सर्व वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे तसेच पालखी मार्ग व पालखी तळांवर शौचालय,



हिरकणी कक्ष, चेजींग रुम यांची संख्या वाढवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिल्या.

आषाढी यात्रेच्या पुर्वतयारीबाबत श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, कार्यकारी अभियंता अमित निमकर, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. भंडीशेगांव येथील जलसंपदा विभागाच्या जागेत मोडकळीस आलेल्या इमारती असून त्या इमारती पाडण्यासाठी पाटबंधारे विभाग व बांधकाम विभागाने आवश्यक ती कार्यवाही तत्काळ करावी. पिराची कुरोली येथील रस्ता रुंदीकरणाच्या कामांबाबत तात्काळ प्रस्ताव सादर करावा. आषाढी यात्रा कालावधीत एस.टी महामंडाळाकडून तात्पुरते बसस्थानक उभारण्यात येतात. त्या ठिकाणी प्रवाशांसाठी मुबलक प्रमाणात शौचालय, स्नानगृहाची व्यवस्था करावी. तसेच बसस्थानक स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. तसेच आषाढी यात्रेच्या अनुषंगाने वारकरी भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण कराव्यात, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच पालखी सोहळा प्रमुखांनी पालखी मार्गावर व पालखी तळांवर सोहळ्यासह भाविकांच्या सोयी-सुविधेसाठी काही सूचना मांडल्या होत्या. त्या सूचनांची दखल घेवून तातडीने कामे पूर्ण करावीत असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १११२

**हे आदिपुरुषाची माया । ब्रम्हेयाहि नयेचि आया ।**
**म्हणऊनि भुलविला ऐकेंराया । संजयो म्हणे ।।**

युध्दभूमीत लढण्याचे सोडून अर्जुन मोहग्रस्त कसा झाला आहे याचे वर्णन संजय राजा धृतराष्ट्रासमोर करीत आहे. मोहात पडल्यानंतर किंवा मोह उत्पन्न झाल्यानंतर माणूस सत्य कसे विसरतो हे संजय राजासमोर सांगत आहे. धतराष्ट्र राजा आहे व आपण त्याचे सेवक आहोत याचे भान संजयाला आहे. तरी पण जे घडत आहे ते सांगणे आपले कर्तव्य आहे याचेही भान संजयाला आहे. अर्जुनाला झालेला मोह संजयाला व्यक्ति म्हणून आवडण्याचे कारण नाही. कारण संजयाने पांडवावर कौरवांकडून झालेला सर्व अन्याय उघडया डोळयानी पाहिला होता. पण इथे संजयाच्या आवडी-निवडीचा प्रश्नच येत नाही. जे घडत आहे ते राजाला सांगणे क्रमप्राप्त आहे. अर्जुन किती व कसा मोहग्रस्त झाला आहे, याचे वर्णन संजयाने चालु ठेवले आहे. हे राजा हा मोह म्हणजे आदिपुरुष परमेश्वराची मायाच आहे. ही माया स्वत:च ईतकी शक्तीशाली आहे की ती ब्रम्हदेवाच्या सुध्दा आवाक्यात येत नाही. अशा या शक्तीशाली



मायेने त्या अर्जुनाला मोहग्रस्त केले आहे की ज्या अर्जुनाने युध्दात भगवान शंकराला जिंकले, निवांतकवचा सारख्या राक्षसांना पाणी पाजले. असे असले तरीही तो माऊलींच्या, हे आदिपुरुषाची माया । ब्रम्हेयाहि नयेचि आया ।म्हणऊनि भुलविला ऐकेंराया । संजयो म्हणे ।। या म्हणण्याप्रमाणे मायेने मोहीत झाला आहे.

ईतरांवर राज्य करु पाहाणारा माणूस जेंव्हा स्वत:च्या मनावर राज्य करु पाहातो तेव्हा तो हारतो, मोहग्रस्त होतो. स्वत:च्या मनाला जिंकू शकत नाही. जो स्वत:च्या मनाला जिंकू शकत नाही तो जग जिंकला तरी खऱ्या अर्थाने हरलाच असे म्हणायला हरकत नाही. अर्जुनाचा मोह भ्रमरासारखा झाला आहे. मोठ-मोठी लाकडे कोरणारा भ्रमर फुलाच्या कळीला मोहामुळे कोरु शकत नाही आणि त्या कळीत स्वत:चे अस्तीतत्व गमावून बसतो. हे सर्व सविस्तरपणे संजय राजा धृतराष्ट्राला सांगत आहे. संजयाचे वाक्य ऐकून राजाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत आहे. अर्जुन मोहग्रस्त झाला हे ऐकून राजाला आनंद व्हावा याचे संजयाला आश्चर्य वाटले नाही कारण अर्जुन युध्दभूमीवर मोहग्रस्त झाला आहे. पण राजा धृतराष्ट्र तर युध्द सुरु होण्याच्या आगोदर पासूनच पुत्र प्रेमापोटी मोहग्रस्त झाला आहे, याची जाणीव संजयाला आहे. खरेच किती आश्यर्च आहे, एखादा व्यक्ती असा मोहग्रस्त झाला तर त्याचा आनंद दुसऱ्या एखाद्याला त्याच्या मोहामुळे व्हावा. दुसऱ्याच्या चुकीच्या मोहग्रस्त होण्यामुळे जर एखाद्याचा स्वार्थ साधला जात असेल तर तो स्वार्थसाधू पूर्वीच मोहग्रस्त झाला आहे हे उघड आहे. आपण मोहग्रस्त होणे किंवा दुसऱ्याच्या चुकीच्या मोहाचा आनंद आपणाला मिळणे हे दोन्हीही योग्य नाही. आपणा कोणाही माऊली भक्ताला चुकीचा मोहग्रस्त होण्याची बुध्दी सुचू नये अशी माऊली चरणी प्रार्थना. दुस-यास अडचणीत मदत करता येण्याची इच्छा होणे, त्यास सहकार्य करणे असा स्वभाव असणे म्हणजे आनंदलहरीत जगणे होय.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - शुभ दिवस, |
| दि. ११ मे २०२५ | मदर्स डे, |
| विक्रम संवत् २०८१ | श्री नृसिंह जयंती पौर्णिमा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्दशी (२०.०१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (अहोरात्र) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्यतिपात (२९.००) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (०६.४६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निमर्ाण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# 'दक्षिण'ला कायमस्वरुपी गटविकास अधिकारी नेमण्याची मागणी

## अतिरिक्त पदभारामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर नाही प्रभाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

एक वर्षापासून दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून प्रभारी कामकाज सुरू आहे . त्यामुळे नागरिक व लाभार्थ्यांची कामे खोळंबली आहेत. शिवाय विकास कामेही प्रलंबित असल्याची तक्रार करण्यात येत आहे.

> पंचायत समितीत लोकप्रतिनिधी नसल्यामुळे सर्व अधिकार गटविकास अधिकार्यांना आहे. त्यामुळे विविध योजनांमधील निधी वाटप व विकासकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायमस्वरूपी गटविकास अधिकारी गरजेचे आहेत.तसेच प्रभारी गटविकास अधिकारी असल्यामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर प्रभाव पडत नाही. गटविकास अधिकार्यांच्या अनुपस्थितीमुळे अनेक गावात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू आहे. शिवाय गटबाजीमुळे विकासकामे खोळंबली आहेत. त्यामुळे दक्षिणला कायम स्वरूपी गटविकास अधिकारी नेमणे गरजेचे आहे.
>
> **- सचिन व्हनमाने, कार्याध्यक्ष,** युवक काँग्रेस दक्षिण सोलापूर

वर्षभरापूर्वी दक्षिण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांना लातूर जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी बढती मिळाल्यामुळे दक्षिणचे गट विकास अधिकारीपद रिक्त आहे. दोन महिन्यासाठी मोहोळचे गटविकास अधिकारी कदम यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी पदभार सोडल्यानंतर अक्कलकोटचे गट विकास अधिकारी शंकर कवितके यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. मात्र गटविकास अधिकारी प्रभारी असल्यामुळे व कार्यालयात अधिक वेळ उपस्थित नसल्यामुळे अनेक विकास कामे खोळंबली आहेत. ग्रामसेवकांबद्दल तक्रार व गाव पातळीवरील समस्या सांगण्यासाठी नागरीक पंचायत समिती कार्यालयात आल्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांची भेट होत नसल्यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहे. शिवाय विविध योजनांचे लाभार्थी गटविकास अधिकारी यांच्याकडे समस्या निवारण्यासाठी व योजनांचे लाभ मिळविण्यासाठी आल्यानंतर अनेक वेळा गटविकास अधिकाऱ्यांची भेट होत नाही. शंकर कवितके यांच्याकडे अक्कलकोटचा मुख्य पदभार असून दक्षिण पंचायत समितीचा अतिरिक्त पदभार आहे. सोमवार व गुरुवार या दोन दिवशी ते अक्कलकोटचा कामकाज करतात . इतर कार्यालयीन दिवशी दक्षिण पंचायत समितीत उपस्थित असतात. प्रभारी गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातच दक्षिण सोलापूरची आमसभा विविध विषयांमुळे गाजली. मात्र प्रभारी गटविकास अधिकारी असल्यामुळे तालुक्यातील जिव्हाळ्याच्या अनेक विषयांना फाटा देण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे नागरीकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

> गावातील विविध समस्या सांगण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात गेल्यानंतर गटविकास अधिकारी दौऱ्यावर असल्याचे सांगण्यात येते. वरिष्ठ अधिकार्यांच्या प्रशासकीय बैठकांसाठी जातात. त्यामुळे वारंवार चकरा मारावे लागते. म्हणून दक्षिणला कायमस्वरूपी गटविकास अधिकारी नेमणूक करण्यात यावे.
>
> **-मोतीलाल राठोड,** संस्थापक अध्यक्ष, आरके फाउंडेशन मंद्रुप

विविध योजना व वित्त आयोगाचे निधी ग्रामपंचायतीकडे आल्यानंतर कामांची दर्जा व मूल्यमापन करण्याचे काम गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली होत असते. मात्र दक्षिणला प्रभारी गटविकास अधिकारी असल्याने अनेक गावात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असताना कारवाई होताना दिसून येत नाही. त्यामुळे ग्रामपंचायत अधिकारी बेफिकीरपणे वागत आहेत. म्हणून दक्षिणला कायमस्वरूपी गटविकास अधिकारी नेमण्याची मागणी होत आहे.

# शून्य शिक्षक शाळांची माहिती द्या

### आ. आसगावकर; माध्यमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० मे-**

पुणे विभागातील सर्व जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभाग अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळेतील शून्य शिक्षक झालेल्या शाळेची माहिती द्यावी, असे पत्र आमदार जयंत आसगावकर यांनी पुणे विभागातील माध्यमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहे.

> **नव्या संच मान्यतेनुसार मागितली माहिती**
>
> मार्च २०२४-२५ मध्ये नवी संच मान्यता केली आहे. त्या संच मान्यतेनुसार पुणे विभागातील जवळपास सर्वच शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त, अतिरिक्त झाल्या आहेत. त्याने शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नव्या संच मान्यतेनुसार कोणत्या शाळेत किती शिक्षक आहेत, याची माहिती आ. आसगावकर यांनी मागविली आहे.

पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक माध्यमिक शाळेत शून्य शिक्षक आहेत. तसेच बऱ्याच शाळा एक शिक्षकांवर सुरू आहेत. तर काही शाळेत अतिरिक्त शिक्षक आहेत. त्यामुळे शून्य शिक्षक झालेल्या शाळा, एक शिक्षक असलेल्या शाळा आणि अतिरिक्त शिक्षक असलेल्या शाळांची माहिती तत्काळ द्यावी, अशी सूचना केली आहे.

पुणे विभागातील सर्वच जिल्ह्यात माध्यमिक शाळांची संच मान्यता निश्चित करण्यात आली आहे.

नवीन संच मान्यतेच्या निकषानुसार आपल्या जिल्ह्यातील बऱ्याच शाळेतील पदे कमी होणार आहेत. त्यामुळे शून्य शिक्षक झालेल्या शाळा, एक शिक्षक झालेल्या शाळा आणि अतिरिक्त शिक्षक असलेल्या शाळांची माहिती तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.



## हरिभाई देवकरण प्रशालेस राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार

**सोलापूर, दि. १० मे-**

एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र यांच्या वतीने राज्यस्तरीय संस्था व आदर्श संस्था संचालक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हुतात्मा स्मृती मंदिर येथे महाराष्ट्र राज्य गृहराज्यमंत्री योगेश कदम आरोग्य दूत महाराष्ट्र वैद्यकीय सेवा कक्ष महाराष्ट्र राज्य मंगेश चिवटे यांच्या व इतर मान्यवरांच्या शुभ हस्ते पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळी पुणे या संस्थेला व संस्थाचालक म्हणून शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांना आदर्श संस्था व संस्था चालक प्रमुख म्हणून पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या दीपा फाटक नूमवि शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा जेधे, ज्येष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, आप्पासाहेब राऊत, शिक्षक प्रमोद चुंगे, अक्षय गवळी, प्रकाश कंपली, प्रिया कदम, सारिका अनपट, सौरभ कुलकर्णी उपस्थित होते.

# सिंहगड इन्स्टिट्यूटचे पारितोषिक वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये उत्साहात पार पडले.



सिंहगड इन्स्टिट्यूटचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी मान्यवरांच्या हस्ते पार पडला. यावेळेस कॅम्पस डायरेक्टर तथा संस्था सहसचिव संजय नवले, माजी कुलगुरू तथा ज्येष्ठ संशोधक, सीआरटीडीचे संशोधन संचालक शिवाजी पवार, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, प्रा. के. एस. पाटील, प्रा. एच. टी. गुरमे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी आपल्या चार वर्षांतील गोष्टींना आपल्या मनोगतातून व्यक्त केले. सिंहगड इन्स्टिट्यूटमधील शिक्षण, शिक्षक, टीचर्स गार्डीयन याविषयी प्रशंसा केली. सहसचिव संजय नवले यांनीही विद्यार्थ्यांना एक अभियंता झाल्याचे अभिमान वाटत असल्याचे सांगत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आपल्या कार्यातून आई वडीलाचे आणि सिंहगड संस्थेचे नाव उंचावेल असे काम करण्यास सांगितले.

> **रतन, अर्जुन, विक्रम, जब्बार पुरस्काराचे मानकरी**
>
> उद्योजकाच्या नावाने दिला जाणारा वीस हजाराचा रतन पुरस्कार विभागून श्रेयश शेंडगे आणि सैफन नाईकवाडी यांना दिला. तांत्रिक कार्यासाठी दिला जाणारा पाच हजाराचा विक्रम पुरस्कार विभागून संकेत गुरव, धुंडप्पा वहानरे, सुजाता दुधभाते, कोमल मोरे यांना दिला. क्रीडा कार्यासाठी दिला जाणारा अर्जुन पुरस्कार शिवाणी पवार यांना तर कला, सांस्कृतिक, साहित्यासाठी दिला जाणारा जब्बार पुरस्कार गौरी जिंदे यांना दिला.

> **बेस्ट स्टुडंट्स ऑफ द इयर**
>
> बेस्ट अटेनटेव्ह स्टुडंट्स म्हणून सुशांत खांडेकर, बेस्ट केडेमिक परफॉर्मन्स स्टुडंट्स म्हणून काझी आदिबा, बेस्ट आऊटगोईंग स्टुडंट्ड ऑफ द सिव्हिल डिपार्टमेंट म्हणून सरस्वती साळुंके, बेस्ट आऊटगोईंग स्टुडंट्ड ऑफ द इलेक्ट्रिकल म्हणून सुजाता दहिभाते, ईएनटीसी डिपार्टमेंटमधून आदित्य परदेशी, मेकॅनिकल डिपार्टमेंटमधून कोमल आवताडे तर बेस्ट स्टुडंट्स ऑफ द इन्स्टिट्यूट पुरस्कार योगिता गाजुल (सीएसई अंतिम वर्ष) यांना दिला.

## 'पानगल'ची झीनत सय्यदला ८५ टक्के; महाविद्यालयात प्रथम

**सोलापूर, दि. १० मे-**



पुणे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षामध्ये घेण्यात आलेली परीक्षेत एम ए.पानगल कनिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेचा एकूण निकाल ८२.२२ टक्के इतका लागला. विज्ञान शाखेची सय्यद झीनत मुबारकने ८५ टक्के गुण घेऊन कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम आली. व मुजावर जफिरकरीमने ८३.६७ टक्के घेऊन दुसरा आला. तसेच *नल्लामंदू रेहान मोहम्मद उस्मानने ८१.८३ गुण घेऊन तिसरा क्रमांक पटकाविला. एकूण विज्ञान शाखेचा निकाल ८७.७२ इतका लागला. कला शाखेत नदाफ आयेशा जिलानीने ८३.३३ टक्के गुण घेऊन प्रथम आली व बोंगे अफरोज बाबुलालने ७४.६७ टक्के घेऊन दुसरा क्रमांक तसेच शहापुरे आशा सलीमने ७३ टक्के गुण घेऊन कनिष्ठ महाविद्यालयात तिसरा क्रमांक पटकाविला. बारावी पुणे बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.हारून रशीद बागबान व उपमुख्याध्यापिका डॉ. सूरया परविन जागीरदार, म.अली शेख व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व शिक्षकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व मिठाई वाटप करून अभिनंदन केले.

# संस्मरणीय ऐतिहासिक ठरले बौद्ध साहित्य संमेलन

**सोलापूरी साहित्यविश्वात अनमोल भर घालुन यशस्वी ठरलेले संस्मरणीय ऐतिहासिक असे बौद्ध साहित्य संमेलन ठरले आहे. या प्राचीन विश्वातील संपुर्ण मानवी संकुलाला अमुल्य अशा प्रज्ञा, शील, करुणा या ' रत्न' कोंदणात बसवुन समतावादी, विज्ञानवादी हे मुलाधार देत खोटे बोलणार नाही,चोरी करणार नाही,व्याभिचार करणार नाही,मद्यपान करणार नाही,हिंसा करणार नाही या शील सामर्थ्याचे मुळ अधिष्ठान प्रदान करीत सांस्कृतिक, वैचारिक,अध्यात्मिक दृष्ट्या आभाळउंची बहाल केलेले**

तथागत तथागत बुद्ध यांच्या वैश्विक साहित्यावर आधारीत बौद्ध साहित्य संमेलन विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने क्रांतीप्रवण झालेल्या सोलापूर नगरीत शनिवार दि. ३ मे २०२५ रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडले. त्याचे कुतुहलात्मक, कौतुकास्पद पडसाद महाराष्ट्रातील साहित्य जगतात उमटत आहेत. सर्वच अंगांनी उत्कृष्ट ठरलेल्या या संमेलनाला उद्घाटक म्हणुन लाभलेले

खास श्रीलंके वरुन आलेले आदरणीय मा. पुज्य भन्ते यश थेरो आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आदरणीय डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेब या दोन महान विभुतींची उपस्थिती आकर्षणाचा भाग ठरली. भंतेजी यांचे विचार( धम्मदेसना) आजच्या सामाजिक परिस्थितीवर अचुक भाष्यकरीत समाजाला दिशादर्शन करुन गेले.



ते म्हणाले तसे- ज्यांचे विचार चांगले असतात, त्यांची समाज आठवण ठेवतो. बाबासाहेबांचे विचार चांगले होते. त्यामुळेच आपण त्यांची आठवण काढतो. चोरी विचार ,खोटे बोलणे याचे स्वरूप आता बदलले आहे. ईर्षा आणि कंजूषीमुळे लोक शांततेने जगू शकत नाहीत.ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अनेक ठिकाणी केवळ शो होतो दुसऱ्याचे व्हिडिओ बघून मन जर जळत असेल तर इच्छा निर्माण होते. पती-पत्नी आई वडील भाऊ बहीण अशा वेगवेगळ्या नात्यांमध्ये कंजूषीमुळे मोठ्या प्रमाणात वाढत आहे. प्रत्येकाला सोने हिरे सारखे मौल्यवान व्हायचे आहे. मात्र त्यासाठी लागणारे कष्ट घेण्याची मात्र कोणाचीही तयारी नसते. चांगले वाईट यात भेद करण्याचे काम प्रज्ञा करत असते. बाहेरची डेव्हलपमेंट बाहेरील सुख देऊ शकते परंतु अंतर्गत डेव्हलपमेंट ही मनशांती देऊ शकते तर संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत योगीराज वाघमारे सर यांचे चोहोअंगानी अभ्यासपूर्ण संदेशात्मक व मुद्देसुद भाषण रसिकांना एक नवीन दिशा देऊन गेले. ते म्हणाले,-बुद्ध धम्म आणि त्याची तत्वे, सिद्धांत, आचरण, शिकवण, असे अमर्याद सखोल ज्ञान आहे. त्रिपिटका सारख्या महाग्रंथात विशाल ,गहन ज्ञान सामावलेले आहे.हजारो पृष्ठ आणि तीन करोड शब्दांकित असुन उदात्त,गहन,जटिल व विद्वतापुर्ण जीवनाचे दर्शन येथे घडते.२५५० वर्षांपासून आशिया खंडात नव्हे तर जगभरात हे ज्ञान पसरलेले आहे. बौद्ध संस्कृती विकसित करण्यात अनेक तत्कालीन ज्ञानवंतांनी आपले योगदान दिले आहे. मनाला प्रशिक्षित करण्यासाठी भावना कशा काम करतात, मनोविज्ञान, ब्रम्हांड विज्ञान तर्क, अंतर्दृष्टी, विपश्यना, ध्यानधारणा अशा संदर्भात बौद्ध साहित्य मार्गदर्शन करते. असे मत योगीराज वाघमारे सर यांनी मांडले. डॉ. आनंद देवडेकर, प्रा. डॉ. विजय मोहिते, अभियंता संजय धनशेट्टी, प्रशासनाधिकारी शाहु सतपाल यांचेसह तर आठही परिसंवादातील मान्यवर वक्ते यांनी आपल्या विचारांतुन बौद्ध जागर केला. उदघाटन समारंभ तर अत्यंत शिस्तबद्धतेने थाटात पार पडलाच शिवाय यावेळी अतिथींनी केलेले मार्गदर्शन प्रासंगिक ठरले.समता सैनिक दलाने दिलेली मानवंदना अभिमान जागृत करुन गेली. उत्साहाचे चैतन्यमय वातावरण करुन गेली. पांढऱ्या शुभ्र परिवेश परिधान करुन आलेल्या उपासक - उपासिका लक्ष वेधुन घेत होत्या.त्यानी लक्ष वेधून घेतले होते.

विशेष म्हणजे कोणत्याही संमेलनातील महत्त्वाचा विभाग म्हणुन पाहीले जाते त्या काव्य संमेलनांतील सर्वच कवींनी सादर केलेल्या रचनांनी वातावरण बौद्धमय होऊन गेले होते. म्हणुन मी लेखाचे प्रारंभी म्हणण्यानुसार संस्मरणीय, ऐतिहासिक असे संमेलन ठरले हे कोणीही नाकबुल करणार नाही.अशा संमेलनात माझीही सेवा रुजु झाली आहे. त्या नात्याने एक विनंती 'बौद्ध साहित्य मंडळ सोलापूर 'या संयोजन समितीला असेल की, हेच संमेलनसुत्र धरुन यापुढेही तथागत बुद्ध व प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक विविध दिनविशेषांनिमित्ताने असेच साहित्य, सांस्कृतिक उपक्रम राबवावेत. जेणेकरून तथागत बुद्धांच्या विचारांचा जागर वेळोवेळी होत राहील. तसेच संस्मरणीय ठरलेल्या संमेलनाचे क्षणचित्रे भाषणे पुस्तक रुपात यावेत ही विनंतीही मी सुत्रसंचालन करताना व्यक्त केली आहेच आणि शेवटी अर्थातच संमेलन नीटनेटके, सुंदर, परिपुर्ण व वेळेबरहुकुम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतलेले संयोजन समितीचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, पत्रकार कोषाध्यक्ष किरण बनसोडे, कविवर्य उपसंपादक विजय गायकवाड, कार्यवाह भालचंद्र साखरे, प्रा. वशिष्ठ सोनकांबळे, कामगार नेते चांगदेव सोनवणे, मारुती बेलभंडारे, अशोक इंगळे, डॉ. संघप्रकाश दुड्डे यांचे सोलापूरकरांमार्फत मनपूर्वक आभार ! धन्यवाद ! धरी रे मनवा तु अंतरी बुद्धाला।। हरघडी हरघरी हरेकाला घेरले आज तुम्हा आम्हाला ।। उघडा बंद मनाच्या खिडक्या उघडा दारे।। युद्धाचे सुटले जगात वारे।। आता तरी धरी रे मनुजा! अंतरी बुद्धाला शांती करुणेचा संदेश स्पर्शु दे मनाला।। धरी आता अंतरी बुद्धाला।।

**- कवीवर्य - देवेंद्र औटी, ेलापूर.**
बौद्ध साहित्य संमेलनांतर्गत
काव्य संमेलनाचे सूत्रसंचालक.
९८८१४८२९२४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आठ दिवसात पीक विमा तक्रारींचा निपटारा करा

### ✔ आ.समाधान अवताडे यांचा अधिकाऱ्यांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० मे -**

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांमध्ये शेतकऱ्यांनी भरलेल्या खरीप पीक विम्यामध्ये विमा कंपनीकडून मोठ्या प्रमाणात अनियमितता केली असून अर्धा हेक्टर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यालाही ५१९७ व ३ हेक्टर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्याला ही ५१९७ रुपयेच विमा मंजूर केला असल्याचे शेतकऱ्यांनी आमदार समाधान आवताडे यांनी आयोजित केलेल्या बैठकीत उघडकीस आणले. त्यामुळे विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना आमदार समाधान आवताडे यांनी जाब विचारत आठ दिवसात शेतकऱ्यांच्या सर्व तक्रारी मार्गी लावा अन्यथा मी तुमच्या वरिष्ठासोबत शासन स्तरावर बैठक लावून विमा कंपनीवर कारवाई करण्यास भाग पाडेन असा इशारा आमदार आवताडे यांनी विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिला.



यावेळी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब लांडगे, तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, पंढरपूर तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी उमेश पळसे माजी सभापती प्रदीप खांडेकर, अजित जगताप, सोमनाथ माळी, औदुंबर वाढदेकर यांचे सह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. आमदार समाधान आवताडे यांनी शनिवारी सकाळी दहा वाजता मंगळवेढा तालुका कृषी कार्यालयाच्या सभागृहामध्ये कृषी अधिकारी विमा कंपनीचे अधिकारी व शेतकऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली. या बैठकीमध्ये मतदार संघातील सर्रास शेतकऱ्यांनी विमा कंपनी विरोधात तक्रारी केल्या खरीप हंगाम २०२३-२०२४ हंगामा करता भरलेल्या विमा पॉलिसी मध्ये कंपनीच्या नियमानुसार ७२ तासाच्या आत नुकसानीची माहिती देणे बंधनकारक होते त्यानुसार ७२ तासाच्या आत माहिती देऊनही अनेक शेतकऱ्यांचे पंचनामे ही झाले नाहीत व त्यांना मदत ही मिळाली नाही ज्यांना विमा मंजूर झाला व ज्यांना ना मंजूर झाला त्या कोणत्याही शेतकऱ्यांचा याद्या कंपनीकडून उपलब्ध करून दिल्या जात नाहीत किंवा कंपनीच्या संकेतस्थळावर प्रकाशित केल्या नाहीत कंपनीच्या प्रतिनिधींनी काही शेतकऱ्यांना हाताशी धरून ठराविक लोकांचे पंचनामे केले आहेत अशा लेखी तक्रारी शेतकऱ्यांनी आमदार समाधान आवताडे यांच्याकडे या बैठकीत दिल्या. यावेळी आमदार अवताडे यांनी विमा कंपनीच्या अधिकाऱ्याला आठ दिवसात शेतकऱ्यांचा सर्व तक्रारी मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत त्याचबरोबर मंजूर झालेल्या १४ कोटी २७ लाख रुपयांच्या विमा रकमेचा आढावा त्यांनी घेत शेतकऱ्यांचा खात्यावर ही रक्कम जमा होण्यास सुरू असल्याचे सांगितले. उडीद, सूर्यफूल, करडई या पिकांचा विमा संरक्षित पिकांमध्ये समावेश करण्यासंदर्भात प्रयत्न करणार असल्याचे आमदार अवताडे यांनी सांगितले. त्याचबरोबर स्वयंचलित हवामान केंद्रे तालुक्यामध्ये २६ ठिकाणी मंजूर असून ती अद्याप का बसवली नाहीत याबाबत ही आढावा घेत तत्काळी हवामान केंद्र उभारण्याच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर खाते बी बियाणे लवकरच उपलब्ध करून घ्यावीत त्यासाठी दुकानदाराने आतापासूनच तयारी करावी, जलतारा प्रकल्प सर्व शेतकऱ्यांनी राबवावा अशा सूचनाही आ. आवताडे यांनी दिल्या. यावेळी विजयसिंह देशमुख, शशिकांत चव्हाण, दत्तात्रय जमदाडे, प्रवीण खवतोडे, संजय कट्टे, बाळासाहेब सावंत, तुकाराम कुरे, विनायक यादव, शाम आकळे, जीवन पवार यांचेसह शेतकरी कृषी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## महत्वाचे...

### राजेराय मठात ११ मे पासून छंदवर्ग

**अक्कलकोट दि. १० मे -**

येथील परमपुज्य सद्गुरु श्री बेलानाय बाबांच्या २२ व्या पुण्यतिथी उत्सवानिमीत्त श्री बेला फाऊंडेशनच्या सहकार्याने लहान मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी बुधवार ११ मे ते २४ मे पर्यंत श्री राजेराय मठ येथे उन्हाळी छंद वर्गाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अतुल जाधव यांनी दिली. या वर्गामध्ये चित्रकला, हस्तकला, सुंदर हस्ताक्षर, मातीकला इत्यादी शिकवले जाणार आहे. बुधवार ११ मे २०२५ ते २४ मे २०२५ पर्यंत वेळ सकाळी ९ ते ११ या कालावधीत उन्हाळी छंद वर्गाचे आयोजन करण्यात आली आहे. प्रतिवर्षाप्रमाणे यंदा भव्य चित्रकला स्पर्धा रविवार दि. २५ मे २०२५ रोजी सकाळी ९ ते १२ अ गट : इयत्ता १ ली, २ री बगट इयत्ता ३री, ४ थी क गट, इयत्ता ५ वी ते ७ वी 'ब गट, इयत्ता ८ वी ते १० वी आणि खुला गट/महाविद्यालयीन प्रत्येक गटात प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात येणार आहे.सदर कार्यक्रम श्री राजेराय मठ फत्तेसिंह क्रिडांगण समोर, ए-वन चौक, अक्कलकोट जि. सोलापूर येथे घेण्यात येणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी प्रमुख मार्गदर्शक अतुल जाधव यांचा मो. ९८५०५५४७७२, ७३०४५०५५५० यावर संपर्क साधावा असे आवाहन एका पत्रकाद्वारे केले आहे.



### कासेगावचे सरपंच वाडकर यांचे वीज प्रश्नासंबंधात महावितरणला निवेदन

**कासेगाव, दि. १० मे -**

आज कासेगाव येथील विजेच्या प्रलंबित प्रश्नांच्या संदर्भात महावितरण चे उप अभियंता दवंडे साहेब यांची कासेगाव चे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व शेतकरी यांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली. एअर बंचचे अपूर्ण काम पूर्ण करणे, कासेगाव गंगेवाडी फिडरवर पाणीपुरवठा विहिरीसाठी स्वतंत्र लाईन टाकणे, शेत वस्तीवरील घरांसाठी सिंगल फेज लाईन देणे, जलजीवन योजनेतून मंजूर असलेल्या डी पी चे इस्टिमेट करून देणे, माननीय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी शिफारस केलेले नवीन डीपी मंजूर करणे आदी विविध विषयावर सविस्तर चर्चा केली. मा. दवंडे साहेब यांनी वरील विषय तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी सरपंच श्री यशपाल वाडकर, ग्रामपंचायत सदस्य संभाजी चौगुले, लक्ष्मण वाडकर, जालिंदर गायकवाड, केदार ढेकळे, लक्ष्मण जाधव, भरत चौगुले, शाहू हेडे, गणेश काकडे, संतोष चौगुले, दाजी चौगुले, मधुकर हेडे, राजाराम चौगुले, राम माने, नितीन माने, सदाशिव खंडागळे, सुनील चौगुले, अंकुश काकडे, शंकर काकडे, ऋषिकेश जोशी, राम माने, महेश येनगुरे, रशीद तांबोळी, नेताजी माने, गडदे, राम हक्के, सोपान काकडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### अवैध धंद्यावर पोलीसांची कारवाई; ९ दारु विक्रेत्यावर, मटका बुकीवर कारवाई

**पिलीव, दि. १० मे -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील अवैध धंदयावर पोलीसांनी धडक कारवाई केली आहे. यामध्ये पिलीव येथील अवैध दारु विक्री करणाऱ्या ९ जणांवर महाराष्ट्र दारुबंदी कायदयानुसार कारवाई करण्यात आले असुन त्या ९ जणांवर गुन्हे नोंदवुन त्यांच्याकडुन १०,६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करणयात आला आहे. तर एका मटका बुकीवर कारवाई करीत त्याच्या कडुन ५७५ रुपये मुद्देमाल जप्त करणयात आला असुन यामध्ये दोन आरोपीवर गुन्हा नोंदविणयात आला आहे. पिलीव अवैध धंदयावर ही कारवाई सुरुच राहणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडुन देणयात आली आहे. सदरची कारवाई माळशिरस पोलीस ठाणयाचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल मडावी यांच्या मार्गदशनाखाली पिलीव पोलीस ठाणयाचे हवालदार पंडित मिसाळ, दत्ता खरात, शिंदे तसेच पोलीस कॉन्सटेबल सतिश धुमाळ व अमित जाधव यांनी केली.

### सरकारी कामात अडथळा व कर्मचाऱ्याला मारहाण केलेप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. १० मे -**

वैराग पोलीस स्टेशनअंतर्गत भारतीय दंड विधान संहिताचे कलम ३५३, ३२३,५०४,५०६ प्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणातील फिर्यादीने सरकारी कामात अडथळा व सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण केले प्रकरणी गुन्हा नोंद केला होता. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचेसमोर झाली. सदरप्रकरणी सरकार पक्षातर्फे एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ॲड. एस.एम.गुंड यांनी केला. सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. सदर प्रकरणी यात आरोपीच्यावतीने ॲड. एस एम गुंड व ॲड. व्ही. पी. जाधव, ॲड. आर.आर. घोडके, ॲड. ए. एस. गुंड, ॲड. आर. के. ननवरे, ॲड. पी.ए. शेळवणे यांनी काम पाहिले.

### थीम्ड मेगा टाऊनशिप प्रकल्प उभारणार

**सोलापूर, दि. १० मे-**

डेला रिसॉर्ट्स अँड ॲडव्हेंचरने हिरानंदानी कम्युनिटीज अँड क्रिसला डेव्हलपर्ससोबत प्रोप्रायटरी सीडीडीएमओटिम मॉडेलसाठी हातमिळवणी केली आहे.तब्बल ११०० कोटी रुपये उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता असलेली रेसकोर्स थीम्ड मेगा टाऊनशिप उभारण्यासाठी ही भागीदारी करण्यात आली आहे.महत्त्वाचे म्हणजे भारतीय स्थावर मालमत्ता उद्योगक्षेत्रात हे पाऊल पहिल्यांदाच उचलले गेले आहे. विशिष्ट संकल्पनेवर आधारित, हॉस्पिटॅलिटी-चलित मॉडेलने स्थावर मालमत्ता क्षेत्रात एक नवीन गुंतवणूक वर्ग खुला आहे,पुण्यातील वेगाने विकसित होत असलेल्या उत्तर हिंजवडीमध्ये तब्बल ४० एकरांहून मोठ्या परिसरात वसवण्यात येणार असलेल्या या टाऊनशिपमध्ये ८ एकरांचे रेसकोर्स आणि इंटरनॅशनल पोलो क्लब, १२८ खासगी व्हिला प्लॉट्स, ११२ रिसॉर्ट खाजगी निवास, ३०० खोल्यांचे पंचतारांकित लक्झरी रिसॉर्ट, ९ वेडिंग डेस्टिनेशन व्हेन्यू, १२ कॉर्पोरेट आणि माईस व्हेन्यू, एक्स्ट्रीम ॲडव्हेंचर पार्क, डेला रेन्ज गोल्फ, वेलनेस सुविधा आणि डेलाची खासियत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डिझाईन संवेदनांनी सजलेल्या एक्स्पेरिएन्शियल जागा यांचा समावेश असेल. डेला रिसॉर्ट्स अँड ॲडव्हेंचरचे संस्थापक आणि अध्यक्ष तसेच या महत्त्वपूर्ण विकासामागे ज्यांची दूरदृष्टी आहे असे श्री जिमी मिस्त्री यांनी सांगितले.

# डॉक्टर विरोधात गुन्ह्यासाठी आता मेडिकल बोर्डाचा अहवाल आवश्यक

### अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निर्वाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१० मे-**

डॉक्टरांचा निष्काळजीपणा व हलगर्जीपणाच्या केसेसच्या बाबतीत त्यांची मेडिकल बोर्डापुढे सुनावणी होणे आवश्यक असून तेथील तज्ञ डॉक्टरांनी तसा निष्काळजीपणाचा अहवाल देणे गरजेचे आहे. सदर अहवालानंतरच डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत मार्गदर्शक तत्व असल्याचे निदर्शनास आणून देत सत्र न्यायालय बार्शी यांनी एका डॉक्टरचा अटकपूर्व जामीन मंजूर केला.

करमाळा येथील डॉ. राम बिनवडे यांच्या विरोधात करमाळा येथील न्यायालयात भाऊसाहेब करगळ (रा.रावगाव, ता.करमाळा) यांनी खाजगी फिर्याद दाखल केली होती. त्यामध्ये त्यांनी त्यांची पत्नी शितल करगळ हिचा मृत्यू डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे नमूद करुन गुन्हा दाखल करण्याची विनंती केली होती. करमाळा न्यायालयाने डॉ. बिनवडे यांचा तपास करण्याचे आदेश करमाळा पोलीसांना दिले होते. सदर प्रकरणी करमाळा पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता. डॉ. बिनवडे यांनी ॲड. निखिल पाटील व ॲड. प्रमोद जाधव यांचेमार्फत अतिरिक्त सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळणेकामी व करमाळा न्यायालयाचा आदेश रद्द करणेकामी अर्ज दाखल केला होता. अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एल. चव्हाण यांच्यासमोर झाली. सदर अर्जाची सुनावणी वेळी ॲड. निखिल पाटील यांनी सदरील डॉक्टरांचा कोणताही निष्काळजीपणा नसून जिल्हा मेडिकल बोर्ड व उपजिल्हा मेडिकल बोर्ड येथे त्यांची तज्ञ डॉक्टरांमार्फत चौकशी चालू आहे व अद्याप चौकशी अहवाल आलेला नाही. सदरचा अहवाल येईपावेतो त्यांचे विरोधात खाजगी फिर्याद किंवा गुन्हा दाखल करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने डॉक्टरांच्या निष्काळजीपणा व हलगर्जीपणाच्या केसेसच्या बाबतीत त्यांची मेडिकल बोर्डापुढे सुनावणी होणे आवश्यक असून तेथील तज्ञ डॉक्टरांनी तसा निष्काळजीपणाचा अहवाल देणे गरजेचे आहे. सदर अहवालानंतरच डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत मार्गदर्शक तत्व असल्याचे निदर्शनास आणून दिले. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन डॉ. राम बिनवडे यांना सत्र न्यायालय बार्शी यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. करमाळा न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध दाखल केलेल्या रिविजन अर्जाची सुनावणी श्री. मांडे यांच्यासमोर झाली.



# भगवंत मंदिरात कलाकारांनी सादर केली सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मे-**

श्री भगवंत बहुउद्देशीय संस्था आणि श्री भगवंत देवस्थान बार्शी आयोजित भगवंत महोत्सव २०२५ यामध्ये सहाव्या दिवशी भक्ती संध्या कलाकारांनी भगवंत चरणी आपली कला सेवा अर्पण केली. भक्ती संगीत प्रस्तुत भक्तीरंग हा अभंग भक्ती गीतांचा सुरेल कार्यक्रम दि. ८ मे रोजी सकाळी ८ वाजता भक्तिमय वातावरणात सादर करण्यात आला.

यात भक्तीसंध्याचे कलाकार डॉ. मदन देगावकर, मधुसूदन चांडक, सूर्यकांत वायकर, रुपाली पवार, रुपाली शिंदे, लक्ष्मी तोरड, दिपाली सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या सुमधुर आवाजात रसिकांना मंत्रमुग्ध केले हार्मोनियमवर साथ प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी दिली व तबल्याची साथ तुषार गदगी यांनी दिली. या संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन प्रा. माधुरी शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभ दर्शन देरे देरे भगवंता या भक्ती गीताने करण्यात आला.

त्यानंतर राम का गुणगान अमृताहुनी गोड केशवा माधवा तुझे रुप चित्ती राहो बोलावा विठ्ठल निघालो घेऊन दत्ताची पालखी देव माझा विठू सावळा जीवाच्या जिवलगा उद्धवा अजब तुझे सरकार राजस सुकुमार थकले रे नंदलाला धरीला पंढरीचा चोर गोविंद गोविंद घागर घेऊन विठुरायाची पंढरी पंढरी निवासा पायोजी मैने कानडा राजा अश्व विविध भक्ती गीते गवळण अभंग सादर करून रसिकांची मने जिंकली.. एकादशीचा दिवस असल्याने भक्ती रंग या कार्यक्रमाची सांगता प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी आषाढी पंढरी या भैरवीने केली. अनेक भक्तांनी हा कार्यक्रम पुन्हा एकदा मंदिरात व्हावा अशी मागणी केली. संपूर्ण कार्यक्रमाला भरभरुन प्रतिसाद मिळाला.





# भगवंत महोत्सवात स्थानिक कलाकारांना वाव

### बार्शीकरांची उत्स्फूर्त दाद, तरुणाई थिरकली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१० मे -**

बार्शी शहरात आयोजित भगवंत महोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचा समारोप अत्यंत उत्साहात आणि कलात्मकतेने झाला. महोत्सवाच्या अखेरच्या दिवशी बार्शी शहर व परिसरातील स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी देण्यात आली होती.

या संधीचे सोने करत विविध वयोगटांतील कलाकारांनी आपल्या सादरीकरणांनी रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमात लहान मुलांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत अनेक कलाकार सहभागी झाले होते. गोंधळी नृत्य, तामिळनाडु लोककला प्रकार, अघोरी नृत्य, विविध नृत्य प्रकार, समूह नृत्य, गाणी, मिमिक्री,भक्ती गीत, छत्रपती शिवाजी महाराजयांचा पाळणा, पहलगाम शहीद जवानाना श्रंदाजली सादरीकरण सर्वांची मने जिंकली. या कार्यक्रमात एकुण ५१ कला प्रकार सादरीकरणात एकुण १५० हून अधिक कलाकारांनी सहभाग नोंदविला. यासह इतर कलाप्रकारांनी मंच रंगून गेला होता. प्रत्येक सादरीकरणावर प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली, त्यामुळे कलाकारांमध्येही विशेष उत्साह निर्माण झाला. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देण्यामागचा उद्देश म्हणजे त्यांच्या प्रतिभेला वाव देणे आणि स्थानिक सांस्कृतिक वारसा जपणे हा होता. आयोजकांनी या माध्यमातून बार्शीतील सांस्कृतिक ताकद दाखवून दिली आहे.

कार्यक्रमासाठी प्रेक्षकांची गर्दी आणि उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता भविष्यातही अशा उपक्रमांना अधिक प्राधान्य देण्यात यावे, अशी अपेक्षा स्थानिक कलाकरांनी व नागरिकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप अलाट व धीरज शेळके यांनी केले.

# माता शिवलिंगवा मंदिराचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १०-**

सुमारे पाचशे वर्षांपूर्वी धोत्री येथे साध्वी शिवलिंगवा यांनी सर्वस्वाचे बलिदान देऊन त्यागमय आदर्श घालून दिला. संजीवन समाधी घेतली. माता शिवलिंगव्वाचे भव्य मंदीर उभारून मोठे काम केल्याचे प्रतिपादन मैंदर्गी हिरेमठ संस्थांनचे ष. ब्र. नीलकंठ शिवाचार्य यांनी केले. शिवलिंगवा मंदिराच्या लोकार्पण समारंभात ते बोलत होते.



यावेळी मूर्ती प्राण प्रतिष्ठापना व कळसारोहण झाले. सकाळी विधिवात पूजा झाली. दहा वाजता शिवाचार्यांच्या हस्ते कळसारोहण करण्यात आले. चार मे पासून नऊ मे पर्यंत वेदमूर्ती बसवराज शास्त्री सोमेश्वर मठ तीर्थ, वेदमूर्ती सोमेश्वर शास्त्री धोत्री यांनी माता शिवलिंगवाचे पुराण प्रवचन केले.

प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी प्रास्ताविकातून शिवलिंगवा मातेचे जीवन कार्य स्पष्ट करून महती सांगितली. बेनकनहल्लीचे शिवाचार्यांनी आशीर्वचन केले. अध्यक्षीय समारोप करताना माळकवठा मठाचे शिवाचार्य यांनी समाज सेवा व आध्यात्मिक सेवेत रमल्यामुळे आत्मिक शांती मिळते. यामुळे धर्म कार्य करण्याचे आवाहन केले. लक्ष्मण बिराजदार, दयानंद बिराजदार, कांतप्पा बिराजदार, शरणपा बिराजदार, बनप्पा माळी, दिलीप नंदनगे, गंगाधर बिराजदार, शशिकांत दहिटने, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी लिंबणा व्हनमाने, मल्लप्पा बिराजदार यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन वेदमूर्ती सोमशेखर हिरेमठ यांनी केले. आभारप्रदर्शन सेवा निवृत्त पोलीस अधिकारी लक्ष्मण बिराजदार यांनी केले. यावेळी कार्यक्रमास विविध माध्यमातून मदत केलेल्या भक्तांचा महास्वामींजींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सागरदादा कल्याणशेट्टी, शिरीष पाटील, महेशदादा बिराजदार, जि. प. सदस्य आण्णाराव बाराचारी, सी. जी. बिराजदार व शिरपनहल्ली, दर्गनहल्ली, धोत्री परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# सांगवीतील केळीची निर्यात थेट जॉर्डनमध्ये

### ● शेतकरी यश सरडे यांची भरारी; उजनी पाणलोट क्षेत्रामधून पहिल्यांदाच निर्यात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१० मे,**

भारतामधून प्रथमच उजनी लाभक्षेत्रातील सांगवी (ता. करमाळा) येथील केळी उत्पादक शेतकरी यश ऊद्धव सरडे यांनी फायना युनिव्हरसल कंपनीच्या माध्यमातून केळीची जॉर्डन देशांमध्ये निर्यात केली आहे.



त्यामुळे भारतातील व महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी व केळी निर्यातदारांसाठी नवीन आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होत आहे. परिणामी परकीय चलन भारतामध्ये येण्यास मदत होणार आहे. तसेच भविष्यात केळी उत्पादक शेतकऱ्यांना अजूनही मोठी बाजारपेठ उपलब्ध होऊन प्रोत्साहन मिळणार आहे, निर्यातक्षम दर्जेदार व उत्तम केळी उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी संधी उपलब्ध होणार आहे. सदर केळी निर्यात करते वेळी उजनी लाभक्षेत्रातील केळी उत्पादक शेतकरी,वेंडर, फायना युनिव्हर्सल कंपनीचे, अधिकारी, कर्मचारी तसेच तज्ञ मंडळी उपस्थित होते.




माझ्या शेतामधील केळी भारतातून प्रथमच जॉर्डन देशामध्ये निर्यात झालेले आहेत.याचा खूप आनंद आहे. सद्या प्रतिकिलो २१रुपये प्रमाणे दर मिळाला आहे.४ एकर केळी काढणीसाठी तयार असून १२० टनापर्यंत उत्पन्न अपेक्षित असून ४ एकरात २४ ते २५ लाख रुपये अपेक्षित आहेत.

**- यश उद्धव सरडे, केळी उत्पादक**

आम्ही भारतामधून प्रथमच जॉर्डन देशासाठी प्रथमच केळी निर्यात केली आहे.आम्हाला आशा आहे की केळी निर्यात करण्यासाठी नवीन आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होईल.त्यामुळे उजनी लाभक्षेत्रातील केळीसह देशातील केळीला मोठ्या प्रमाणात मागणी होऊन शेतकर्यांना अधिकचे पैसे मिळून शेतकर्यांचे एकरी उत्पन्नात वाढ होईल. तसेच परदेशातून अधिकचे परकीय चलन आपल्या देशाला मिळेल याचा आनंद आहे. पुढील काळात शेतकऱ्यांसाठी केळी लागवड करणे फायद्याचे होणार आहे.यासाठी मालाचा उत्तम दर्जाची केळीचे उत्पादन करणे आवश्यक आहे.

**- अमीर फिरोज करीमी, केळी निर्यातदार.**

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अन्नछत्र मंडळातर्फे न्यायमूर्ती कर्णिक यांचा सन्मान



**अक्कलकोट, दि. १० मे-**

अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंह भोसले यांचे चिरंजीव जन्मेजयराजे विजयसिंह भोसले संस्थापक अध्यक्ष श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांचे नातू अमोल जन्मेजयराजे भोसले कार्यकारी अध्यक्ष, अन्नछत्र मंडळ यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सुरु असलेल्या विविध कार्याबरोबरच निराधार, दिव्यांग यांच्या करिता समर्थ महाप्रसाद सेवा ही मातृत्वाचा असीम परीघ असल्याचे मनोगत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम.एस. कर्णिक यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, योगेश कटारे, निखील पाटील, विजय गोटू माने, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, रोहित कदम, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



## महत्वाचे...



### मॉर्निंग सोशल फाउंडेशनचा महाप्रसाद; हजारो भाविकांनी घेतला लाभ

**बार्शी, दि. १० मे-**

बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत प्रकटोत्सवानिमित्त मॉर्निंग सोशल फाउंडेशनच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. सकाळी मंदिरात प्रकटोत्सव सोहळा झाल्यानंतर दुपारी श्री भगवंतास महाप्रसादाचा नैवेद्य दाखवून जवळच असलेल्या मॉडेल हायस्कुलच्या मैदानावर महाप्रसादास सुरुवात झाली. महाप्रसादमध्ये भाविकांसाठी चपाती, पुरी, बटाटा भाजी, मसाला वांगे, बुंदी मसाला भात होता. सोबतच गार पाण्याची बाटलीची सोयही जागेवर करण्यात आली होती. दुपारी सुरु झालेला महाप्रसाद सायंकाळपर्यंत सुरु होता. बार्शीसह पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांनी या स्वादिष्ट महाप्रसादाचा लाभ घेतला. माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी तसेच बार्शी नगरपालिकेतील माजी पक्षनेते तथा मॉर्निंग सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष विजय राऊत यांनी बराच वेळ भाविकांना स्वतः रांगेत फिरुन महाप्रसाद वाढला. भगवंत देवस्थान ट्रस्ट, भगवंत महोत्सव समितीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मॉर्निंग सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष विजय राऊत यांच्यासह फाउंडेशनचे पदाधिकारी, सदस्य यांनी परिश्रम घेतले. दरम्यान या महाप्रसाद मंडपात खासदार ओमराजे निंबाळकर, उपविभागीय पोलीस अधीक्षक जालिंदर नालकुल, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, पोनी बालाजी कुकडे, सोजर समूहाचे अरुण बारबोले, तहसीलदार एफ.आर. शेख यांनी भेट देऊन प्रसादाचा लाभ घेतला.

### ओंकार साखर कारखान्यामुळे माळशिरसच्या विकासात भर : जयंत पाटील

**पिलीव, दि. १० मे-**

ओंकार साखर कारखाना परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी चांदापुरी येथील साखर कारखाना ताब्यात घेऊन शेतकऱ्यांना चांगला दर देऊन तसेच ऊसाचे वेळेत गाळप करुन शेतकऱ्यांना न्याय देत ,मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती उपलब्ध करुन दिली आहे. तसेच नव्यानेच उपपदार्थ निर्मिती प्रकल्प हाती घेऊन माळशिरस तालुक्याच्या विकासात भर टाकली असल्याचे मत शेकापचे नेते जयंत पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर होते. खरेतर साखर उद्योग हा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडीत असणारा व्यवसाय आहे. ग्रामीण भागातील कारखाने व्यवस्थीत चालले पाहीजेत. बंद पडलेले कारखाने याबयात घेऊन बाबुराव बोत्रे पाटील यांनी चालु करुन सर्वसामान्यांना न्याय देणयाचे काम केले असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. माजी मंत्री संभाजीराव पाटील यांनी कमी कालावधीत बाबुराव बोत्रे पाटील यांनी नव साखर कारखाने चालवित आहेत. हे सोपे नाही. यासाठी ओंकार परिवाराचे त्यांनी कौतुक केले. यावेळी माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी आ. संजयमामा शिंदे, दादासाहेब फराटे पाटील, दादासाहेब बोत्रे पाटील, प्रशांत बोत्रे पाटील, ओमराजे बोत्रे पाटील, आभार चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी मानले.



### कोळा येथील शुभम शेटे अर्थशास्त्र विषयात राज्यात प्रथम

**सांगोला, दि.१० मे-**

इ.१२ वी निकालामध्ये कोळा, ता.सांगोला येथील व सांगोला विद्यामंदिर ज्यु.कॉलेजचा वाणिज्य शाखेचा विद्यार्थी शुभम सोमेश्वर शेटे याने अर्थशास्त्र विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवून राज्यात आणि पुणे बोर्डामध्ये प्रथम येण्याचा मान पटकावला. त्याला ८४.५० टक्के गुण मिळाले. कठीण वाटणाऱ्या अर्थशास्त्र विषयात भरघोस असे यश संपादित केल्याने त्याचे कोळा पंचक्रोशीसह सर्वत्र कौतुक केले जात आहे. त्याचा पुढे सीए होण्याचा मानस आहे. त्याला प्रा.एन. डी.बंडगर, प्रा.एस.एम टकले, प्रा.एस.डी.आलदर, प्रा.राजेंद्र कुंभार, प्रा.प्रसाद खडतरे, प्रा.सुवर्णा लवटे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकाचे सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मं.श.घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, पर्यवेक्षक सुरेश मस्तूद, मच्छिंद्र इंगोले, प्रदीप धुकटे यांनी अभिनंदन केले.

### कासेगाव ओढ्यावरील पुलाची उंची वाढविण्याची मागणी

**कासेगाव, दि.१० मे-**

येथील कासेगाव उळे रस्तावर असलेल्या ओढ्यावरील पुलाची उंची वाढवण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. येथील पूर्वीचा पुल पाडून नविन पुलाचे काम करण्यात आले परंतू त्याची उंची पूर्वीच्या पुलापेक्षा कमी करण्यात आली त्यामुळे थोडा जरी पाऊस झाली तरी पुलावरून पाणी वाहते. त्यामुळे वाहतूक ठप्प होते. गेल्या वर्षी येथे या पुलामुळे ज्ञानेस्वर कदम या युवकाचा पाण्यात वाहून जात मृत्यू झला आहे. तरी प्रशासनाने तत्काळ पुलाची उंची वाढवण्याची मागणी आहे

# मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांची आषाढीच्या पार्श्वभूमीवर बैठक

## पायाभूत सुविधांचा विकास आणि सुरक्षा बळकटीकरणावर भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे-**

आगामी आषाढी यात्रेसाठी सुरक्षितता, सुरक्षा आणि तयारी यावर लक्ष केंद्रित करत पंढरपूर मंदिर परिसरात रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांच्यासह राज्य अधिकारी आणि विभागीय रेल्वे अधिकाऱ्यांसह एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आषाढी तयारीच्या प्रमुख बाबींवर चर्चा करण्यात आली, ज्यात रेल्वे रुळांलगत व पलीकडे पालखींची सुरक्षित वाहतूक, होल्डिंग एरियाची तरतूद, शौचालय सुविधा, प्रवासी माहिती प्रणालीमध्ये वाढ, सीसीटीव्ही देखरेख, मंदिर संकुलातून भाविकांची सुलभ मुव्हमेंट आणि रेल्वे स्थानके आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यांच्यातील कनेक्टिव्हिटी यांचा समावेश होता. प्रत्येक उपक्रमाच्या वेळापत्रकावर चर्चा करण्यात आली. तसेच मागील वर्षाच्या तुलनेत सेवा वाढवण्याच्या योजनांवर चर्चा करण्यात आली.

रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धर्म वीर मीना यांनी सोलापूर विभागाची पाहणी केली. महाव्यवस्थापकांनी टिकेकरवाडी गँग हटमधील वाहतूक सुविधेच्या कामांचा आढावा घेतला आणि क्षेत्रातील शाखा अधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी टिकेकरवाडी येथील जमिनीचे धोरणात्मक महत्त्व तपासले. सोलापूरच्या जवळ असल्याने आणि सोलापूर स्थानकावरील गर्दी कमी करण्यासाठी सुविधा विकसित करण्याची क्षमता यावर भर दिला. या दृष्टिकोनात ट्रेनसेट्सना सामावून घेण्यासाठी आणि विभागातून येणाऱ्या अधिक गाड्यांना सुविधा देण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे समाविष्ट आहे. तपासणीदरम्यान, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, यांनी एकात्मिक नियोजन आणि समान स्वरूपाच्या कामांचे गट करून निविदांचे सुलभीकरण करण्याची गरज यावर भर दिला, ज्यामुळे व्यापक विकास शक्य होईल. त्यांनी क्षमता वाढवणे, लवचिकता वाढवणे आणि कॉमन लूप, होल्डिंग लाईन्स आणि द्वि-दिशात्मक सिग्नलिंगसाठी रेल्वे जमिनीचा वापर करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तपासणीची सुसंगतता आणि वस्तुनिष्ठता सुधारण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना प्रमाणित चेकलिस्ट तयार करण्याचे निर्देश दिले. टिकेकरवाडी स्थानकावर सिग्नलिंग गियर आणि कागदपत्रांची अनियोजित तपासणी देखील करण्यात आली. जिथे विविध ऑपरेशनल रजिस्टरची



सखोल तपासणी करण्यात आली. मध्य रेल्वे आषाढी यात्रेसारख्या मोठ्या कार्यक्रमांदरम्यान, विशेषतः सुरक्षित, कार्यक्षम आणि प्रवासी-अनुकूल सेवा सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध आहे.

# मारहाण व अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणात आरोपींचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मे-**

बार्शी शहरातील मंगडे चाळ येथे झालेल्या मारहाण प्रकरणातील संशयित आरोपी कन्हैया राजाभाऊ ढाळे व सुरज पिंटू धोत्रे यांचा न्यायालयाने जामीन अर्ज मंजूर केला. अर्जदार विरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि भारतीय दंड संहितेअंतर्गत गुन्हे दाखल असून, न्यायालयाने आरोपींविरोधातील पुरावे लक्षात घेऊन जामीन अर्ज मंजूर केला.

११ मार्च २०२५ रोजी रात्री ८.५० वा. बार्शी शहरातील मंगडे चाळ येथे फिर्यादी रामेश्वर शिवदास रामगुडे हे त्यांच्या मावस भावासोबत घरासमोर बोलत असताना आरोपी कन्हैय्या ढाळे, सूरज धोत्रे, कृष्णा ढाळे आणि एक अनोळखी व्यक्ती दुचाकीवरुन आले. फिर्यादीचा मावस भाऊ वाईट नजरेने पाहतो, असा आरोप करत आरोपींनी शिवीगाळ केली आणि मारहाण केली. या घटनेसंदर्भात १२ मार्च रोजी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला. वैद्यकीय अहवालानुसार फिर्यादीच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान आरोपींविरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र सरकारी वकील आणि तपास अधिकाऱ्यांनी आरोपींना जामीन देऊ नये, अशी जोरदार मागणी केली. न्यायालयाने अर्जदार आरोपी यांचे विधीज्ञ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत जिल्हा व सत्र न्यायाधीश विक्रमादित्य मांडे यांनी अर्जदार आरोपींचा जमीन अर्ज मंजूर केला. अर्जदार आरोपींच्यावतीने अ‍ॅड. प्रशांत एडके व अ‍ॅड. सुहास कांबळे यांनी काम पाहिले.

# सोलापूर-पुणे महामार्गावर लक्झरी बसला आग

## चालकाच्या प्रसंगावधानाने १५ प्रवासी सुखरूप

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १० मे-**

माढा तालुक्यातील वेनेगाव हद्दीतील सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्गावर एलपीजी गॅस पंपासमोर आज शनिवार, १० मे रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास एक अपघाताची घटना घडली.हैदराबादहून मुंबईकडे जात असलेल्या बेस्ट एक्सप्रेस नावाची लक्झरी बस नं. एन. एल. ०१ बी १८२४ ही हैदराबाद कडून मुंबईकडे जात असताना. चालू वाहनाने अचानक पेट घेतला.या बसने अचानक पेट घेतल्याने एकच खळबळ उडाली. या बसमध्ये १५ प्रवासी प्रवास करत होते. चालकाच्या तत्परतेमुळे एकाही प्रवाशाला इजा झाली नाही.बसचालकाने



प्रसंगावधान राखत,सर्व प्रवाशांना सुखरूप खाली उतरवले. या घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार, सपोनी गिरीष जोग, हवालदार विशाल शिंदे यांनी तातडीने हजर राहून वाहनातील १५ पॅसेंजर सुखरूप खाली उतरवले. फायर ब्रिगेड बोलाऊन सुमारे दीड तासानंतर आग विझवण्यात यश मिळाले. यात कोणतीही जीवित हानी झालेली नसली तरी प्रवाशांचे डीकी मधील साहित्य जाळून खाक झाले. सदर बस ड्राइव्हर अब्दुल इम्तियाज (रा. मध्यपूर, हैद्राबाद) याने टेंभुर्णी पोलीस ठाण्यात खबर दिली असून अगीवर नियंत्रण मिळवल्यानंतर सोलापूर पुणे महामार्गची वाहतूक प्रशासनाकडून सुरळीत सुरू करण्यात आली.



# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी सांगोल्यातील १८ जणांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१० मे-**

पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्यातून सांगोल्यातील वाघमारे कराटे क्लासच्या १८ जणांची निवड करण्यात आली आहे. कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजित कॅडेट ज्युनिअर, सब ज्युनिअर कराटे चॅम्पियनशिप २०२५ करिता कराटे असोसिएशन सोलापूर यांच्यामार्फत सदर निवड करण्यात आली. सब ज्युनिअर गटात मिष्का धांडोरे, प्रणव लांडगे, यश कोकरे, शिवराज कळसुले, श्रीहरी देशपांडे, अविरत सरगर, प्रत्युश सावंत, सिद्धार्थ माने, गुरुराज पांढरे, आरोही सावंत, आयुष्मान मोरे, योगींनी रणदिवे, श्वेताली सावंत, गौरांगी मोरे, सारा मोरे, प्रेरणा चव्हाण तर कॅडेट गटातून तेजस कांबळे, राजनंदिनी वाघ यांची निवड करण्यात आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशिक्षक सुनील वाघमारे, जि.के.वाघमारे, निजेंद्र चौधरी, श्रावणी वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

# आवताडे शुगरच्या बगॅसला आग; २ कोटींचे नुकसान



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० मे-**

मंगळवेढा तालुक्यातील नंदूर येथील आवताडे शुगरच्या बगॅसला शुक्रवारी दुपारी अचानक आग लागून अंदाजे ५००० मे.टन लुज बगॅस जळाला असल्याची माहिती कारखाना प्रशासनाने दिली आहे. या आगीमध्ये सुमारे २ कोटी रुपयाचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे सांगण्यात आले आहे.

दि.९ मे २०२५ रोजी दुपारी ३:३० च्या दरम्यान कारखान्याच्या लुज बगॅसला अचानक भीषण आग लागली. त्यामध्ये अंदाजे ५००० मे.टन लुज बगॅस जळाला आहे. आग लागल्याची माहिती कारखाना कर्मचाऱ्यांना मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ अग्निशामक दलाच्या मंगळवेढा, पंढरपूर, सांगोला व लोकमंगल शुगर, भंडारकवठे येथील अधिकाऱ्यांना संपर्क साधून अग्निशामक यंत्रणा बोलवून घेतली व लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवले. आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आवताडे शुगरचा तिसरा गाळप हंगाम संपला असून अचानक लागलेल्या आगीमुळे मोठे नुकसान झाले असल्याची माहिती कार्यकारी संचालक मोहन पिसे यांनी दिली.

# धस पिंपळगाव येथे १४ मे रोजी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

## विठ्ठल बिरुदेव यात्रा समिती व ग्रामस्थांतर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० मे -**

कुस्तीची परंपरा जपण्यासाठी बार्शी तालुक्यातील धस पिंपळगाव येथे दि. १४ मे रोजी विठ्ठल बिरुदेव यात्रा समिती व पिंपळगाव ग्रामस्थांच्यावतीने भव्य राज्यस्तरीय निकाली कुस्ती स्पर्धांचे मैदान आयोजित केले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष महाराष्ट्र चॅम्पियन सचिन धस यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

यावेळी जन्मभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस, उपसरपंच अण्णासाहेब धस, माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर, विश्वजीत ठोंगे, धनाजी वाघमोडे, शरद जगदाळे, अण्णासाहेब पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी धस म्हणाले, कुस्ती हा देशी खेळ जपण्यासाठी व पिंपळगावची कुस्ती परंपरा जोपासण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून भविष्यकाळात ग्रामीण भागात चांगले मल्ल तयार व्हावेत हा या स्पर्धेचा उद्देश आहे. या स्पर्धेसाठी राज्य पातळीवर खेळलेले नामांकित मल्ल येणार असून सुमारे २५ कुस्त्या या तुल्यबळ मल्लांमध्ये होणार आहेत. याशिवाय जिल्ह्यातील नवोदित होतकरु मल्लांच्याही जाहीर स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेतील पहिल्या क्रमांकाची कुस्ती ही वेताळ शेळके विरुद्ध पृथ्वीराज पाटील या नामवंत महाराष्ट्र केसरी मल्लांमध्ये होणार आहे. पिंपळगावचे वैभव वाढावे यासाठी क्रीडाप्रेमी व भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे यांनी या स्पर्धेसाठी अडीच लाख रुपयांचे बक्षीस देऊ केली आहे. तसेच दुसऱ्या क्रमांकाची स्पर्धा ही पैलवान मनोज माने विरुद्ध पै. हनुमंत पुरी या मल्लामध्ये लढवली जाणार आहे. या स्पर्धेचे दुसरे बक्षीस हे राहुल धस यांच्यावतीने एक लाख रुपये दिली जाणार आहे. तसेच तिसऱ्या क्रमांकाची कुस्ती ही पै. रवींद्र खैरे विरुद्ध पै. अमित जगदाळे या मल्लांमध्ये खेळवली जाणार आहे. या तिसऱ्या क्रमांकाच्या बक्षिसासाठी सुरेश धस यांनी ५१ हजार रुपयांचे बक्षीस देऊ केले आहे तर बालाजी मांजरे यांनी चांदीची गदा देऊ केली आहे. केवळ ग्रामीण भागातील कुस्ती प्रेमाला उत्तेजन देण्यासाठी व पिंपळगावच्या नामांकित मल्लांच्या स्मृती जपण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी जन्मभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस यांनी या कुस्ती स्पर्धांच्या पाठीशी संयोजनामध्ये जन्मभूमी प्रतिष्ठान सर्व आघाड्यांवर सक्रिय असून आजपर्यंतची गावाबद्दलची बांधिलकी या स्पर्धेच्या निमित्ताने जपणार आहे पैलवान सचिन धस हे राज्य पातळीवर कुस्ती खेळलेले महाराष्ट्र चॅम्पियन असून त्यांच्या कुस्तीवरच्या निष्ठेला आम्ही पाठबळ देत आहोत, असे त्यांनी सांगितले. यावेळी कुस्ती स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण उपस्थित सर्व मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व कुस्तीगीरांची निवासी व भोजनाची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे. या स्पर्धेसाठी इच्छुक कुस्तीगीरांनी सहभागी व्हावे. तसेच कुस्ती पाहण्यासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. यावेळी दादा कसबे, बापू लवटे, नवनाथ धस, बापू लगड, अमरदीप धस, विलास धस, रामभाऊ गरड, सागर भोळे, अमर धस आदी मान्यवर उपस्थित होते.